• पुणे, शुक्रवार, २१ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 113 • वर्ष ४ थे, अंक ११३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



खाण मालकांची राज्य शासनालाच 'धूळफेक'...!

P३



मुंबईकरांचा हार्दिकला मिळणार पाठिंबा

१२

# आदित्य ठाकरे अडचणीत!

## दिशाचे वडील सतीश सालियान यांची याचिका दाखल: सीबीआय चौकशीची केली मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सुशांत सिंह राजपूतच्या माजी मॅनेजर दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी बुधवारी सांगितले की, जून २०२० मध्ये संशयास्पद रित्या झालेल्या आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्याची मागणी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात केली आहे. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर दाखल करून या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

दिशा सालियनच्या वडिलांनी आता मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. सामूहिक बलात्कार करुन दिशाची हत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला. किशोरी पेडणेकरांनी सुरुवातीला दिशाभूल करत दबाव टाकल्याचा आरोपही करण्यात आला. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मारिया यांच्यासह मुंबई पोलिसांवरही या याचिकेद्वारे आरोप करण्यात आला.

यापूर्वी जेव्हा दिशा सालियानच्या वडिलांशी संवाद साधण्यात आला होता, तेव्हा अशी कुठलीही शक्यता त्यांनी फेटाळून लावली होती. मात्र, आता त्यांनी याचिका दाखल करत अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे या प्रकरणात मोठे ट्विस्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. किशोरी पेडणेकरांनी सुरुवातीला दिशाभूल करत दबाव टाकल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला. तसेच शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे,

» पान ७ वर



### दिशा सालियन प्रकरण काय?

• दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर म्हणून काम केलेल्या दिशा सालियनचा मृत्यू सुशांतच्या मृत्यूच्या काही दिवस आधीच झाला होता. २८ वर्षीय दिशा सालियन आणि सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूमध्ये केवळ पाच दिवसांचे अंतर होते. ८ आणि ९ जून २०२० च्या रात्री दोन वाजण्याच्या सुमारास दिशाचा एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडल्याने मृत्यू झाला. त्यानंतर पाच दिवसांनी म्हणजे १४ जून २०२० रोजी सुशांतसिंह राजपूत आपल्या राहत्या घरामध्ये मृतावस्थेत आढळून आला होता.



"एकंदरीत संपूर्ण तपास पाहता मला असं वाटतं की ही हत्याच आहे. कारण एखाद्या व्यक्तीची बॉडी १४ व्या मजल्यावरून पडते, पण तरीही त्या व्यक्तीच्या बॉडीवर एकही जखम दिसून येत नाही. डोक्यावरही कुठे जखम होत नाही, मग असं कसं होऊ शकतं? यावर विचार करायला हवा. १४ व्या मजल्यावरून जर बॉडी पडली तरी ती बॉडी क्लिन कशी राहू शकते?"

— **सतीश सालियन,** दिशाचे वडील



दिशा सालियनच्या वडिलांनी पिटीशन दाखल केले आहे. त्यानुसार आम्ही सभागृहात एवढी मागणी केली आहे की, महिलांवरती बलात्कार होतो, त्यामध्ये जे आरोपी आहेत त्यांना ताब्यात घ्यावे आणि त्यांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, बलात्काराचा आरोप झाला तर त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करत त्याला अटक करत चौकशी करावी लागते. दिशाच्या वडीलांनी जे आरोप केले आहेत, त्यानुसार कारवाई झाली पाहिजे, हीच आमची मागणी आहे. सरकारने या सगळ्याची दखल घ्यावी असे आमचे म्हणणे आहे."

— **नितेश राणे,** मंत्री

# जेएनपीटी ते पुणे आता सुस्साट प्रवास!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेला नवे आयाम मिळवून देणाऱ्या जेएनपीए पोर्ट ते चौक या ६-लेन ग्रीनफील्ड महामार्ग प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. २९.२ किमी लांबीच्या या हाय-स्पीड महामार्गामुळे बंदर आणि विमानतळ जोडणी अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार समितीने महाराष्ट्रातील जेएनपीए पोर्ट (पगोटे) ते चौक (जुना पुणे महामार्ग) दरम्यान ६-लेन एक्सेस-कंट्रोल्ड ग्रीनफील्ड हाय-स्पीड राष्ट्रीय महामार्ग बांधण्यास मंजुरी दिली आहे. ४५०० कोटींच्या खर्चाने हा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरित करा (बीओटी) पद्धतीने ३० महिन्यांत पूर्ण होणार आहे.

सध्या जेएनपीए पोर्टवरून मालवाहतुकीसाठी पालास्पे फाटा, डी-पॉइंट, कळंबोली जंक्शन आणि पनवेल या भागांतून जाणाऱ्या गाड्यांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते.



एनएच-४८ आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवे पर्यंत पोहोचण्यासाठी २-३ तास लागतात. नवीन महामार्गामुळे ही वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २०२५ मध्ये सुरू होणार असून, त्यामुळे वाहतुकीचा ताण आणखी वाढण्याची शक्यता आहे. यासाठी पगोटे ते चौक हा महामार्ग मुंबई-पुणे एक्सप्रेसवे आणि मुंबई-गोवा महामार्गाला जोडणार आहे. या महामार्गामध्ये सह्याद्री डोंगररांगांतून दोन बोगदे तयार केले जाणार आहेत, जे घाट रस्त्याचा पर्याय म्हणून वापरले जातील. याशिवाय, महामार्गावर ६ मोठे पूल, ५ लहान पूल आणि ४ उड्डाणपूल बांधण्यात येणार आहेत, ज्यामुळे वाहतूक अधिक वेगवान आणि सुलभ होईल.

# आदित्य-रिया यांच्यात ४४ वेळा फोन कॉल?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिशा सालियनची सामूहिक बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याचा आरोप करत एनआयएमार्फत चौकशीचे आदेश द्या, अशी मागणी करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी ही याचिका दाखल केली आहे. सुशांतसिंह राजपूतचा मृत्यू झाला त्यादरम्यान आदित्य ठाकरे आणि रिया चक्रवर्ती यांच्यात ४४ वेळा फोनवर काय बोलणे झाले? असा सवाल याचिकेतून विचारण्यात आला आहे.

दरम्यान, शिवसेना नेते आदित्य ठाकरे, अभिनेता सूरज पांचोली, दिनो मोरीयो यांच्यासह मुंबई पोलिसांवर या याचिकेतून गंभीर आरोप करण्यात आले आहेत. इतकेच नाही तर सुशांत आणि रियाच्या मृत्यूवर सवाल उठवणा-या सर्व साक्षी-पुराव्यांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी देखील या याचिकेत करण्यात आली आहे. तसेच १३ आणि १४ जून २०२० रोजीचे सुशांतसिंह राजपूत, रिया चक्रवर्ती, आदित्य ठाकरे, अरबाज खान, संदिप सिंह, शौविक चक्रवर्ती या सर्वांचेही मोबाईल लोकेशन तपासले जावेत. तसेच या दोन्ही दिवसांचे आसपासच्या परिसरातील आदित्य ठाकरेंशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज तपासले जावे, अशी मागणी वडिलांनी दाखल केलेल्या याचिकेतून करण्यात आली आहे.

८ जून २०२० ला दिशाच्या मालाडमधील घरी पार्टी आयोजित करण्यात आली

» पान ७ वर



# त्या रात्री नेमके काय घडले?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ८ जून २०२० च्या रात्री दिशा सालियनचा मृत्यू झाला होता. त्यादिवशी रात्री नेमके काय घडले? याबाबत दिशाच्या एका मित्राने माहिती दिली होती. दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतची मॅनेजर म्हणून दिशा सालियन कार्यरत होती. ८ जूनच्या रात्री मालाड येथील इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. सुशांत सिंह राजपूतने १४ जून रोजी आत्महत्या केल्यानंतर दिशाच्या प्रकरणाला राजकीय वळण लागले होते. दिशा सालियनच्या महाविद्यालयीन मित्रांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर त्या रात्रीचा घटनाक्रम शेअर करण्यात आला होता.

८ जून २०२० रोजी दिशा सालियनच्या घरात मित्र आणि तिचा प्रियकर पार्टी करत होते. सदर मेसेजची बातमी इंडिया टुडेने दिली आहे. त्या रात्री पार्टीत दिशाने मद्य प्राशन केले होते. तसेच ती करिअरला घेऊन थोडी निराश होती. माझी कुणी काळजी करत नाही, असे ती वारंवार म्हणत होती. त्यानंतर ती

» पान ७ वर

# तुमच्यासारखे ५६ पायाला बांधून फिरते - चित्रा वाघ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणावरून सुरू असलेल्या चर्चेदरम्यान अनिल परब यांनी मंत्री संजय राठोड यांच्या केसचे काय झाले? सत्ताधारी पक्षातील महिला आमदार आता का



शांत आहेत? असा सवाल विचारल्याने चित्रा वाघ चांगल्याच आक्रमक झाल्या. मी माझा लढा लढले. हे करीत असताना माझ्या कुटुंबियांना अतोनात त्रास झाला, तरीही लढाई सोडली नाही. तुमच्याच नेत्याने (उद्धव ठाकरे) राठोड यांना क्लिनचिट का दिली? हे हिम्मत असेल तर त्यांना विचारा, असे आव्हान देत तुमच्यासारखे ५६ पायाला बांधून फिरते, अशा आक्रमक अंदाजात चित्रा वाघ यांनी अनिल परब यांना उत्तर दिले.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणी विधान परिषदेत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान शिवसेना आमदार अनिल परब सुरू असलेल्या राजकारणावर सत्ताधाऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तत्कालिन परिस्थितीत चौकशी यंत्रणांनी चौकशी केली, त्यात कुणीही दोषी

» पान ७ वर

# औरंगजेबाची कबर पुरातत्व खात्याने झाकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** क्रूर शासक अशी ओळख असलेला औरंगजेब महाराष्ट्रात १७०७ या वर्षी त्याचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजी नगरमधील खुलताबाद या ठिकाणी औरंगजेबाची कबर आहे. ही कबर भारतीय पुरातत्व खात्याने झाकून ठेवली आहे. औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातून उखडून टाका अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून होते आहे. तसंच १७ मार्च रोजी औरंगजेबाची कबर उखडण्याच्या मुद्द्यावरुन दंगलही उसळली होती. त्यानंतर आता औरंगजेबाची कबर झाकून ठेवण्यात आली आहे. छत्रपती संभाजी नगर येथील खुलताबाद या ठिकाणी ही कबर आहे.

काही दिवसांपूर्वीच छत्रपती



संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी खुलताबाद वरुन ड्रोन उडवण्यास १८ एप्रिल पर्यंत मनाई केली आहे. तसंच खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर आणि परिसर हा रेड झोन म्हणून काही काळासाठी जाहीर करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांचं असं म्हणणं आहे की औरंगजेबाच्या कबरीची तोडफोडो आणि नासधूस होण्याची शक्यता आहे. तसंच त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यानंतर ड्रोनसाठी या भागात मनाई करण्यात आली आहे.

# वाल्मीक, आठवले नंतर भोसले गँगवर मकोका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** वाल्मीक कराड, सुदर्शन घुले, बीडची आठवले गँग, यानंतर आता आष्टीच्या भोसले गँगवर मकोका लावण्यात आला आहे. मागील दोन महिन्यांत अशा प्रकारच्या तीन कारवाया केल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे. विशेष म्हणजे आतापर्यंत पहिल्यांदाच मकोकामध्ये महिलांचा आरोपी म्हणून समावेश झाला आहे. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत हे गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरत आहेत.

आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजिनाथ विलास भोसले, भरत विलास भोसले, या दोन सख्ख्या भावांचा खून करून कृष्णा भोसले याला गंभीर जखमी केल्याची घटना १६ जानेवारी २०२५ रोजी वाहिरा येथे घडली होती.

» पान ७ वर

अजित पवार यांचे आश्वासन

# 'त्या'नंतरच लाडक्या बहिणींना २१०० रुपये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही. त्यामुळे राज्य सरकारची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना वाढीव मदत देण्यात येईल असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी विधानसभेत केले.

या खुलाशामुळे योजनेतील पात्र लाडक्या बहिणींना २१०० रुपयांच्या मदतीसाठी दीर्घ प्रतीक्षा करावी लागणार आहे. लॉटरीच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढावे यासाठी विधानसभा सदस्यांची समिती नेमण्याची घोषणा पवार यांनी यावेळी केली.

गुरुवारी विधानसभेत सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील वित्त, नियोजन, अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या अनुदानाच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या. तत्पूर्वी झालेल्या चर्चेला उत्तर देताना अजित पवार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना वाढीव अनुदान देण्याच्या मागणीवर सरकारची भूमिका स्पष्ट केली. सध्या आम्ही लाडक्या बहिणींना कबूल केल्याप्रमाणे मदत देत आहोत. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारली की आम्ही वाढीव मदत देऊ असे त्यांनी सांगितले.

भाजपचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या चर्चेत भाग घेताना राज्य सरकारने लॉटरीच्या



माध्यमातून उत्पन्न वाढवावे, अशी सूचना केली होती. त्यासाठी त्यांनी केरळसह अन्य राज्यांना लॉटरीपासून मिळणा-या महसुलाची माहिती दिली. या मागणीची दखल घेत अजित पवार यांनी आपल्या उत्तरात सर्व प्रकारच्या लॉटरीच्या माध्यमातून राज्याच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय आमदारांची समिती नेमण्याची घोषणा केली. या समितीने अभ्यास करून महिनाभरात अहवाल द्यावा, असे पवार म्हणाले.

सध्या राज्याचे स्थूल उत्पन्न ४९ लाख ३९ हजार कोटी रुपये आहे. त्यामुळे सरकारची महसुली तूट ही १ टक्क्यांच्या आत आहे. २०१५ मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न १२ लाख ८० हजार कोटी रुपये असतानाही महसुली तूट १ टक्क्याच्या आत होती. तथापि २०२५-२६ या आर्थिक वर्षात १०० टक्के महसूल जमा करून राज्याला आर्थिक शिस्त लावायची असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. दरम्यान, सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७७.२६ टक्के खर्च झाल्याचे सांगत पवार यांनी काँग्रेसच्या नाना पटोले यांचा ४० टक्के खर्च झाल्याचा दावा खोडून काढला.

# ८ व्या वेतन आयोगात महागाई भत्ता शून्य?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय कर्मचा-यांसाठी आठव्या वेतन आयोगाची घोषणा झाली आहे. आता लवकरच आयोगातील सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. नवीन वेतन आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती एप्रिल २०२५ मध्ये होईल. हा आयोग केंद्रीय कर्मचा-यांना पगारासोबत मिळणा-या भत्यासंदर्भात निर्णय घेणार आहे. वेतन आयोगात महागाई भत्ता शून्य होण्याची शक्यता आहे. परंतु त्याला अजून दुजोरा मिळालेला नाही.

सध्या केंद्रीय कर्मचा-यांना त्यांच्या बेसिक पगारावर ५३ टक्के डीए मिळतो. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या आठव्या वेतन आयोगात महागाई भत्यासंदर्भात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. सध्या केंद्र सरकार वर्षात दोन वेळा महागाई भत्ता वाढवते. पहिली वाढ जानेवारी ते जून महिन्यांसाठी असते. दुसरी वाढ जुलै ते डिसेंबर महिन्यासाठी असते. हा महागाई भत्ता ३ ते ४ टक्के वाढवला जातो. परंतु आठव्या वेतन आयोगात महागाई भत्ता शून्य करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


वेतन पद्धतीत मोठा बदल?

माध्यमांमधील वृत्तानुसार, आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी जानेवारी २०२६ मध्ये लागू होण्याची शक्यता आहे. तसेच या शिफारशीमध्ये केंद्रीय कर्मचा-यांच्या पगारात मोठ्या प्रमाणात बदल होणार आहे. सध्या डीएचे कॅलकुलेशन बेसिक सॅलरीवर होत आहे. यापूर्वी कोरोना काळात केंद्राने सर्व कर्मचा-यांचा महागाई भत्ता थांबवला होता.

# शेअर बाजारात तेजीचे वादळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शेअर बाजारात गुरुवारी सलग चौथ्या दिवशी मोठी वाढ झाली.



सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही १ टक्क्यांहून अधिक वाढले. सेन्सेक्स ९०० अंकांच्या वाढीसह बंद झाला, तर निफ्टी २३,२०० च्या जवळ बंद झाला. यामुळे शेअर बाजारात गुंतवणूकदारांना सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांचा नफा झाला. या वाढीचे नेतृत्व आयटी आणि टेलिकॉम समभागांनी केले. आजची वाढ चौफेर होती. सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले.

बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकही ०.७३ टक्क्यांनी वाढून बंद झाले. यूएस फेडरल रिझर्व्हने वर्षाच्या अखेरीस दोनदा

» पान ७ वर

# खोक्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** भाजपचे आमदार सुरेश धस यांचा समर्थक सतीश भोसले ऊर्फ खोक्या याची सात दिवसांची पोलिस कोठडी आज संपली आहे. शिरूर न्यायालयात पहिली सुनावणी आज झाली असून शिरूर पोलिस ठाण्यासह चकलांबा पोलिस ठाण्यात खोक्याविरोधात गुन्हा दाखल आहे. याचदरम्यान न्यायालयात आज (२० मार्च) महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आला आहे.

» बॅटने मारहाण

सतीश ऊर्फ खोक्या भोसलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. बॅटने मारहाण केल्याप्रकरणी चकलांबा पोलिस उद्या न्यायालयाकडे अर्ज करून सतीश भोसलेच्या अटकेची मागणी करू शकतात, अशी माहिती समोर येत आहे.

महाराष्ट्रातील अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथून भाजप नेते सतीश भोसले ऊर्फ खोक्या याच्या अटकेवरून राज्यातील राजकारण तापले आहे. बीडचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांच्याविरोधात आता गप्प बसणार नाही, असे भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. मला आशा आहे की आता सुरेश धस मला अशा कोणत्याही प्रकरणात अडकवणार नाहीत ज्याच्याशी

» पान ७ वर

# संशोधनासाठी निधी देण्यास विद्यापीठाचा हात आखडता


अनुदान

**विविध क्रमवारींमध्ये संशोधनाला महत्त्व असतानाही संशोधनासाठी निधी देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा हात आखडता आहे. विद्यापीठाने अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचा पुरेपूर वापर होत नसल्याचे दिसून येत आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २२ मार्च रोजी होणार आहे. त्यासाठीची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. अधिसभेसाठी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी उत्तरे दिली आहेत. त्यात विद्यापीठाकडून संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाबाबत शंतनू लामधाडे, डॉ. प्रशांत हिरे, डॉ. नीता मोहिते यांनी प्रश्न विचारले आहेत. या प्रश्नांना डॉ. संगीता जगताप, डॉ. नितीन घोरपडे यांनी उत्तरे दिली आहेत.

विद्यापीठाला २०२४-२५



या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानानुसार १२७ संशोधन प्रकल्प मिळाले. तसेच ॲस्पायर रीसर्च मेन्टॉरशीप प्रोग्रॅम योजनेअंतर्गत १० प्राध्यापकांना १० लाख २८ हजार ५०० रुपये अनुदान मंजूर करण्यात आले. विद्यापीठाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात संशोधन अनुदानासाठी ४ कोटी ९० लाख रुपये तरतूद केली होती. विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांना विद्यापीठामार्फत अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे १ कोटी ४० लाख रुपये, तसेच विविध संस्थांकडून २५ कोटी ७५ लाख १५ हजार ४५७ रुपये अनुदान मिळाले.

विद्यापीठाने महाविद्यालयीन स्तरावरील संशोधनाला वाव देण्यासाठी अर्थसंकल्पात ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद केली होती, त्यापैकी २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपयांचाच निधी वितरित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय विद्यापीठाकडून ॲस्पायर योजनेअंतर्गत २०२१-२२मध्ये ३७ लाख २१ हजार ८४४, २०२२-२३मध्ये ३५ लाख ४२ हजार ७२४ रुपये, २०२३-२४मध्ये ४ लाख ६८ हजार ७१ रुपये, तर २०२४-२५मध्ये २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपये महाविद्यालयांना देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

डॉ. राजेश मणेरीकर यांनी पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्रलंबित प्रस्तावांबाबत विचारलेल्या प्रश्नाला व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले आहे. त्यानुसार विद्यापीठाकडे मान्यतेसाठी एकूण २६४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यात विज्ञान शाखेचे १६०, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेचे ५९, अभियांत्रिकी शाखेचे ३६, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेच्या नऊ प्रस्तावांचा समावेश आहे.

#रा



## रोजा इफ्तार कार्यक्रम संपन्न

**पुणे :** मातोश्री रमाई आंबेडकर रोड परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाच्या वतीने रोजा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सहाय्यक पोलीस आयुक्त दिपक निकम , बंडगार्डन पोलीस स्टेशन चे वरिष्ठ निरीक्षक रविंद्र गायकवाड , कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल थोपटे, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन चे गुन्हे निरीक्षक चेतन मोरे , डॉ.सुधीर चव्हाण, नागलिंगेशवर, कमरी मठाचे मठपती मल्लप्पा महाराज,बोद्धाचार्य संजय शिंदे, वंचित आघाडी चे नेते वसंतराव साळवे, शीख समुदायाचे भोलासिंग अरोरा,जेष्ठ नेते हाजी नदाफ,झेड. बी. जगताप, प्रदेश काँग्रेस प्रतिनिधी मेहबूब नदाफ, भीम छावा चे शाम गायकवाड,आझाद हिंद फ्रेंड सर्कल चे असिफ खान,जावेद खान, रुबी हॉल कामगार संघटनेचे अध्यक्ष अरविंद साबळे, कार्याध्यक्ष प्रवीण साळवे,रंगप्पा नाईक सचिन सुडगे, मुष्टी योद्धा बंडू गायकवाड, अभिमन्यू सूर्यवंशी,अमोल सोनवणे, रेल्वे कामगार नेते दिनकर चिकाटे,नितीन रोकडे,संतोष बनसोडे, संतोष गायकवाड, गौतम सवाने, जमसू शेख,सूर्यकांत पास्टे, अनिल घटवळ आदी उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे संयोजन संतोष हंगरगी, अभिषेक यादव,जमीर जमादार, शाकीर मुल्ला, राम कारली विजय शिरोळे, शकील नदाफ, राजू कांबळे, अज्जू शेख, अमन शेख गणेश तुपदर, हरीश काकडे, ईश्वर गायकवाड, राम गायकवाड, महेश वाघमारे, अहमद पटेल, फारुख शेख, अशोक जाधव आदी नी केले तर सूत्रसंचालन जनार्धन जगताप यांनी केले तर कार्यक्रमाचे मुख्य आयोजन पुणे शहर जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाचे कार्यवाह सचिव सुजित यादव यांनी केले होते.

## परदेशातील मुलांसाठी कविता सादरीकरण स्पर्धा

**पुणे :** रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे परदेशातील ५ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मराठी कविता सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा विनामूल्य आहे, अशी माहिती रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळवली आहे. यंदा या स्पर्धेचे चौथे वर्ष असून जगभरात पसरलेल्या मराठी माणसांनी आपली भाषा जपण्याचा केलेला प्रयत्न लक्षात घेऊन त्यांच्या नवीन पिढीमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलांनी त्यांना आवडलेली कुठलीही कविता पाठ करून सादर करून त्याचा व्हिडिओ पाठवणे आवश्यक आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिनांक ५ एप्रिल ही अंतिम तारीख असून अधिक माहितीसाठी लीना गोगटे यांच्याशी किंवा अविनाश ओगले यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## अतीक्रमण गोडाऊन सुरक्षा रक्षकांच्या बदल्या करा

**पुणे :** पथ विक्रेत्यांवर होणाऱ्या कारवाईविषयी 'लोकजनशक्ती पार्टी रामविलास'च्या प्रलंबित मागण्यांसदर्भात पुणे महापालिका आयुक्तांना आज स्मरणपत्र देण्यात आले आहे.या निवेदनात अतिक्रमण गोडावून सुरक्षा रक्षकांच्या बदल्या करण्याची मागणी करण्यात आली असून तेथील सीसीटीव्ही २४ तास सुरु ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.अतिक्रमण विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांना उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनिमियन अधिनियम-२०१४ मधील तरतुदीचे प्रशिक्षण देवूनच त्यांच्या नियुक्त्या कराव्या ,अशा प्रलंबित मागण्या पुन्हा मांडण्यात आल्या.वारंवार पत्रव्यवहार,आंदोलन करून आयुक्त आणि पालिका अधिकारी भूमिका घेत नसल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. अतिक्रमण विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांना उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनिमियन अधिनियम 2014 मधील तरतुदीचे प्रशिक्षण देवूनच त्यांच्या नियुक्त्या कराव्या,विक्रेत्यांवर कारवाई करताना त्यांच्या वस्तूंची यादी करावी,त्याची प्रत संबंधित विक्रेत्याला द्यावी,त्यावर कारवाईचे अधिकार असलेल्या अधिकाऱ्याचीच सही असावी,जप्त केलेल्या वस्तूंच्या दंडाची पावती जागेवर द्यावी अशा प्रलंबित मागण्या या आंदोलनाद्वारे पुन्हा मांडण्यात आल्या.आठ दिवसात या मागण्या मान्य केल्या नाहीत तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. लोकजन शक्ती पार्टी रामविलास या पक्षाचे पुणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय आल्हाट , के.सी. पवार,कल्पना जावळे,राहुल उभे,एड.अमित दरेकर,अख्तर शेख,पन्ना कोडितकर उपस्थित होते.

## 'आसूड' ओढत बळीराजाचा 'आक्रोश'...!



**पुणे** शेतकरी संघटनेतर्फे सेंट्रल बिल्डींग येथील कृषी आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते रघुनाथ दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित भव्य राष्ट्रीय धरणे आंदोलन आणि आसूड मोर्चात विविध राज्यांमधून आलेले शेतकरी बांधव सहभागी झाले होते.

## बळीराजाने आसूड मोर्चाव्दारे व्यक्त केला 'आक्रोश'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आजही अनेक मुलभूत प्रश्नांमुळे देशातील शेतकऱ्यांना जगणे त्रस्त झाले असून शेतकरी विरोधी धोरणांमुळे शेतकरी पिचत चालले आहेत. बळीराजाच्या या अवस्थेची जाणीव करून देत आज आसूड मोर्चाव्दारे सरकारी धोरणांविरोधात आक्रोश व्यक्त केला.

शेतकरी संघटनेतर्फे सेंट्रल बिल्डींग येथील कृषी आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते रघुनाथ दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली भव्य राष्ट्रीय धरणे आंदोलन आणि आसूड मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ॲड. अजित काळे, शिवाजी नांदखिले यांच्यासह महाराष्ट्रासह इतर राज्यातील शेतकरी संघटनांचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते रघुनाथ दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात महाराष्ट्रासह विविध ठिकाणांहून स्वयंस्फूर्तीने आणि स्वखर्चाने शेतकरी बांधव मोठ्या संख्येने येऊन सहभागी झाले होते. सर्व शेतमालावरील निर्यात बंदी उठवावी, महाराष्ट्रातील सर्व शेतकरी, शेतमजूर, अंतराची अट रद्द करावी आणि वन्य प्राणी संरक्षण कायदा रद्द करावा यासह इतर मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

# समान पाणीपुरवठा योजना 'असमान'च...!

### कामे पूर्ण झाल्याचा केवळ कांगावा; प्रशासन पोसतेय 'पांढरा हत्ती'

महापालिका प्रशासनाच्या वतीने नेहमीच सर्वच योजनांचा सातत्याने गवगवा करण्यात येतो, परंतु त्याचा पाठपुरावा करण्यात प्रशासनाला आतापर्यंत नेहमीच अपयश आले आहे. त्यामुळे यापूर्वी अनेक योजना बासनात गुंडाळल्या गेल्या असून त्याचा आर्थिक फटका अप्रत्यक्षपणे नागरिकांना सहन करावा लागत आहे; त्याच पध्दतीने गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करण्यात येत असलेल्या समान पाणीपुरवठा योजनेचा हीच अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे ही योजना ज्या भागात राबविण्यात आली आहे, त्या भागात ही योजना फारशी फलदायी ठरलेली नाही. विशेष म्हणजे या भागाला समान पाणीपुरवठा करण्यात प्रशासनाला सपशेल अपयश आली आहे, ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच आहे, त्यामुळे प्रशासनाने त्यासाठी आता ठोस भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील नागरिकांना समान व उच्च दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी ही योजना मोठा गाजावाजा करून आणण्यात आली. चार वेळा मुदतवाढ देऊनही योजनेचे काम ८० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याचे प्रशासन सांगते. मात्र, ज्या भागात योजनेची कामे पूर्ण झाली आहेत, त्या भागात पूर्वीप्रमाणेच पाण्याच्या समस्या आहेत. याबाबत पाणीपुरवठा विभागातील एका अधिकाऱ्याला विचारले असता त्यांनीच सांगितले की, 'या योजनेचा फायदा किती आणि तोटा किती, हे आम्हालाच अजून समजत नाही. याबद्दल जास्त काही बोलू शकत नाही.' अधिकाऱ्याच्या या उत्तराने योजनेच्या माध्यमातून पांढरा हत्ती तर पोसला जात नाही ना?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते भरत जैन सुराणा यांनी माहिती अधिकारात समान पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या टाकीसंदर्भात माहिती मागितली होती. त्या अर्जावर प्रशासनाने जानेवारीत दिलेल्या उत्तरात काम पूर्ण झालेल्या टाक्यांपैकी कात्रज येथील सर्व्हे नं. १२७ मधील केवळ एका टाकीचा वापर सुरू असल्याचे सांगितले होते. तेच प्रशासन आता मात्र पाणी पाणीपुरवठ्यासाठी २२ टाक्यांचा वापर केला जात असल्याचे तोंडी सांगत आहे. मग एका महिन्यात २१ टाक्या कार्यान्वित झाल्या का? असा सवाल उपस्थित होत आहे.

महापालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेमध्ये असणारी ४० टक्के गळती थांबविण्यासाठी आणि पुणेकरांना उच्च दाबाने समान पाणीपुरवठा करण्यासाठी अडीच हजार कोटींची समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. ही योजना पुढील ३० वर्षांचा विचार करून आणि शहराची संभाव्य ४९ लाख २१ हजार ६६३ लोकसंख्या विचारात घेऊन आखण्यात आली आहे.योजनेच्या आराखड्यानुसार शहरात विविध ठिकाणी ८६ पाणी साठवण टाक्या, पाणी वितरणासाठी १२२४ किमी लांबीच्या जलवाहिन्या, १०१ किमी लांबीच्या पाणी साठवण टाक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या आणि २ लाख ३२ हजार २८८ पाणी मीटर, ७ नागरी सुविधा केंद्रे आणि ५ नवीन पंपिंग स्टेशन आदी कामे केली जाणार आहेत. हे काम ३६ महिन्यांत म्हणजे फेब्रुवारी २०२३ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, विविध प्रकारच्या अडचणींमुळे आणि कोरोना प्रादुर्भावामुळे दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यामुळे या प्रकल्पाची कामे करण्यास आजवर चार वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.

### अशी आहे टाक्यांची अवस्था...!

- आतापर्यंत ८६ पाणी साठवण टाक्यांपैकी ६५ टाक्यांची कामे पूर्ण
- उर्वरित १० टाक्यांची कामे ५० टक्के पूर्ण
- ९ टाक्यांची कामे ५० टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे २० टक्क्यांच्या आसपास
- दोन टाक्यांना अद्याप जागा मिळण्याची प्रतीक्षा
- काम पूर्ण झालेल्या ६५ पैकी केवळ २२ टाक्यांचा वापर
- उर्वरित ४३ टाक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या व वितरण करणाऱ्या वाहिन्या जोडलेल्या नाहीत
- या टाक्यांचा वापर मागील अनेक महिन्यांपासून होत नाही

**शहरातील सर्व भागांना समान पाणीपुरवठा करण्याचा महापालिका प्रशासनाचा प्रयत्न आहे, त्यामध्ये काही प्रमाणात अडथळे येत असल्याने हे काम अद्यापी पूर्ण झालेले नाही. त्यासाठी प्रशासनाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येत आहे; त्यामुळे येत्या काही दिवसातच त्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.**

**-डॉ. राजेंद्र भोसले,** आयुक्त, पुणे महापालिका

## नदीत अडकलेल्या तरुणांची सुखरूप सुटका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुरूवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास अग्निशमन दल नियंत्रण कक्षात एक तरुण मुंढवा पुलाखाली नदीमध्ये मधोमध अडकला असून मदतीची मागणी करत असल्याचा फोन आला. यानंतर तातडीने अग्निशमल दलातील वाहन बी.टी. कवडे रस्ता येथे रवाना करण्यात आले.

नदीच्या मधोमध एक तरुण पाण्यात अडकला असून तो बाहेर येण्याचा प्रयत्न करत असल्याचे दलातील कर्मचाऱ्यांना दिसले. त्याला अग्निशमल दलातील जवानांनी रश्शी, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग याच्या साह्याने पाण्यातून सुखरुप बाहेर काढले. हा तरुण १९ वर्षांचा असून तो नेमका तिथे कसा गेला याची माहिती मिळू शकलेली नाही.

घटनास्थळी अग्निशमल दलातील कर्मचारी पोहोचताच जवानांनी पाहिले की, नदीच्या मधोमध एक तरुण पाण्यात अडकला असून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचवेळी जवानांनी तातडीने रश्शी, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग याच्या साह्याने पाण्यात उतरत त्या तरुणाजवळ जाऊन त्याला धीर देत त्याच्याशी संवाद साधत, त्याला अवघ्या पंधरा मिनिटातच पाण्यातून सुखरुप बाहेर काढले. त्यानंतर तिथे उपस्थित त्याच्या आई वडिलांकडे त्याला स्वाधीन केले. या कामगिरीत वाहनचालक निलेश भोसले, तांडेल अंबादास दराडे व फायरमन संदिप जगताप, सतिश पोटघन, कुणाल यांनी बचावकार्य पार पाडत तरुणाचा जीव वाचवला.

## यशस्वी होण्यासाठी जिद्द, कष्ट महत्त्वाचे : देव गील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी असलेली जिद्द, परिश्रम, चारित्र्यसंपन्नता, राष्ट्रप्रेम व बंधूभाव या गुणांचा अंगीकार करावा.' असे विचार हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटातील अभिनेते देव गील यांनी व्यक्त केले. गंज पेठेतील मासेआळी परिसरातील 'हिंदराज ग्रुप' आयोजित शिवजयंती उत्सवात ते बोलत होते. याप्रसंगी बालसाहित्यकार व संदर्भतज्ज्ञ प्रसाद भडसावळे उपस्थित होते.

कार्यक्रमात पहिली ट्रिपल महाराष्ट्र केसरी पैलवान भाग्यश्री मंगेश कोळी, राष्ट्रीय क्रीडा मॉडर्न पेटॅथलॉन प्रकारात सुवर्णपदक विजेती श्रावणी नीलवर्ण तसेच अभिनेता देव गिल यांना प्रसाद भडसावळे यांच्या हस्ते 'हिंदराज गौरव भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच परिसरातील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटपही करण्यात आले. याप्रसंगी बोलताना भडसावळे म्हणाले 'देशाचे उज्ज्वल भविष्य व रक्षणाची जबाबदारी आपली आहे, मातृभूमी तसेच परिसरात राहणाऱ्यांसोबतचा स्नेहभाव जपण्याची सवय लहान वयातच अंगीकारावी. हिंदराज ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी मिरवणूकीचा खर्च टाळून कृतज्ञता व मुलांना शैक्षणिक साहित्य भेटीस दिलेल्या प्राधान्याचे विशेष कौतुक वाटते.'



**पुणे** शिवजयंती निमित्ताने हिंदराज ट्रस्टच्या वतीने 'हिंदराज गौरव भूषण' पुरस्कार कार्यक्रमात डावीकडून श्रावणी नीलवर्ण, प्रसाद भडसावळे, भाग्यश्री कोळी, मंगेश कोळी, अभिनेता देव गील.

# हातमागावरील कलात्मक, सुंदर व दुर्मिळ उत्पादनांची पुणेकरांना पर्वणी



'माय प्राईड माय हॅन्डलूम' प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना शेफाली वैद्य, श्रीनिवास राव, मुकुंद कासट व अन्य मान्यवर. हे प्रदर्शन नागरिकांना पाहाण्यासाठी हॉटेल सेंट्रल पार्क, संभाजी उद्यानासमोर, जंगली महाराज रस्ता, पुणे येथे २५ मार्च पर्यंत सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "देशातील १४ राज्यांतील प्रमुख शहरांतील हातमाग कारागिरांनी उभारलेल्या ४० स्टॉल्समधून हातमागावरील कलात्मक, सुंदर आणि दुर्मिळ उत्पादनांची पर्वणी पुणेकरांसाठी खुली झाली आहे. पोचमपल्ली, मदनपल्ली, कलमकरी, कांचीपुरम, गढवाल, वेंकटगिरी, चेंदेरी, माहेश्वरी, इरकल, नयनपेट, बनारस, कोलकाता आणि इतर अनेक शहरातील नाविन्यपूर्ण साड्या, ड्रेस मटेरियलने हे प्रदर्शन सजले आहे. विणकाम, हातमाग कामगारांना प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे," असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका व कापड उद्योगाच्या अभ्यासक शेफाली वैद्य यांनी केले.

विणकर कामगारांना, हातमाग व्यावसायिकांना आणि हातमागावरील कपड्यांना प्रोत्साहन देण्यासाठी इंडियन सिल्क गॅलरीतर्फे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय संचालित हातमाग विकास आयुक्तालयाच्या सहकार्याने आयोजित 'माय प्राईड, माय हॅन्डलूम' या भव्य हातमाग प्रदर्शनाचे (बिगेस्ट हॅन्डलूम एक्झिबिशन) उद्घाटन शेफाली वैद्य यांनी केले. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या सेंट्रल सिल्क बोर्डाचे उपसंचालक (नि.) श्रीनिवास राव, कासट क्रिएशनचे मुकुंद कासट आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रासह १४ राज्यांतील ४० पेक्षा अधिक हातमाग व्यावसायिक व विणकरांनी यात सहभाग घेतला आहे. हॉटेल सेंट्रल पार्क, संभाजी उद्यानासमोर, जंगली महाराज रस्ता, पुणे येथे २५ मार्च पर्यंत सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. शेफाली वैद्य म्हणाल्या, "केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालय, लघु व मध्यम उद्योग आणि खादी ग्रामोद्योग विभागाच्या माध्यमातून विणकर, हातमाग व्यावसायिकांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. स्वदेशी, 'लोकल फॉर ग्लोबल' योजनेमुळे देशभरातील छोट्या व्यावसायिकांना पाठबळ मिळत आहे.

श्रीनिवास राव म्हणाले, "देशभरातील विणकर कामगारांनी केलेली कलाकुसर एकत्रितपणे पुणेकरांसमोर ठेवण्याचा प्रयत्न आहे. महिला वर्गाच्या सौंदर्यात आणि आकर्षणात भर घालणारे हे प्रदर्शन आहे. कुशल कारागिरांच्या हाताने विणलेल्या कपड्यावर सुंदर आणि मोहक नक्षीदार काम झाले आहे. रेशमी वस्त्रांची फारशी ओळख ग्राहकांना नसते. ग्राहकांना शुद्ध आणि हाताने विणकाम केलेल्या साड्या, ड्रेस मटेरियल्स व अन्य कपडे या प्रदर्शनात उपलब्ध करून दिले आहेत.

> या प्रदर्शनात देशाच्या विविध भागात असलेली विशेषता हातमाग, कॉटन, सिल्क, लिनन या कपड्यांच्या माध्यमातून पुणेकरांसमोर ठेवण्याचा प्रयत्न आहे. अतिशय सुंदर कलाकुसर, नक्षी आणि गुणवत्तापूर्ण कपडे उपलब्ध आहेत.
>
> **— शेफाली वैद्य, ,** प्रसिध्द लेखिका

# खाण मालकांची राज्य शासनालाच 'धूळफेक'...!

## भूगर्भातील 'सोन्यावर' बड्या धेंडाचा 'डल्ला'; खाणींमधून बेकायदा उत्खनन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** भूगर्भातील 'सोन्याची खाण' समजल्या जात असलेल्या दगडखाणींच्या माध्यमातून बडी धेंडे राज्य शासनाच्या महसूल खात्यालाच गंडा घालत असल्याचे दाहक वास्तव उजेडात आले आहे; बेकायदा आणि जास्तीचे उत्खनन करुन हे खाण मालक शासनाला जेमतेम महसूल भरत असल्याने राज्य शासनाला महिन्याकाठी कोट्यावधी रुपयांच्या महसूलावर पाणी सोडावे लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे महसूल विभागातील जवळपास सर्वच यंत्रणांची या धेंडाशी 'मिलीभगत' असल्याने या भ्रष्टाचाराला आणखीनच 'बळ' मिळत आहे; विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणावर 'धूळफेक' होत असतानाही महसूल विभाग आणि वरिष्ठ अधिकारीही मूग गिळून गप्प आहेत.

वाघोलीसह राज्यभरात मोठ्या प्रमाणावर दगडखाणी आहेत, या खाणीच्या माध्यमातून शासनाच्या महसूल विभागाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत असतो. मात्र; हे वास्तव असतानाही बहुतांशी दगडखाणींचे मालक या खाणींची सरकार दरबारी




नोंदच करत नसल्याने त्या माध्यमातून शासनाचा महिन्याकाठी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत आहे. तसेच भूगर्भातील जेवढ्या दगडांचे उत्खनन केले जाते त्या प्रमाणात शासनाकडे रॉयल्टी जमा केली जात नाही, विशेष म्हणजे तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भर विधानसभेत याची जाहीर कबूली दिली होती. तसेच या खाणींचे सर्वेक्षण करण्याचे आदेशही थोरात यांनी विधानसभेत दिले होते, तरीही अद्यापही महसूल विभागाने त्यासंदर्भात ठोस निर्णय घेतलेला नाही.

यासंदर्भात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आवाज उठविल्याने तहसिलदार तृप्ती कोलते पाटील यांनी पंधराच दिवसांपूर्वी वाघोलीच्या भागात काही क्रशरवर थेट कारवाई करत त्या बंद करण्याचे आदेश दिले होते, त्यानुसार १७ खाणी बंद करण्यात आल्या होत्या. मात्र; या खाण मालकांनी तहसिलदारांची पाठ फिरताच या खाणी पुन्हा सुरू केल्या आहेत. त्यामुळे महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि खाण मालकांचे लागेबांधे असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.



ज्या क्रशर मालकांकडे अधिकृत कागदपत्रे नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना हे क्रशर बंदच ठेवावे लागणार आहेत, तरीही कोणी हे क्रशर सुरु केले असतील तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असून त्यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही.
**-तृप्ती कोलते पाटील,** तहसिलदार हवेली



या खाणींचा आणि क्रशरचा नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे, त्याशिवाय कोणताही खाण अथवा क्रशर मालक प्रामाणिकपणे रॉयल्टी भरत नसल्याचे राज्य शासनानेही अनेकवेळा मान्य केले आहे. त्यामुळे त्या कायमस्वरुपी बंद कराव्यात अशी आमची मागणी आहे.
**-चंद्रकांत वारघडे,** संस्थापक अध्यक्ष, माहिती सेवा समिती



दगडखाण अथवा क्रशर मालक महसूलामध्ये गोलमाल करत असल्याचे यापूर्वीही निदर्शनास आले आहे, यासंदर्भात अनेकवेळा जिल्हाधिकार्यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. तरीही त्यांच्यावर जाणुनबुजुन कारवाई होत नसल्याचे आतापर्यंत स्पष्ट झाले आहे, त्यामुळे आता थेट राज्य शासनानेच यासंदर्भात कठोर कारवाईची भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.
**-अॅड. बी.एम. रेगे,** संस्थापक अध्यक्ष दगडखाण कामगार परिषद

### असा होतोय नागरिक आणि शासनालाही त्रास

- * पन्नास टक्क्याहून अधिक खाणी आणि क्रशर अनाधिकृत
- * उत्खनन शंभर टक्के, रॉयल्टी केवळ वीस टक्के
- * परवानगी नसतानाही डंपरमध्ये भरला जातोय अतिरिक्त माल
- * पंधरा किलोमीटरच्या परिसरातील नागरिकांना श्वसनाचा त्रास
- * वीजेचाही अनाधिकृत वापर
- * ब्लास्टिंग केल्यानंतर घराच्या भिंतीना तडे
- * प्रदूषण मंडळाच्या नियमावलीला केराची टोपली
- * खडीच्या डंपरमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली
- * परिसरात पसरतेय धुळीचे साम्राज्य



## पर्यावरणपूरक रंगपंचमी उत्साहात साजरी

**पुणे :** शहरभर जलक्रीडेसह रंगांची उधळण करून रंगपंचमी साजरी करण्याची परंपरा असली तरी आपुलकी प्रतिष्ठान आणि भारती विद्यापीठ मॉर्निंग ग्रुपने यंदा नैसर्गिक कोरड्या रंगांची उधळण करून अनोखी रंगपंचमी साजरी केली. "आपली संस्कृती जपूया आणि पुढे नेऊया" या उद्देशाने जलवाचवा आणि पर्यावरणपूरक रंगांचा संदेश देत हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. सकाळी ग्रुपच्या सदस्यांनी नैसर्गिक गुलाल व फुलांच्या पाकळ्यांसह एकमेकांना रंग लावून सणाचा आनंद घेतला. पाण्याचा अपव्यय टाळत त्यांनी पर्यावरणपूरक पद्धतीने रंगपंचमी साजरी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते किरण काळे यांनी नागरिकांना संदेश दिला, "रंगपंचमी म्हणजे जलसंपत्तीचा अपव्यय न करता आनंद लुटण्याचा सण. नैसर्गिक रंगांचा वापर केल्याने त्वचेवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही आणि पाणीही वाचते.



## चित्र रेखाटून चिमणी संवर्धनासाठी शालेय विद्यार्थ्यांचा पुढाकार

**पुणे :** नवीन मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी आज जागतिक चिमणी दिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. पहिली ते चौथीतील 300 विद्यार्थ्यांनी चिमणीची चित्रे रेखाटून चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी उभारण्याचा तसेच त्यांच्यासाठी एक घास व पाणी देण्याची शपथ घेतली, पियूष शाह यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाला समिती अध्यक्ष राजेंद्र जोग व मुख्याध्यापिका कल्पना वाघ यांचे विशेष सहकार्य लाभले. शिक्षिका योगिता भावकर, पुष्पा देशमाने, धनंजय तळपे, तनुजा तिकोने, मीनल कचरे तसेच साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा, शिवाजी मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद थोरात, ऋत्विक आदमूलवर, संयुक्त मित्र मंडळाचे अध्यक्ष निलेश पायगुडे, चैतन्य मारणे यांची उपस्थिती होती. जागतिक चिमणी दिनाचे महत्त्व सांगत पियूष शहा यांनी चिमण्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

## साडेतीन हजार अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा बडगा

**पुणे :** पुणे शहराभोवती असणाऱ्या राष्ट्रीय, राज्यमार्गावरील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या बांधकामांमुळे वाहनधारकांना सातत्याने वाहतूक कोंडीच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पुढाकार घेत इतर शासकीय यंत्रणांच्या मदतीने गत काही दिवसात जवळपास साडेतीन हजार अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी पीएमआरडीएसह राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पीएमसी, पीसीएमसी यांनी अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी संयुक्तरित्या विशेष मोहीम हाती घेतली आहे. डिसेंबर २०२४ पासून १७ मार्च २०२५ पर्यंत साधारण साडेतीन हजार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. यात प्रारंभी नगर वाघोली रोडवर डिसेंबर २०२४ मध्ये सातत्याने कारवाई करण्यात आली. यात जवळपास ८२२ अनधिकृत बांधकामांवर हातोडा पडल्याने ८२ हजार २०० चौरस फुटांवरील अतिक्रमणे पथकाच्या माध्यमातून जमिनदोस्त करण्यात आली होती. लक्ष्मी चौक, हिंजवडी व नवले ब्रिज,सातारा रोड भागात पण कारवाई करण्यात आली. पुणे शहर परिसरातील राष्ट्रीय व राज्यमार्गावरील अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी पहिल्या टप्प्यात ३ ते २० मार्चदरम्यान पुणे नाशिक रोड, पुणे सोलापूर रस्ता आणि चांदणी चौक पौड रस्ता या भागातील अतिक्रमणाविरुद्ध धडक मोहिम आखली आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणांची संख्या अधिक असल्याने पीएमआरडीएकडून दुसऱ्या टप्प्याची मोहीम १७ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत राबवण्यात येत असून पुणे - सातारा रोड (नवले ब्रिज ते सारोळे), सुस रोड, हडपसर (शेवाळवाडी) ते दिवे घाट, नवलाख उंब्रे ते चाकण, हिंजवडी परिसर - माण, तळेगाव - चाकण - शिक्रापूर या भागात कारवाई करण्यात येणार आहे.

# 'एसटीपी' प्रकल्पांवर महापालिकेचा 'वॉच'

## दूषित पाणी रोखण्यासाठी महापालिकेचा निर्णय;अतिरिक्त आयुक्त साधणार समन्वय

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत सांडपाणी आणि मैलापाणी नदीत सोडले जात असल्याने नदीचे पाणी अधिकच दूषित होत आहे; त्यामुळे त्याचा फटका नागरिकांना सहन करावा लागत असून आजाराचे प्रमाणही वाढत आहे. विशेष म्हणजे या दूषित पाण्यामुळे ग्रामीण भागातील नदीकाठच्या गावांना आणि तेथील नागरिकांनाही त्रास होत आहे, धक्कादायक बाब म्हणजे या पाण्यामुळे शेतीही नापिक होत आहे. त्यामुळे राज्य शासन आणि विशेषत: प्रदूषण नियत्रंण मंडळाने महापालिका प्रशासनावर सातत्याने ताशेरे ओढले असून कोट्यावधी रुपयांचा दंडही ठोठावला आहे, त्याची आता प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. असे पाणी सोडल्याचे आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे, हा प्रयोग यशस्वी झाल्यास नागरिक आणि प्रशासनालाही त्याचा लाभ होणार आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील तीनशेहून अधिक मोठ्या गृहप्रकल्पात उभारण्यात आलेले सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रीया प्रकल्पांवर आता महापालिका 'वॉच' ठेवणार आहे. हे प्रकल्प चालू आहेत की नाही यासाठी हे प्रकल्प 'ऑनलाईन' पद्धतीने मध्यवर्ती केंद्राशी जोडण्याचा विचार प्रशासनाकडून सुरु आहे. तसेच सोसायट्यांकडून होणाऱ्या पाण्याच्या अतिरीक्त वापर कमी करण्याविषयी उपाययोजना केली जाणार आहे. गुरुवारी अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. हे जायका प्रकल्प, नदी काठ सुधार प्रकल्प आदींच्या कामाचा आढावा घेणार आहेत.

जुलै महिन्यात खराडी, वारजे, वडगांव, मुंढवा आणि मत्स्य बीज केंद्र (मांजरी ) येथील एसटीपी प्रकल्प कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पांत मैलापाणी आणि सांडपाणी हे वाहीन्यातून आणले जाणार आहे. या वाहीन्या जोडण्याच्या कामाचा आढावा बैठकीत घेतला जाणार आहे. नदीकाठ सुधार प्रकल्पातील बंडगार्डन येथील पहीला टप्पा लवकरच सुरु होईल. या भागात नदीत थेट जाणारे सांडपाणी आणि मैलापाणी एसटीपी प्रकल्पांकडे वळविण्यासंदर्भात बैठकीत चर्चा होणार आहे.

शंभराहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या गृहप्रकल्पांत सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रीया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. यासाठी गृहप्रकल्पांना मिळकत करात सवलतही दिली जाते. परंतु हे प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित नसल्याचे अनेकवेळा आढळून आले आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने हे प्रकल्प मध्यवर्ती केंद्राशी जोडण्यात येणार आहे. त्यादृष्टीने विचार चालू आहे. यामुळे कोणत्या गृहप्रकल्पातील एसटीपी बंद आहे, याची माहीती तत्काळ मिळण्यास मदत होणार आहे.

### चोवीस तास पाणी पुरवठा योजनेचा आढावा


- शहरात सुरु असलेल्या महत्वाच्या प्रकल्पांमध्ये चोवीस तास पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा आढावा घेतला जाणार आहे. काम पुर्ण झालेल्या ४५ झोनमध्ये सध्या पाहणी सुरु आहे. जुन्या वाहीन्यातूनही काही भागात अद्याप पाणी पुरवठा होत असल्याचे आढळून आले आहे. जुन्या जलवाहीन्यांचे नकाशेच उपलब्ध नसल्याने अडचणी येत आहे. तसेच जलवाहीन्या टाकण्याचे काम पुर्ण झालेल्या भागांत किती पाण्याचे मीटर बसविले गेले, आदी स्वरुपाचा आढावा घेतला जाणार आहे.



जायका प्रकल्पातंर्गत अकरा एसटीपी (मैलापाणी व सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प ) उभे केले जात आहे. यातील पाच प्रकल्प हे जुलै महीन्यात कार्यान्वित होत आहे. मुळा - मुठा नदीत सोडल्या जाणाऱ्या पाण्यातील दुषित घटकांचे प्रमाण कमी करण्यासाठी हे प्रकल्प महत्वाचे ठरणार आहे. प्रकल्पात प्रक्रीया केलेले पाणी नदीत सोडले जाणार आहे. यापार्श्वभुमीवर विविध विभागांचे समन्वय असणे गरजेचे आहे. त्यासाठी आढावा बैठक घेतली जाणार आहे.
**-पृथ्वीराज बी. पी.** अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा

## गौरव आहुजाचा येरवडा कारागृहातील मुक्काम वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील येरवडा भागातील एका चौकात अलिशान कार थांबवून सिग्नलच्या खांबावर लघुशंका केल्याचा घृणास्पद प्रकार घडला होता. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी गौरव आहुजा आणि त्याचा मित्र भाग्येश ओसवाल यांना अटक केली होती. यानंतर न्यायालयाने दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावणी होती. या प्रकरणात आरोपी गौरव आहुजाचा मित्र भाग्येश ओसवाल याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन.एस बारी यांनी 50 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटी शर्तींवर जामीन मंजूर केला आहे. तर गौरव आहुजाचा येरवडा कारागृहातील मुक्काम वाढला आहे.

या प्रकरणातील आरोपी गौरव आहुजा आणि भाग्येश ओसवाल या दोघांनाही न्यायालयाकडे जामीन अर्ज केला होता. या प्रकरणात भाग्येश याचा सहभाग अत्यल्प असल्याचे युक्तीवाद त्याच्या वकिलांनी न्यायालयात होता. त्यानुसार त्याला ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर अटी शर्तीवर जामीन मंजूर करण्यात आला आहे. मद्यधुंद अवस्थेत गौरव आहुजा (वय 25) या तरूणाने भर चौकात कार थांबवून लघुशंका केली होती. तसेच अश्लील कृत्य केले होते. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी दोघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता.

आरोपी गौरव आहुजा आणि त्याचा मित्र भाग्येश ओसवालने जामीन अर्ज केला होता. मात्र, गौरव आहुजा याने केलेल्या जामीन अर्जावर म्हणणे मांडण्यासाठी येरवडा पोलिसांनी मुदतवाढीची मागणी केली. त्यानुसार आता गौरव आहुजचा येरवडा कारागृहातील मुक्काम वाढणार आहे. एफआयआरमध्ये गौरव याचा मित्र भाग्येश हा कारमध्ये बसला होता. त्याने रस्त्यावर लघुशंका केली नाही. आरोपी तपासणीसाठी केव्हाही उपलब्ध होईल. त्यामुळे तो जामिनासाठी पात्र ठरतो, असा युक्तिवाद बचाव पक्षाकडून अॅड. पुष्कर दुर्गे यांनी केला. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरुला असून भाग्येश ओसवाल याला न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे.0

## कचऱ्याच्या पिंजऱ्याला दिले कलात्मक रूप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील घनकचरा व्यवस्थापनातील पुनर्वापराकरिता साठवण्यासाठी लागणाऱ्या कचऱ्याच्या पिंजऱ्याला कलात्मक रूप देण्यात आले आहे. सुटसुटीत आणि सहज हाताळता येण्यासारख्या पिंजऱ्याचे नवे प्रारूप डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेनच्या (बीएनसीए) २० विद्यार्थिनींनी तयार केले आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून हे प्रारूप पुणे महापालिकेच्या सिंहगड रस्ता प्रभागातील आनंदनगर भागात बसवण्यात आले असून, स्थानिक नागरिक आणि कचरावेचकांकडून त्याचा वापर करण्यात येत आहे.

शहरातील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनातील कागद, काच आणि प्लॅस्टिक वेगळे करून पिंजऱ्यात वर्गवारीनुसार ठेवले जाते. या पिंजऱ्याच्या नव्या प्रारूपाची रचना विद्यार्थिनींनी केली. प्रा. महेश बांगड यांच्या मार्गदर्शनाखाली तृप्ती थापा, मोहिनी मांडके यांच्यासह एकूण २० विद्यार्थिनींनी कचरावेचकांच्या गरजा विचारात घेऊन नवा पिंजरा तयार केला. 'स्वच्छ' या संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक गंधार जोशी यांनीही त्यासाठी सहकार्य केले. या पिंजऱ्याचे प्रारूप नॅशनल असोसिएनश ऑफ स्टुडंट्स ऑफ आर्किटेक्चरतर्फे (नासा) आयोजित केलेल्या ६७ व्या वार्षिक नासा डिझाईन स्पर्धेसाठी पाठवण्यात आले होते.



पुणे सुटसुटीत आणि सहज हाताळता येण्यासारख्या पिंजऱ्याचे नवे प्रारूप डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेनच्या (बीएनसीए) २० विद्यार्थिनींनी तयार केले आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून हे प्रारूप पुणे महापालिकेच्या सिंहगड रस्ता प्रभागातील आनंदनगर भागात बसवण्यात आले आहे.

# सिंहगड स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटमध्ये विविध विषयावर चर्चासत्र





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे या संस्थेच्या वतीने उद्योग केंद्रित चर्चासत्र मालिका, नॉव्हेगेटिंग द फ्युचर:ट्रेंडस अॅड इनोव्हेशन्स अॅक्रॉस इंडस्ट्रीज' आयोजित केली होती. यामध्ये प्रामुख्याने मानव संसाधन व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन, उत्पादन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यातील उद्योन्मुख बदल आणि नवकल्पनावर चर्चा केली.

कार्यक्रमाची सुरूवात श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या संचालिका डॉ. प्रिया आगाशे यांच्या प्रेरणादायी प्रास्ताविकेने झाली. आपल्या भाषणात त्यांनी तंत्रज्ञानातील बदल आणि नवसंशोधन आत्मसात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले, तसेच कौशल्याधारीत शिक्षणाची गरज कशी वाढत आहे यावर चर्चा केली.

या शैक्षणिक चर्चासत्रामध्ये गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपचे महाव्यवस्थापक वैभव आर. गोंधळेकर यांनी मानव संसाधन व्यवस्थापनातील कृत्रिम बुद्धिमतेची भूमिका, इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्सचे वरिष्ठ क्षेत्र प्रमुख सुनिल कुमार सिंग, व्हीपी इंटननॅशनल बिझनेस चोमल एक्सपोर्टसचे जयंत व्ही. टिल्लू यांनी जागतिक बाजारपेठेतील प्रवेश, ग्लोबल इन्व्हेटंरी मॅनेजमेंट, बेकार्ट इंडस्ट्रीजच्या श्रीमती प्रणोती अक्षय भागवत यांनी उत्पादन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनात इंटरनेट ऑफ थिंग्ज याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा समारोप सिंहगड इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालिका डॉ. प्राची पारगांवकर यांच्या समारोपीय भाषणाने झाला. आपल्या भाषणात त्यांनी सातत्यपूर्ण शिक्षण आणि नवसंकल्पनावर आधारीत धोरणे भविष्यातील व्यवसायिकांसाठी किती महत्त्वाची आहेत यावर भर दिला. विद्यार्थी आणि प्राध्यापकांकडून या चर्चासत्राला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी भरुन काढण्याचा एक महत्त्वाचा मंच ठरला.



## ऑर्केस्ट्रा आणि नृत्याविष्काराचे आयोजन

**पुणे :** मुंबईतील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) च्या वतीने हाती घेण्यात आलेल्या 'एनसीपीए ॲट दि पार्क' उपक्रमांतर्गत पुण्यात 'सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया' आणि 'नृत्योल्हास' या कार्यक्रमांचे आयोजन २३ मार्च रोजी करण्यात आले आहे. नगर रस्त्यावरील फिनिक्स मार्केटसिटीमधील लिबर्टी स्क्वेअर येथे सायं ६.३० वाजता कार्यक्रम होणार असून ते सर्वांसाठी विनामूल्य आहे. नृत्य-नाट्य, आंतरराष्ट्रीय संगीत, पाश्चात्य शास्त्रीय संगीत, भारतीय संगीत अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा अनोखा आणि आकर्षक अनुभव कलारसिकांना देण्याच्या उद्देशाने एनसीपीएच्या वतीने 'एनसीपीए ॲट दि पार्क' हा उपक्रम हाती घेतला असून याद्वारे पहिल्यांदाच पुण्यामध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया'च्या सादरीकरणाने कार्यक्रमाला सुरुवात होईल. यामध्ये प्रसिद्ध संगीतकारांच्या आयकॉनिक रचनांचा संग्रह, शास्त्रीय संगीताच्या समृद्ध परंपरांमधून आधुनिक कलाकृतींकडे होणारा प्रवास उलगडणाऱ्या ऑर्केस्ट्रा कलाकृती, भावपूर्ण सूर आणि कलाप्रिय सादरीकरणे उपस्थितांना अनुभविता येतील. यानंतर 'नृत्योल्हास' या कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध भरतनाट्यम नर्तक पी प्रवीण कुमार, चिथकला स्कूल ऑफ डान्स यांचे सादरीकरण होईल. परमात्मा आणि जीवात्मा यांमधील परस्परसंबंधांवर आधारलेले हे सादरीकरण असेल.

## ४८ शिक्षक व २ अधिकारी जाणार सिंगापूरला

**पुणे :** स्टार प्रकल्पांतर्गत राज्यातील ४८ शिक्षक व २ अधिकारी असे एकुण ५० जण नाविन्यपूर्ण उपक्रमांची, योजनांची माहिती जाणून घेण्यासाठी सिंगापूरचा अभ्यास दौरा करणार आहेत. २२ ते २७ मार्च या कालावधीत हा अभ्यास दौरा होणार आहे. स्टार प्रकल्पातंर्गत देशातंर्गत व देशाबाहेर अभ्यास दौऱ्यासाठी प्रती व्यक्ती दोन लाख रुपये याप्रमाणे १५० व्यक्तीकरीता तीन कोटी रुपये तरतूद मंजूर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या वैविध्यपूर्ण, नाविन्यपूर्ण उपक्रमांची, योजनांची माहिती जाणून घेऊन या उपक्रमांची आपल्या राज्यात अंमलबजावणी करण्याची शक्यता पडताळणी करण्याच्या अनुषंगाने हा अभ्यास दौरा काढण्यात येत आहे. या दौऱ्याचा संपूर्ण खर्च शालेय शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदे मार्फत स्टार्स प्रकल्पांतर्गत तरतूदीतून करण्यात येणार आहे. दौरा पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या दौऱ्यासंबंधीचा विस्तृत अहवाल प्रशासकीय विभागास तसेच सामान्य प्रशासन विभागास सादर करावा लागणार आहे. दौऱ्यात प्राप्त केलेल्या ज्ञानाचा, कौशल्याचा उपयोग अन्य अधिकारी, शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यासाठी करावा लागणार आहे. याबाबत शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी आदेश जारी केले आहेत.

## वाडेबोल्हाई सोसायटीच्या चेअरमन पदी मालन पायगुडे



**वाघोली :** वाडेबोल्हाई विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी मालन कुंडलिक पायगुडे यांची बिन विरोध निवड पार पडली तर हिराबाई ज्ञानेश्वर चव्हाण यांची व्हॉईस चेअरमन पदी बिनविरोध निवड पार पडली.या बिनविरोध निवडी पार पडण्यासाठी जिल्हा बँकेचे माजी संचालक माणिकराव गोते यांनी प्रयत्न केले. या निवडीबद्दल जिल्हा बँकेचे माजी संचालक माणिकराव गोते,शिरसवडीचे माजी सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष संदीप गोते, वाडेबोल्हाईचे माजी उपसरपंच संजयराव भोरडे पाटील,बोल्हाई देवी देवस्थानचे चेअरमन बळीराम गावडे,देवस्थानचे विश्वस्त राजेंद्र इंगळे,दिंडीचे संचालक विजय पायगुडे यांच्या हस्ते चेअरमन मालन पायगुडे;व्हॉईस चेअरमन हिराबाई चव्हाण यांचा सत्कार पार पडला. याप्रसंगी माजी उपसरपंच अशोक इंगळे,पंडीत पायगुडे,संजय पायगुडे,हर्षवर्धन चव्हाण,सूर्यकांत गावडे,अशोक भोरडे,शिवाजी भोर,संदिप भोर,संभाजी पायगुडे,माऊली पायगुडे,शुभम ढमढेरे,संतोष पायगुडे,निलेश पायगुडे,सुभाष पायगुडे तात्यासाहेब पायगुडे,राजेंद्र पायगुडे,अण्णासाहेब पायगुडे,आबासाहेब पायगुडे,नानासाहेब पायगुडे,भुजंग पायगुडे,महेश पायगुडे,गणेश पायगुडे,उद्धव पायगुडे,सागर पायगुडे,आदी मान्यवर उपस्थित होते.

## कोंढव्यात पार्किंगचा वाद; एकमेकांवर वार

**पुणे :** पुण्यातील कोंढव्यामध्ये पार्किंगवरून तुफान राडा झाला. दोन तरुणांनी धारधार शस्त्रांनी एकमेकांवर वार केले. या घटनेमध्ये दोघेही जखमी झाले आहेत. यामधील एक व्यक्ती कोंढवा परिसरामध्ये अट्टल गुन्हेगार आहे. त्याने आपल्या गाडीला पोलिस पाटी लावली होती. पार्किंगच्या वादातून ही हाणामारी झाली. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली. कोंढव्यातील कौसर बाग येथे गणेश पसर (३२ वर्षे) या तरुणाने रस्त्यावर कार पार्क केली होती. कार पार्किंगवरून वाद झाला. अफाक आशफाक शेख (30 वर्षे) या तरुणाने गणेश पसरला कार पार्क करण्यास अडवले. यावरून दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. या हल्ल्यामध्ये दोन्ही तरुण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतलं. त्यांना तातडीने ससून रुग्णालयात उपचारासाठी हलवले. दोघांवर देखील उपचार झाल्यानंतर त्यांचे जबाब घेण्यात आले. याप्रकरणी दोन्ही तरुणांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली. पोलिसांना कारमध्ये हत्यारे सापडली.

## गुरुवर्यांच्या आसनाची पूजा...!



**पुणे** कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे नाथषष्ठी योगाभ्यानंद प.पू.माधवनाथ महाराज इंदौर यांचे साधने समयी आसन असलेले ९० पेक्षा जास्त वर्षांपूर्वीचे व्याघ्रांबर व शाल यांचे पूजन मंदिरात झाले. यावेळी उपस्थित विश्वस्त व मान्यवर.

## योगाभ्यानंद प.पू. माधवनाथ महाराज यांच्या व्याघ्रांबर व शाल पूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुधवार पेठेतील कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट तर्फे नाथ षष्ठी निमित्त योगाभ्यानंद प.पू. माधवनाथ महाराज इंदौर यांचे साधने समयी आसन असलेले ९० पेक्षा जास्त वर्षांपूर्वीचे व्याघ्रांबर व शाल यांचे पूजन मंदिरात झाले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई व कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई यांचे प.पू.माधवनाथ महाराज हे अध्यात्मिक गुरु होते. त्यामुळे याचे पूजन दरवर्षी मंदिरात करण्यात येते.

यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे, कार्यकारी विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, खजिनदार ॲड. रजनी उकरंडे, विश्वस्त महेंद्र पिसाळ, ॲड. शिवराज कदम जहागिरदार, डॉ. पराग काळकर, युवराज गाडवे यांसह ट्रस्टचे माजी अध्यक्ष शिरीष मोहिते, विश्वस्त बी.एम. गायकवाड आदी उपस्थित होते.

# मुंढव्यात कंटेनरमुक्त प्रभाग योजना फेल

## कचऱ्याचे ढीग; अपयश झाकण्यासाठी कचरा जाळण्याचा प्रताप

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत कचरा समस्येने चांगलेच रौद्ररुप धारण केले आहे; विशेष म्हणजे उपनगरात ही समस्या प्राधान्याने भेडसावत असून त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात आल्या होत्या. मात्र; त्याचे योग्य नियोजनच होत नसल्याने बहुतांशी योजना या धूळखात पडून आहेत. तशाच पध्दतीने महापालिका प्रशासनाने 'कंटेनरमुक्त प्रभाग' ही योजना सुरु केली होती, विशेष म्हणजे त्यासाठी मोठा गाजावाजा करण्यात आला होता,परंतु काही दिवसातच या योजनेने गाशा गुंडाळला आहे. मुंढवा, केशवनगरमध्ये तर या योजनेचे अक्षरश: 'तीनतेरा' वाजले आहेत. त्यामुळे कडक उन्हाळा असतानाही हा कचरा पेटविला जात आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असून महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी मूग गिळून गप्प आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंढवा, केशवनगर, घोरपडी, शिंदेवस्ती, बी. टी. कवडे रोड परिसरात महापालिकेकडून घंटागाडीच्या माध्यमातून कचरा गोळा केला जातो. तरीही काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूला कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येत आहेत. तसेच, काही ठिकाणी कचराही पेटविला जात असल्याने परिसरात हवेचे प्रदूषण होत आहे. यामुळे परिसरात 'कंटेनरमुक्त प्रभाग' योजना अपयशी ठरल्याचे चित्र दिसून येत आहे.

उन्हाची तीव्रता सध्या वाढली आहे. त्यातच रस्त्याच्या बाजूंना ठिकठिकाणी कचरा जाळला जात आहे. कचरा गोळा करणारी वाहने आणि कर्मचारी येण्यापूर्वी पहाटे किंवा सकाळी कचरा पेटविलेला जात असल्यामुळे परिसरातील नागरिकांना आणि वाहनचालकांना धुराचा सामना करावा लागत आहे. तसेच, ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे चित्रही सध्या दिसून येत आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

बी. टी. कवडे रोड परिसरातील वात्सल्य शाळा ते पवार बागदरम्यान असलेल्या रस्त्याच्या पदपथावर दररोज मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. तसेच, या ठिकाणी अनेक वेळा कचरा पेटविला जात आहे. यामुळे विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालकांना धुराचा त्रास सहन करावा लागत आहे. पदपथावर कचरा टाकला जाऊ नये यासाठी प्रशासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच, कचरा पेटविणाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

महापालिकेकडून गेल्या काही वर्षांपासून 'कंटेनरमुक्त प्रभाग' योजना राबविली जात आहे.

नागरिकांच्या घरोघरी जाऊन घंटा गाड्यांच्या माध्यमातून कचरा गोळा करण्याची व्यवस्था केली. मात्र, महापालिकेची ही योजना परिसरात अपयशी ठरली असल्याचे चित्र सध्या दिसून येत असून, ठिकठिकाणी दररोज कचऱ्याचे ढीग साचल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे 'कंटेरमुक्त प्रभाग' योजना राबवून महापालिकेने काय साध्य केले, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

> घोरपडी परिसरात रस्त्यांच्या बाजूंना ठिकठिकाणी कचरा टाकला जात असून, काही ठिकाणी तो पेटवलाही जात आहे. रात्री दहा ते बारा या वेळेमध्ये कचरा टाकला जातो. याबाबत ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या मोहल्ला कमिटीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित केला होता. मात्र, त्यावर अद्यापही उपाययोजना झालेली नाही.
>
> **- हेमंत किरुळकर,**
> सहायक आयुक्त, ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय

> कचऱ्याचे ढीग का साचत आहेत, तसेच कचरा का जाळला जात आहे, याची माहिती घेऊन त्याला जबाबदार असलेल्यांवर कारवाई केली जाईल. तसेच, परिसरातील कचरा दररोज उचलण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील.
>
> **- प्रदीप परदेशी,**
> अध्यक्ष, ओबीसी विभाग, पुणे शहर-जिल्हा काँग्रेस कमिटी

## एसटी बंद पडल्यास त्याच तिकिटावर प्रवास करता येणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** प्रवासात काहीवेळा तांत्रिक बिघाडामुळे एसटी बस रस्त्यात बंद पडत असल्याच्या घटना घडतात. किंवा किरकोळ अपघाताच्या घटनाही घडतात, अशावेळी बसमधील प्रवाशांना पुढे जाण्यासाठी उशीर होतो, मन:स्ताप सहन करावा लागतो. प्रवासात एसटी बंद पडल्यास त्या मार्गावर साधी बसच नव्हे तर आता उच्च श्रेणीच्या बसनेही प्रवाशांना प्रवास करता येणार आहे. त्यासाठी जादा तिकीट दरही द्यावा लागणार नाही. प्रवास नाकारल्यास किंवा त्याबाबत तक्रार आल्यास संबंधित चालक आणि वाहकावर कारवाई होणार असल्याच्या सूचना राज्यमार्ग परिवहन महामंडळाकडून देण्यात आले आहे.

प्रवाशांची ही गैरसोय टाळण्यासाठी एसटीकडून त्या मार्गावरून येणाऱ्या दुसऱ्या एसटी बसने प्रवाशांना सुविधा दिली जाते. मात्र, साधी बस (लालपरी, विना वातानुकुलीत) बंद पडल्यास उच्च श्रेणीच्या बस (वातानुकुलीत आणि आरामदायी) थांबत नसे. थांबल्याच तर प्रवाशांकडून तिकीटाचा फरक वसूल केला जात होता.

मात्र, आता एसटीकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार प्रवासात साधी बस बंद पडल्यावर त्याच मार्गावरून येणाऱ्या बसमधून प्रवाशांना तत्काळ सुविधा देणे बंधनकारक आहे. त्यामध्ये उच्चश्रेणीच्या बसचाही समावेश करण्यात आला असून, त्यासाठी तिकीटाचा फरक घ्यायचा नाही. आहे त्याच तिकिटावर प्रवास सुविधा द्यायची, असे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि मनस्ताप वाचणार असून, सुविधा तात्काळ उपलब्ध होणार आहे.

दरम्यान, या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून, चालक वाहकांच्या माहितीकरिता परिपत्रकाची प्रत सूचना फलकावर प्रसारित करावी. तक्रारी आल्यास संबधितांवर कारवाई केली जाईल, असेही राज्यमार्ग परिवहन महामंडळाकडून सांगण्यात आले.

## कसब्यातील भुयारी मार्गांच्या 'डीपीआर' ला 'ग्रीन सिग्नल'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील मध्यवर्ती भागात वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा या दोन महत्त्वाकांक्षी भुयारी मार्गांच्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत भुयारी मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्याची माहिती कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी दिली आहे.

शहराचा मध्यवर्ती भाग असणाऱ्या कसबा मतदारसंघात प्रमुख बाजारपेठा तसेच धार्मिक आणि ऐतिहासिक वास्तू असल्याने दररोज हजारो नागरिक या भागामध्ये येत असतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र कायम पाहायला मिळते. या भुयारी मार्गांच्या माध्यमातून वाहतुकीला गती मिळाल्याने वेळ आणि इंधनाची बचत होईल. आमदार हेमंत रासने म्हणाले, "दाट लोकवस्ती आणि अरुंद रस्त्यांमुळे या भागात उड्डाणपुलाचा पर्याय शक्य नसल्याने आम्ही भुयारी मार्गांची संकल्पना पुढे आणली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून याबद्दलचे निवेदन देण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करण्याची सूचना प्रशासनास केली.



**पुणे** पुणे शहरातील मध्यवर्ती भागात वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा या दोन महत्त्वाकांक्षी भुयारी मार्गांच्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात पार पडली.

# गरीबांच्या 'फ्रीज'च्या खरेदीसाठी नागरिकांची झुंबड




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता जाणवत असून, त्यामुळे थंडगार पाणी पिण्याचा मोह सर्वांनाच होतो. त्यामुळे 'गरिबांचा फ्रिज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठांच्या मागणीत वाढ झाली आहे. फिरत्या विक्रेत्यांसोबतच रस्त्याकडेला थाटलेल्या दुकानांमध्ये आजकाल रंगीबेरंगी माठांच्या रांगा आणि खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. शहरातील उन्हाचा पार ३६ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. फ्रिजमधील थंड पाणी पिण्यास आरोग्यास बाधक असल्यामुळे तहान भागविण्यासाठी माठातील थंड पाणी पिण्यास प्राधान्य दिले जात आहे.

### पाणी माठात गार कसे राहते?

- माठातील पाणी थंड होणे बाष्पीभवनाच्या क्रियेवर (इव्हॅपोरेशन) अवलंबून असते. जेवढे जास्त बाष्पीभवन होते, तेवढे पाणी थंड होते. धातूच्या भांड्याच्या तुलनेत बाष्पीभवन प्रक्रिया मातीच्या भांड्यात लवकर होते. कारण मातीच्या भांड्यात लहान छिद्रे असतात. माठातील पाणी या छिद्रांमधून माठाच्या पृष्ठभागावर येते आणि बाहेरील उष्णतेमुळे बाष्पीभवन प्रक्रिया होते. या प्रक्रियेत माठाच्या आतील भागाचे तापमान कमी होते. बाष्पीभवनाची ही प्रक्रिया उन्हाळ्यातच चांगल्या प्रकारे होते, त्यामुळे उन्हाळ्यात धातूच्या भांड्यांच्या तुलनेत माठात पाणी थंड राहते. अधिक थंड पाण्यासाठी त्यावर ओले कापड गुंडाळले जाते. जेणेकरून बाहेरील उष्णतेचा प्रभाव माठातील पाण्यावर जास्त होणार नाही.

### या माठांना सर्वाधिक मागणी...

- पांढऱ्या, लाल व चिनी मातीपासून तयार केलेल्या माठांना अधिक पसंती मिळत आहे. नळ असलेले माठ हेदेखील सोईस्कर असल्याने नागरिकांचा कल त्यांच्याकडे असतो.

### असे आहेत दर

- *मोठा नक्षीदार माठ - ४०० रुपये
- * लहान - १०० पासून पुढे
- * काळा माध्यम आकाराचा माठ - २०० पासून पुढे
- *लाल माध्यम आकाराचा माठ - ३०० पासून पुढे



## पोलिसांकडून ६८३ किलो गांजा नष्ट ची कारवाई

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पोलिसांनी मागील काही महिन्यांत केलेल्या ५२ कारवायांमधील ६८३.८३० किलो गांजा नष्ट केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत ही कारवाई करण्यात आली असल्याचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व शासकीय विभागात सात कलमी कार्यक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये शासकीय सेवा नागरिक केंद्रित करण्यावर आणि शासकीय कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे, स्वच्छता आदींचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मागील काही महिन्यांमध्ये गांजा विक्री, बाळगल्या प्रकरणी मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या आहेत. त्या कारवायांमध्ये जप्त केलेला गांजा साठवून ठेवण्यात आला होता. अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) विवेक पाटील, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांच्या प्रतिनिधी पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार केले आहे. या पथकाने हि कामगिरी केली.

## आंद्रा धरणावर जलउपसा केंद्रासाठी जागेची प्रतीक्षा!

**पिंपरी :** आंद्रा धरणातून पिंपरी-चिंचवड महापालिकेस अशुद्ध जलउपसा केंद्र, अ‍ॅप्रोच चॅनेल पंप हाउस, अ‍ॅप्रोच ब्रीज व सबस्टेशन इ. बांधणेकामी पुणे पाठबंधारे विभागाची जागा मिळावी, त्यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन दिले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात निकडीची बाब म्हणून जागा मागणीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

## नगर भूमापन कार्यालयाच्या कामकाजाची “सूसुत्रता”

**पिंपरी-चिंचवड :** भूमी अभिलेख कार्यालय ता. हवेली जि. पुणे अंतर्गत येणारी मनपा हद्दीतील काही गावे नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड यांचेशी संलग्न करणेबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जमाबंदी आयुक्तांना दिले आहेत. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी नगर भूममापन कार्यालयाच्या कामकाजात सूसुत्रता आणण्याबाबत मागणी केली.

## नगरपालिका बांधत असलेल्या शौचालयास विरोध

**चिंचवड :** नगरपालिका चाळ, खालची खोपोली येथे समाजमंदिर आणि कब्रस्तान आहे. याठिकाणी नगरपालिकेच्या माध्यमातून शौचालय बांधले जात आहे. या शौचालयाच्या बांधकामास सर्वधर्मीयांचा विरोध असल्याचे पत्र मुख्याधिकारी यांच्याकडे दिले आहे. या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधून सुशोभिकरण करण्याची मागणी होत आहे. समाजमंदिर तसेच मुस्लीम बांधवांचे कब्रस्तान आहे. याठिकाणी शौचालय बांधल्यास दुर्गंधी पसरू शकते. त्यापेक्षा येथे महापुरुषांचे स्मारक बांधून सुशोभिकरण केल्याने जागेचे पावित्र्य राखले जाईल, त्यामुळे येथे शौचालय न बांधता स्मारक उभारावे, अन्यथा आंदोलन करणार असल्याचे युवानेते योगेश पुरी यांनी सांगितले

## वृक्षसंवर्धन विभागाचे ५७ कोटींचे अंदाजपत्रक सादर





**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाचे आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या ५ कोटी ९ लाख रुपये शिल्लक रकमेसह आर्थिक वर्ष २०२५-२६ चे ५७ कोटी ३६ लाख ८६ हजार रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक स्थायी समिती व महापालिका सभेमध्ये सादर करण्यात आले. या अंदाजपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडे वृक्षकर, वृक्षतोड लाकूड विक्री, अनुदान, देणगी, झाडतोड खर्च वसुली, रोपे विक्री, विनापरवाना झाडे तोडल्याबाबत नागरिकांकडून वसुल केलेली तडजोड रक्कम, महापालिका सेवा शुल्क आदी बाबींच्या माध्यमातून सुमारे ६२ कोटी ४६ लाख १० हजार ५०० रुपये जमा होणार आहेत. या जमा होणाऱ्या रकमेच्या शिल्लक रकमेसह २०२४-२५ चे सुधारित व २०२५-२६ च्या एकूण ५७ कोटी ३६ लाख ८६ हजार रुपयांच्या मूळ अंदाजपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

## पिंपरी चिंचवड माझे शहर..!




पिंपरी
**वितरण :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभाग स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अतंर्गत "इ" क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्रमांक ५ येथील संत ज्ञानेश्वर विद्यालय, आळंदी रोड, भोसरी येथे जागतिक चिमणी दिवस तसेच जागतिक आनंद दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, जैवविविधता संरक्षण, आणि चिमण्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. याप्रसंगी नागरिकांना स्वच्छ, सुंदर व हरित शहरासाठी योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## दुर्लक्षपणाचा कहर! सांडपाणी थेट नदीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराच्या सीमेवर असणाऱ्या मुळा नदीची अवस्था गटारगंगेची झाली आहे. दोन्ही महापालिकांच्या दुर्लक्षामुळे सांडपाणी थेट नदीमध्ये सोडले जात आहे. रसायनयुक्त पाण्यामुळे बुधवारी नदी फेसाळली होती.


पिंपरी- चिंचवड शहरातून इंद्रायणी, पवना आणि मुळा अशा तीन नद्या वाहतात. मुळा नदी पिंपरी-चिंचवड व पुणे शहराच्या सीमेवरून वाहते. वाकड ते दापोडी असे नदीचे पात्र शहराच्या सीमेवर आहे. या नदीच्या अलीकडे पिंपरी-चिंचवड शहर असून, त्यावर हिंजवडी, वाकड, पिंपळे निलख, सांगवी, नवी सांगवी, दापोडी, बोपखेल परिसर आहे. पुण्याच्या बाजूने बालेवाडी स्टेडियम, बालेवाडी गावठाण, बाणेर, औंध, बोपोडी, दापोडी असा परिसर आहे. या परिसरातील सांडपाणी मोठ्या प्रमाणावर नदीत सोडले जात आहे.सोशल मीडियावर व्हिडियो व्हायरल झाल्यावर याची दखल पिंपरी-चिंचवड महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतली आहे. पण ठोस उपाय गरजेचे आहेत.

# महावितरणचे स्वतंत्र मंडल कार्यालय हवे

### माजी उपमहापौर तुषार हिंगे यांची मागणी



> पिंपरी-चिंचवड शहरात १८१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात विस्तारले आहे. शहरात हजारो मोठ मोठे गृहप्रकल्प निर्माण झाले आहेत. अनेक गृहप्रकल्प तयार होत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात सध्या तीस लाखांहून अधिक वीज ग्राहक आहेत. शहरातील वीज खंडित होणे व इतर समस्या तातडीने सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरासाठी महावितरणचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण आहे.
>
> **-तुषार हिंगे,** माजी उपमहापौर, पिंपरी-चिंचवड महापालिका



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने वाढत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे मोठे मोठे गृहप्रकल्प उभे राहत आहे. शहरातील औद्योगिक, रहिवाशी आणि व्यावसायिक वीज ग्राहकांची संख्या ३० लाखांहून अधिक झाली आहे. शहरातील नागरिकांना वारंवार उद्भवणाऱ्या वीजेसंदर्भातील समस्या तातडीने सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरासाठी महावितरण कंपनीचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करण्यास यावे, अशी मागणी माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी केली आहे. यासंदर्भात यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.

तुषार हिंगे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापन होऊन ४२ वर्षे झाली आहेत. शहरातील सुखसोई लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड शहरात राहण्यास मोठी पसंती दिली जात आहे. त्यामुळे शहर चारी बाजूने झपाट्याने वाढत आहे. शहरात गगनचुंबी मोठे गृहप्रकल्प उभे झाले आहेत.

- शहरात महावितरण कंपनीचे पिंपरी आणि भोसरी असे दोन विभाग कार्यरत आहेत.
- शहरातील औद्योगिक, रहिवाशी, व्यावसायिक अशा वीज ग्राहकांची संख्या ३० लाखांहून अधिक झाली आहे.
- परिणामी, शहरात वीजेसंदर्भातील अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यावर तातडीने उपाययोजना केल्या जात नसल्याने वीज ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे.
- शहरातील औद्योगिक पट्ट्यातही वारंवार वीज खंडित होत असल्याने उद्योजकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.
- पावसाळ्यात या प्रकारच्या समस्येत आणखी भर पडते.
- स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन केल्यास शहरातील नागरिकांना चांगली आणि दर्जेदार वीजपुरवठा सेवा उपलब्ध होईल.
- महावितरण कंपनीच्या स्वतंत्र कार्यप्रणालीमुळे नागरिकांच्या समस्येचे निराकरण होईल. येणाऱ्या काळातa शहराच्या वाढत्या विकासासाठी हे कार्यालय अत्यावश्यक आहे.

## होर्डिंगमधून पालिकेला अवघे १६ कोटींचेच उत्पन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नात दरवर्षी वाढ होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना अपेक्षित उत्पन्न गाठता आलेले नाही. यावर्षी या विभागाच्या तिजोरीत आज अखेर फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. येत्या ३१ मार्चअखेर १८ कोटीं वसूल करण्याचे उद्दिष्ट आकाशचिन्ह व परवाना विभागासमोर आहे. शहरातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक चौक वेगवेगळ्या होर्डिंग, बॅनर आणि फ्लेक्सने वर्षभर भरलेला असतानाही पालिकेला मात्र अवघ्या १६ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे.

राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक यासह इतर कार्यक्रमांसाठी जाहिरात करण्यास प्राधान्य दिले जाते. अनेक राजकीय पुढारी आणि व्यावसायिक परवाना न घेताच अनधिकृत फलक लावत असतात. एकाच परवाना नंबरवर अनेक जाहिरात फलक असण्याची शक्यताही आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षांत १७ कोटींचे उद्दिष्ट होते आणि आकाशचिन्ह विभागाला १८ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. त्यात फक्त होर्डिंगधारकांकडून ८ कोटी ८१ लाख रुपये मिळाले आहेत. होर्डिंग आणि फ्लेक्सने गजबलेल्या या शहरात सद्यःस्थितीत केवळ १ हजार २४१ मोठे अधिकृत जाहिरात फलक आहेत. या फलकांच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत उत्पन्न जमा होत आहे. दुसरीकडे शहराच्या प्रत्येक चौकात आणि प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत जाहिरात फलक दिसून येत आहेत. विभागाच्या संथ कारभारामुळे यावर्षी होर्डिंग नूतनीकरणाची प्रक्रिया रखडली. त्यातून उत्पन्नात घट झाल्याचे दिसून येत आहे.

### ३४ अर्ज प्रलंबित

- शहरात सध्यस्थितीत एक हजारांहून अधिक मोठे जाहिरात फलक अधिकृत आहे. जाहिरात फलक लावण्यासाठी ८०४ अर्जांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. तर ३४ अर्ज प्रलंबित आहेत. ७० जणांनी अद्याप नूतनीकरणासाठी अर्ज केले नाहीत.

## 'फकीर गुरू' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** 'स्वत: कफल्लक राहून संतांनी फकिरी वृत्तीने समाजप्रबोधन केले. 'फकीर गुरू' तोच कित्ता गिरवत आहे!' असे विचार ह. भ. प. किसनमहाराज चौधरी यांनी पिंपळे गुरव येथे गुरुवार, दिनांक २० मार्च रोजी व्यक्त केले. प्रणाली प्रकाशन आणि दिलासा साहित्य सेवा संघ आयोजित तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पी. एस. आगरवाल लिखित 'फकीर गुरू' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात किसनमहाराज चौधरी बोलत होते. वृक्षमित्र अरुण पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

ह. भ. प. किसनमहाराज चौधरी म्हणाले, 'गुरू अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाची प्रकाशवाट दाखवत असतो!' सुरेश कंक यांनी "हवा के साथ साथ..." आणि "सुन के तेरी पुकार..." या गीतांच्या माध्यमातून पुस्तकावर मार्मिक भाष्य केले. याप्रसंगी डॉ. पी. एस. आगरवाल यांनी आपल्या मनोगतातून, 'देशात, जनतेत आणि शासनात बोलघेवड्यांचा सुकाळ आला असून कृतिशील व्यक्तींचा दुष्काळ आहे. त्यामुळेच समाजातील अनाचार, अनीती अन् भ्रष्टाचार यावर 'फकीर गुरू' या काल्पनिक नायकाच्या माध्यमातून भाष्य केले आहे!' अशा भावना व्यक्त केल्या.



पिंपरी
प्रणाली प्रकाशन आणि दिलासा साहित्य सेवा संघ आयोजित तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पी. एस. आगरवाल लिखित 'फकीर गुरू' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा पार पडला.

# चिंचवडकरांना मराठी चित्रपट महोत्सवाची पर्वणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ‘मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना’ या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यगृहात चित्रपट संकल्पने अंतर्गत मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. २४ मार्च ते २५ मार्च २०२५ याकाळात पिंपरी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे पोस्टर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते आज



बुधवारी (१९ मार्च) प्रकाशित करण्यात आले.

याप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील, उप आयुक्त आण्णा बोदडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते. मराठी चित्रपट महोत्सवामध्ये ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’, ‘इलू इलू’, ‘मुक्काम पोस्ट देवाचं घर’, ‘चिकी चिकी बुबूमबूम’, ‘श्यामची आई’, ‘संगीत मानापमान’ असे विविध चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटांची निवड विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातील प्रेक्षकांचा विचार करून करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### तिकिटाची किंमत नाममात्र

- मराठी चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येणारे चित्रपट हे नुकतेच प्रदर्शित झाले आहेत. महोत्सवामध्ये या चित्रपटासाठी नाममात्र ५० रुपये तिकीट ठेवण्यात आले आहे. हे तिकीट ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने खरेदी करता येणार आहे. ऑनलाइन तिकीट खरेदी ticketkhidakee.com या संकेतस्थळावर करता येईल. तसेच प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथेही २१ मार्च २०२५ पासून तिकीट विक्री सुरू करण्यात येणार आहे.

> मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मराठी भाषेचा प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. मराठी चित्रपट महोत्सव या उपक्रमांचा एक भाग आहे. मराठी भाषेचे सांस्कृतिक वैभव जनसमान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, मराठी भाषेबद्दल आपुलकी आणि प्रेम निर्माण करण्यासाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल.
>
> **— शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

संपादकीय विशेष

# राजकारण चालले कुठे...

आजघडीला अनेक योजना आणि कृतींचे डांगोरे पिटले जात असले तरी मूलभूत प्रश्नही सुटलेले दिसत नाहीत, ही खरी परिस्थिती आहे. प्राथमिक आणि महत्त्वपूर्ण प्रश्नाचा मागोवा घ्यायचा झाला तर शेतीसाठी दिले जाणारे 26 हजार कोटींचे कर्ज एकट्या मुंबईमध्ये झाले आहे, असे दिसते. दुसरीकडे, पूर्ण विदर्भातील बारा आणि मराठवाड्यातील आठ जिल्हे एकत्र केले तरी तिथे इतके कर्जवाटप झालेले नाही. मोठ्या कंपन्यांनी कर्ज ताब्यात घेतल्याचे स्पष्ट चित्र यातून समोर येते. शिक्षणक्षेत्रातील परिस्थितीही फारशी वेगळी नाही. आज या क्षेत्रात अनेक रिक्त जागा आहेत. एव्हाना त्या भरणे अपेक्षित होते. मात्र त्याविषयी कोणी काहीही बोलत नाही. उलट, 20 पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचे आधी ठरवण्यात आले होते. त्याला विरोध झाल्यामुळे पटसंख्या दहापर्यंत आणण्याचा निर्णय घेतला गेला आहे. पण यातूनही हळूहळू सरकारी खर्च कमी करायचा आणि कॉर्पोरेट जगावर भार टाकून, त्यांच्या मेहरबानीवर सामान्यांना जगायला लावायचे, हे सरकारचे धोरण समोर येते. अशी एक नवी व्यवस्था निर्माण करण्याचा स्पष्ट मानसही समोर येतो.



राज्यातील जातीय राजकारणही कधी नव्हे इतक्या खालच्या पातळीवर गेले आहे. बीड जिल्ह्यामध्ये पेटलेला मराठा विरुद्ध ओबीसी हा वाद याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. तिथे कायदा-सुव्यवस्थेची स्थिती इतकी खालावली आहे, की ती अस्तित्वात तरी आहे का असा प्रश्न पडतो. मरणाऱ्याची आणि मारणाऱ्याची जात आज महत्त्वाची झाली आहे. कारण त्यावरुनच आंदोलने होऊ लागली आहेत. खरे तर सक्षम कायदा-सुव्यवस्था असताना कोणी कोणाला मारु नये, अशी व्यवस्था असणे अपेक्षित असते. त्यातूनही अशा घटना समोर आल्या तर मारणाऱ्याला गुन्हेगार म्हणून समोर आणताना आणि शिक्षा करताना जातपात न बघता निर्णय होणे गरजेचे आहे. मात्र या देशात गुन्हेगाराचीही धर्म-जात बघण्याची नवी फॅशन सुरू झाली आहे. त्याचेच उदाहरण बीडमध्ये बघायला मिळते. त्यातही फरक म्हणजे परभणीमध्ये शासन यंत्रणेकडून मारहाण करुन मृत्यू झाला ती व्यक्ती दलित असण्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष केले जात आहे. थोडक्यात, मतदानाच्या संदर्भात ज्या जातीचे संख्याबळ जास्त त्यांना अधिक महत्त्व देण्याचा आणि त्यांचेच प्रश्न उचलून धरण्याचा नवा विचार ही व्यवस्था निर्माण करु पहात आहे. मग तिथे हे प्रश्न योग्य की अयोग्य हेदेखील पाहण्याचे कष्ट कोणी घेताना दिसत नाही. राज्याने यापूर्वी अशा लांगुलचालनाचे राजकारण कधीच पाहिले नव्हते. फुले, आंबेडकरांची परंपरा सांगणाऱ्या आणि असणाऱ्या महाराष्ट्रासाठी ही बाब नक्कीच लांच्छनास्पद म्हणावी लागेल.

गंमत अशी की, निवडणुकीच्या अगदी दोन दिवस आधी पंतप्रधानांच्या सल्लागार समितीने महाराष्ट्राचा जीडीपीमधील वाटा 15 टक्क्यांपासून 13 टक्क्यांपर्यंत घसरल्याची बातमी दिली होती. मानवी विकास निर्देशांकानुसारही महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावरुन सातव्या-आठव्या क्रमांकापर्यंत घसरल्याची माहितीही जाहीर आली होती. मात्र निवडणुकीवर त्याचा कोणताही परिणाम दिसून आला नाही. त्यामुळेच आजच्या जनतेपुढे खरा विकास हा प्रश्न आहे का नाही, याचीच शंका येते. समृद्धी मार्गाच्या सरकारच्या योजनेत तीन ते साडेतीन हजार कोटींमध्ये शेतकऱ्यांना गुंडाळण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत होता. परंतु, कम्युनिस्ट पक्षाने शेतकऱ्यांना संघटित करुन लाल बावट्याखाली आंदोलन केल्यामुळे सरकारला साडे चौदा ते 15 हजार कोटी रुपये खर्च करावे लागले. त्यानंतर प्रतिष्ठेचा प्रश्न करुन सरकारने तेवढा खर्च केला. पण यातूनही त्यांची मानसिकताच समोर येते. एकदा प्रश्न प्रतिष्ठेचा केला तर सरकार त्यासाठी हवा तेवढा खर्च करते, मात्र जनतेच्या भावना वा अपेक्षा लक्षात घेऊन काहीही खर्च केला जात नाही, हेच या उदाहरणावरुन स्पष्ट दिसते. जनतेला महत्त्वाच्या वाटणाऱ्या वा असणाऱ्या कोणत्याही गोष्टी लक्षात घेतल्या जात नाहीत. पैसे नसल्याचे कारण देत चांगल्या योजना बंद केल्या जातात. म्हणूनच या सरकारचा प्राधान्यक्रम नेमका कशाला आहे, असा प्रश्न उपस्थित होतो.

आधी राजकीय लोक गुंडांना अभय द्यायचे आणि गुंड त्यांना पैसा पुरवायचे वा गुंडगिरी करुन मदत करायचे. मात्र परिस्थिती हळूहळू बदलत आहे. आता हे गुंड आम्हीच पैसे पुरवतो आणि निवडून येतो, असे म्हणू लागले आहेत. जनताही आता पैसेवाले वा गुंड प्रवृत्तीचे लोक उमेदवार म्हणून उभे आहेत, हे मतदान करताना बघत नाही. तीदेखील या लोकांना मत देऊन मोकळी होते. पर्यायाने आमदार, खासदारांमध्ये लक्षाधीश, कोटयधीशांची संख्या वाढते आहे.हे समाजात पैशाचे महत्त्व वाढत असल्याचेच लक्षण नाही का? म्हणजेच माणसाने आपल्या सोयीसाठी निर्माण केला तो पैसाच आता माणसाच्या मानगुटीवर बसू लागला आहे. त्यामुळे संपूर्ण लोकशाही व्यवस्थेचीच एक क्रूर थट्टा सुरू आहे.

# मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे.

**मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते**


मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे.

महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.


# चिमण्यांचे अस्तित्व टिकवू या !

चिमणी दिवस

श्याम ठाणेदार
पुणे



गुरुवारी २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला. पण तो दररोज साजरा व्हायला हवा तो चिमण्यांचे संरक्षण करूनच. चिमणी या चिमुकल्या पक्षासाठी व त्याचा संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाटयाने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वात जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात,



बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यातून एकदा दोन चार अंडी घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यासारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाटयाने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल.

पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्वाचे त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यासारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करुन चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा.

फिटनेस फंडा

## पोटावरील चरबी कमी करताय?

तरुण वयात प्रत्येकाला आपलं शरीर व्हिशेपमध्ये असावं असं वाटणं साहजिक आहे. शरीराची ठेवण पीळदार आणि बांधेसूद असण्यासोबतच सपाट पोटासाठी बरेचजण प्रयत्नशील असतात. परंतु, पोटावरची चरबी काही केल्या कमी होत नाही. त्यासाठी व्यायाम आणि आहाराकडे लक्ष द्यावं. त्यादृष्टीने आहार आणि व्यायामाची सांगड कशी घालायची या विषयी... ✽ पोट कमी करायचं असेल तर प्रथिनांचं सेवन करायला हवं. अंडी, मासे, डाळी, दुग्धजन्य पदार्थ यामधून प्रथिनं मिळतात. प्रथिनांचं सेवन करण्यासोबतच कार्डिओ व्यायाम करायला हवा. ✽ प्रथिनांसोबतच आहारात फायबर म्हणजे तंतूमय पदार्थांचा समावेश असायला हवा. पूर्ण धान्य, हातसडीचे तांदूळ, रताळी, ओट्स, डाळी यामध्ये भरपूर फायबर असतं. या पदार्थांचं सेवन करा. ✽ वजन कमी करण्यासाठी फक्त व्यायाम करून भागत नाही तर त्याची पोषक आहाराशी सांगड घालावी लागते. पोषक घटक शरीराला योग्य प्रमाणात मिळणं गरजेचं आहे. तुम्हालाही पोट कमी करायचं असेल तर साधेसोपे व्यायाम करायला हरकत नाही. मात्र यासोबत खाण्यापिण्याकडेही लक्ष द्या.



खेचाखेची

## इच्छा!


यमराज: तुमचं आयुष्य संपलं आहे. तुमची कोणती शेवटची इच्छा असेल तर आत्ताच सांगा. तुम्हाला घेऊन जाण्याचे आदेश आले आहेत.

माणूस: काँग्रेसचं सरकार आलेलं पहायचं आहे.

यमराज: चतुर प्राणी...! अमर होऊ पहात आहेस की काय?

वेगळं काही

तुर्कस्थानचा ३४ वर्षांचा सुलतान कोसेन जगातला सर्वात उंच पुरूष आहे तर भारताची २४ वर्षांची ज्योती अमागे सर्वात बुटकी महिला आहे. ही जोडी मध्यंतरी इजिप्तमध्ये भेटली. देशातल्या पर्यटनाला चालना मिळावी यासाठी सुलतान आणि ज्योतीला इजिप्तला आमंत्रित करण्यात आलं होतं. ज्योतीची उंची अवघी २ फूट ६ इंच आहे. तिने भारतातल्या एका रीॲलिटी शोमध्ये काम केलं आहे. तसंच 'अमेरिकन हॉरर स्टोरी'मध्येही तिची भूमिका होती. ॲकोंड्रोप्लेसिया या विकारामुळे तिची उंची वाढली नाही. सुलतान ८ फूट १ इंच उंच आहे. जगातल्या सर्वात उंच माणसाचा किताब त्याला २००९ मध्ये मिळाला.




राशीभविष्य

- **मेष** : घरातले वाद घरातच मिटवा. गैरसमजामुळे मानसिक स्वास्थ दुरावेल. फाजील आत्मविश्वास नको.
- **वृषभ** : व्यवसायातील बिघडलेले संबंध सुधारतील. आश्वासनं पाळाल. रेंगाळलेली कामं मार्गी लागतील.
- **मिथुन** : शब्दांचा वापर जपून करावा. भावनेच्या भरात मदत करू नका. संततीच्या मागण्या वाढतील.
- **कर्क** : प्रिय व्यक्तीचा सहवास मिळेल. आरोग्यात सुधारणा होईल. नोकरीत तुमच्या शब्दास मान मिळेल.
- **सिंह** : नातेवाईकांचं सहकार्य मिळेलच असं नाही. इतरांची आश्वासनं फसवी ठरतील. प्रकृतीस जपावं.
- **कन्या** : रखडलेल्या व्यवहारांना गती येईल. प्रतिष्ठित व्यक्तीच्या ओळखीचा फायदा होईल. चिंता नसावी.
- **तूळ** : गैरसमजाला वाव देऊ नका. मुलांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नका. प्रेमप्रकरणात सावध रहावं.
- **वृश्चिक** : शासकीय कामातील अडथळे दूर होतील. आर्थिक विवंचना मिटतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **धनु** : पतीपत्नीत विसंवाद निर्माण होईल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. मन शांत ठेवणं गरजेचं राहील.
- **मकर** : नातेवाईकांचा सल्ला उपयोगी पडेल. तुमचं लिखाण प्रसिद्ध होईल. नव्या ओळखी कामी येतील.
- **कुंभ** : गृहकर्तव्यास प्राधान्य द्यावं लागेल. नातेवाईकांच्या लुडबुडीस आळा घालावा लागेल. व्यसन टाळा.
- **मीन** : अचानक धनप्राप्तीचे योग आहेत. आवडीच्या क्षेत्रात काम कराल. स्वगुणांची झलक दाखवाल.

सल्ला मोलाचा

## मेक अप मेळ घालणारा

हेअर कलरला पुरक ठरणारा मेक अप कसा करावा याविषयी जाणून घेऊ.

✽ केस बरगंडी किंवा रेडिश रंगाशी साधर्म्य साधणारे असतील तर लिपस्टिकच्या रंगाकडे लक्ष देणं महत्त्वाचं आहे. मेक अपमध्ये मरून किंवा ब्राउन रंगाचा वापर करावा. याशिवाय डोळ्यांच्या मेक अपमध्ये लाईट किंवा स्पार्कलिंग ग्रीन कलरनी हायलाईट करावं. ब्लश आणि लिपस्टीक साधारणत: मरून डार्क शेड, मोव किंवा ब्राऊन कलर यांसारखे रंग लूकला उठाव देतात. रोजी क्रिम ब्लशही गालांसाठी वापरू शकता.

✽ केसांचा रंग ब्राऊन किंवा त्यासारख्या मिळत्याजुळत्या शेडचा असेल तर न्युड मेक अपचा पर्याय तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. या मेक अपमध्ये आयब्रो हायलाईट करा. याशिवाय मस्कारा आणि लिपग्लॉस लावायला विसरू नका. पीच, ब्रॉन्ज किंवा इतर न्युट्रल कलर्सचा वापर ब्लशसाठी करता येऊ शकतो. डोळे हायलाईट करूनही तुम्ही खास दिसू शकता. यासाठी मेटॅलिक क्रिम बेस्ड आय शॅडोचा वापर करा.

दिनविशेष

## २१ मार्च

- **२०१३** : वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरिक्षक सचिन सूर्यवंशी मारहाणप्रकरणी क्षितिज ठाकूर आणि राम कदम गुन्हे शाखेसमोर शरण.
- **२०१६** : संबंध सुधारण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांचा क्युबा दौरा सुरू.
- **२०१७** : केंद्र सरकारने रोखीच्या व्यवहारांवरील मर्यादा तीन लाखांवरून दोन लाखांवर आणली.
- **२०१८** : कॅबिनेटने 'आयुष्यमान भारत' लॉंच करण्यासाठी मंजुरी दिली.

महत्त्वपूर्ण काही...

## वजन किती असावं ?

बारीक असणं हे निरोगीपणाचं लक्षण असू शकतं का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. प्रत्येक माणसाची शारीरिक ठेवण आणि गरजाही वेगळ्या असतात. त्यामुळे खूप बारीक असणंही चांगलं नसतं. बारीक राहण्यासाठी तुम्ही खूपच कमी खात असाल तर ते चुकीचं आहे. अन्नातल्या पोषक घटकांमुळे आपल्याला ऊर्जा मिळते. यामुळेच आपण वेगवेगळी कामं करू शकतो. जास्त बारीक असणं जसं चांगलं मानलं जात नाही तसंच खूप जाडही असू नये. वजन नियंत्रणात असणं गरजेचं असतं. तुमचं वय वाढत असतं. त्यामुळे शरीराला पोषक घटकांची आवश्यकता असते. म्हणूनच संतुलित आहार गरजेचा मानला जातो. फळं आणि भाज्या आरोग्यादायी असतात. वडा पाव, पिझ्झा, बर्गरसारखं जंक फूड बाजूला सारायला हवं. प्रत्येकाच्या शारीरिक ठेवणीनुसार त्यांचं वजन ठरतं. वजन किती असायला हवं हे उंचीनुसारही ठरवलं जातं. त्यामुळे लहान वयात वजनाची काळजी करायची तुम्हाला काहीच गरज नाही. शरीराला बळ देणारे पदार्थ खा आणि मस्त रहा.

पंचांग

**शुक्रवार, २१ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. ७, नक्षत्र : ज्येष्ठा,
चंद्रराशी : वृश्चिक, योग : सिद्धी,
सूर्योदय : ६.४४, सूर्यास्त : ६.४८

फॉरवर्डस

आत्मिक आनंद किती महत्त्वाचा असतो पहा...

**जिस्म खुश, रूह उदास लिए फिरते हो,**
**ये किस किस्म की मोहब्बत किए फिरते हो?**

आरोग्यमंत्र

## चहाचा अतिरेक नको

सध्या चहाला एक वेगळीच ओळख मिळताना दिसते. अगदी नाक्यानाक्यावर सुसज्ज 'अमृततुल्य' बघायला मिळतात. पण चहाचं अतिरेकी सेवन टाळायला हवं. याविषयी जाणून घेऊ या.

✽ टपरीवर ॲल्युमिनियमच्या भांड्यात चहा उकळला जातो. ॲल्युमिनियम धातूचा खाद्यपदार्थांना झालेला दीर्घकाळ संपर्क 'अल्झायमर' (स्मृतीनाश) सारखा असाध्य विकार निर्माण करणारा असतो. ✽ चहा दिवसातून दोन वेळा पिल्यास दर कपाला दहा रुपये या हिशेबानं वर्षाचे ७२०० रूपये खर्च होतात हे लक्षात घ्यायला हवं. ✽ भारतासारख्या समशीतोष्ण कटिबंधातील देशात चहा हे कधीही आणि केव्हाही अतिप्रमाणात प्यावं असं पेय नव्हतं आणि नाही. ✽ चहा चवीला तुरट असल्यामुळे तो बद्धकोष्ठता निर्माण करतो. काहींना चहा न प्यायल्यास शौचाला होत नाही हे खरं असलं तरी हे सवयीमुळे होतं. शौचाचा वेग निर्माण करणं हे चहाचं काम नव्हे. चहा रक्ताची आम्लता वाढवतो. ✽ नियमित चहा प्यायल्यास हाडं ठिसूळ होतात, रक्तवाहिन्या आकुंचन पावून रक्तदाब वाढतो आणि आम्लपित्ताचा त्रास वाढतो. ✽ चहासमवेत आपण काही पदार्थ खातो. त्या पदार्थांमध्ये मीठ असल्यास मिठाचा चहातील साखर आणि दुधाशी संपर्क आल्यामुळे चहा शरीरासाठी अत्यंत मारक बनतो. म्हणजेच चहा दारूपेक्षा ही अधिक घातक आहे हे जाणून घ्यायला हवं.



वाचा तर खरं

✽ शेरवानी चांगल्या फिटिंगची असेल तरच खुलून दिसते. ✽ शेरवानी खांद्यावर नीट बसायला हवी आणि फॉल चांगला पडायला हवा. ✽ तुम्ही जाड या वर्गात समाविष्ट होत असाल तर शेरवानीची उंची अधिक ठेवा. ✽ शरीरयष्टी सडपातळ असेल तर शेरवानीची उंची थोडी कमी ठेवावी. ✽ लग्नविधी बराच काळ सुरू असतात. म्हणूनच शेरवानीचं फॅब्रिक निवडताना काळजी घ्यावी. चुरगाळणारं, कडक, ग्लॉसी, घामाने अंगाला चिकटणारं फॅब्रिक त्रासदायक ठरतं. ✽ शेरवानीचा बहारदार लूक खुलवण्यासाठी योग्य ॲक्सेसरीज आणि फूटवेअरची निवडही महत्त्वाची ठरते.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### पेट्रोल कारच्या किमतीत मिळणार इलेक्ट्रिक वाहने

**नवी दिल्ली :** सहा महिन्यांत देशातील इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) किंमती पेट्रोल वाहनांच्या बरोबरीने होतील, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. कन्व्हर्जन्स इंडिया आणि स्मार्ट सिटीज इंडिया एक्स्पोला संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली. नितीन गडकरी म्हणाले की, २१२ किमी लांबीच्या दिल्ली-डेहराडून एक्सेस कंट्रोल्ड एक्स्प्रेसवेचे बांधकाम पुढील तीन महिन्यांत पूर्ण केले जाईल. किफायतशीरपणा, प्रदूषणमुक्त आणि स्वदेशी उत्पादन म्हणून ईव्ही वाहनांचा आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देणे हे सरकारचे धोरण असल्याचे ते म्हणाले.

### इस्रायलचा पुन्हा गाझावर हवाई हल्ला

**नवी दिल्ली :** इस्रायलने गुरुवारी पहाटे गाझा पट्टीवर केलेल्या हवाई हल्ला केला. यामध्ये किमान ५८ पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले आहेत, असे वृत्त माध्यमांनी गाझामधील आरोग्य मंत्रालयाच्या हवाल्याने दिले आहे. दरम्यान, ताज्या हल्ल्यांवर इस्रायली सैन्याकडून त्वरित कोणतीही माहिती जारी करण्यात आलेली नाही. बुधवारी रात्री उशिरा आणि गुरुवारी पहाटे इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान ५८ पॅलेस्टिनी ठार झाले. मध्यरात्री अनेक घरांवर हल्ला झाला. पुरुष, महिला आणि मुले झोपेत असताना मृत्युमुखी पडल्याचे गाझामधील आरोग्य मंत्रालयाच्या सूत्रांनी म्हटले आहे.

# सरकारी शाळांना सीबीएसई पॅटर्न

## राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना आदेश लागू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात गुरुवारी सभागृहात माहिती देत घोषणा केली.



विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते. राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले.

### मुख्यमंत्र्यांनी केल्या होत्या सूचना

● राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होता.

राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले.

# एप्रिल महिन्यात राज्याची 'एआय' पॉलिसी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सध्या डिजिटल इंडियानंतर एआय इंडिया असेच पाहायला मिळत आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) म्हणजेच एआयचा वापर सर्वच क्षेत्रात करण्यासाठीची धडपड दिसून येत आहे. त्यामुळे, शासनाने देखील एआयसाठी धोरण आखायला सुरुवात केली असून महाराष्ट्राची एआय पॉलिसी एप्रिल महिन्यात येईल अशी घोषणाच माहिती व तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांनी विधानपरिषद सभागृहात आज केली.

भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांच्याकडून आर्टिफिशियल इंटिलिजन्स संदर्भात प्रश्न मांडण्यात आला होता. त्यावर मंत्री शेलार यांनी उत्तर दिले. दरम्यान, यावेळी शेलार यांनी एआयचा मजेशीर किस्साही सांगितला. त्यावरून, आमदार अनिल परब आणि आशिष शेलार यांच्यात चांगलीच मिश्कीलपणे जुगलबंदी रंगली. केरळ आयरस अशी एक एआय टिचर निर्माण करण्यात आली आहे. तंत्रज्ञान आले त्यानंतर पाठ राहिले नाहीत, आर्टिफिशिअल संदर्भातले नवे आव्हान आपल्यासमोर आहे. चांगल्या दृष्टीने शिक्षणात हे येणे क्रांती ठरेल, आपण यासंदर्भात एक समग्र धोरण आणावे असा प्रश्न श्रीकांत भारतीय यांनी उपस्थित केला होता. त्यावर, आता आशिष शेलार यांनी सभागृहात उत्तर दिले.

एआय ही उद्याची भाषा जी जगाने ठरवली आहे, दीड दोन आठवड्यात एकच चर्चा लावली आहे. जगातील नवीन संधी आणि आव्हानांचे स्वरुप एआयच्या रुपाने आलेले आहे. संशोधन, रोजगार निर्मिती ज्ञान मिळवण्याची व्यवस्था आपण इंटरनेट आल्यानंतर बघितली. एआयच्या सहाय्याने सर्वत्रच मूलभूत क्षेत्रात बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मग हे आव्हान आहे की अडचण आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. सन २०२४ ला नीती आयोग, केंद्रातील विभाग, तज्ज्ञांकडून भारतीय एआय धोरण लाँच केले गेले. आता, आपण यासंदर्भात टास्क फोर्स बनवला आहे, एआयचा उपयोग होणार असेल तर नेमके होणार काय? असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. त्यामुळे, राज्याची एआय पॉलिसी एप्रिल महिन्यात येईल, अशी माहिती माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिली. शिक्षणात पूरक व्यवस्था निर्माण करण्यासाठी नियम धोरण बनवावे लागेल, त्यासाठी समिती नेमू. शिक्षण तज्ज्ञ, पालक आणि शिक्षक हे सर्व त्या समितीमध्ये असतील असेही शेलार यांनी यावेळी, सांगितले.

# मार्च २०२६ पूर्वी देश नक्षलमुक्त होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या नक्षलवादविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. गुरुवार दि. २० मार्च रोजी छत्तीसगडच्या विजापूर-दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दलांनी २२ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. चकमकीत एक जवानही शहीद झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या मोहिमेबद्दल माहिती दिली आणि ३१ मार्च २०२६ पूर्वी देश नक्षलमुक्त होईल, असा विश्वासही व्यक्त केला.



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ७ वाजल्यापासून छत्तीसगडच्या गांगलूर पीएस हद्दीजवळील विजापूर-दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू होती. दोन्ही बाजूंनी बेच्छूट गोळीबार झाला, ज्यात सुरक्षा दलांनी चकमकीत २२ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. चकमकीनंतर सुरक्षा दलाने २२ नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त केली. दु:खद बाब म्हणजे, या चकमकीत विजापूर डीआरजीचा १ जवान शहीद झाला आहे.

सुरक्षा दलांला मिळालेल्या या यशाबद्दल गृहमंत्री अमित शहांनी सोशल मीडिया हँडल वर पोस्ट केली. ते म्हणाले, नक्षलमुक्त भारत मोहिमेच्या दिशेने आज आपल्या जवानांनी आणखी एक मोठे यश मिळवले आहे. छत्तीसगडच्या विजापूर आणि कांकेरमध्ये आमच्या सुरक्षा दलांनी दोन वेगवेगळ्या ऑपरेशनमध्ये २२ नक्षलवादी ठार केले. मोदी सरकार नक्षलवाद्यांविरोधात 'झिरो टॉलरन्स' ठेवून पुढे जात आहे.

पान १ वरून

## आदित्य ठाकरे अडचणीत!

सूरज पांचोली, दिनो मारिया यांच्यासह मुंबई पोलिसांवरही या याचिकेतून आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल व्हावा, या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा आणि हायकोर्टाच्या देखरेखीखाली तपास व्हावा, अशा पद्धतीची मागणी या प्रकरणात करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीनेही आदित्य ठाकरे यांच्या अटकेची मागणी केली आहे. आता या प्रकरणावर महाराष्ट्रातील वातावरण चांगलेच तापले असून, विधानसभेतही त्यावरून गदारोळ झाला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे.

दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनचे मृत्यू प्रकरण पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरचा वादाचा विषय ठरत आहे. भाजपाचे नेते नारायण राणे आणि त्यांचे पुत्र नितेश राणे या प्रकरणी पाच वर्षांपासून शिवसेनेचे (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांच्याविरोधात रान पेटवत आहेत. मात्र आता दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत या प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी केली आहे. याआधी हत्येचा आणि इतर काही अत्याचार झाल्याचा आरोप फेटाळून लावणारे सतीश सालियन आता दिशाची हत्या झाल्याचा गंभीर आरोप करत आहेत.

आदित्य ठाकरे यांना अटक करून चौकशी करण्याच्या महायुतीची महायुती सरकारने मागणी केली आहे. यावर आदित्य ठाकरे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांपासून आमची बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना आदित्य ठाकरे म्हणाले, आता हे प्रकरण न्यायालयात असल्याने ते न्यायालयावर सोपवले पाहिजे. न्यायालय निर्णय घेईल, असे ते म्हणाले.

दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत आदित्य ठाकरे यांचे नाव घेतल्याबद्दल त्यांना अटक करण्याची मागणी भाजप आमदारांनी केली आहे. राज्याचे मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करताना ठाकरे यांचे नाव न घेता सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात बलात्काराच्या आरोपींना तपास करण्यापूर्वी तात्काळ अटक करण्यात यावी, असे म्हटले आहे. शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, आपण या मागणीच्या बाजूने असून केवळ ते शक्तिशाली आहेत म्हणून कोणालाही संरक्षण देता कामा नये. चार वर्षांनंतर हा विषय अचानक चर्चेत का आला, असा सवाल संजय राऊत यांनी केला आहे.

दिशा सालियानवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली आणि नंतर काही प्रभावशाली व्यक्तींना वाचवण्यासाठी राजकीय हेतूने कट रचला गेला, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

## त्या रात्री नेमके काय घडले?

अचानक आपल्या खोलीत निघून गेली आणि तिने आतून दरवाजा बंद केला. थोड्यावेळाने मित्रांनी दरवाजा ठोठावला तरी काहीच प्रतिसाद न मिळाल्यामुळे मित्रांनी आणि तिच्या प्रियकराने दरवाजा तोडला. तेव्हा दिशा बाल्कनीतून खाली पडल्याचे त्यांना दिसले. मित्रांनी तातडीने इमारतीच्या खाली धाव घेतली आणि दिशाला रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. वरील घटनाक्रम पार्टिला उपस्थित असलेल्या एका मित्राने एका व्हॉट्सअॅप ग्रुपवर शेअर केला होता. पोलिसांनी जेव्हा चौकशी केली, तेव्हा या घटनाक्रमात तथ्य असल्याचे सांगितले गेले.

सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्येनंतर काही जणांकडून दोघांच्याही मृत्यूचा संबंध जोडून वाद उपस्थित केला गेला गेला. भाजपा नेते नारायण राणे यांनी दिवा केला की, दिशावर बलात्कार झाल्यानंतर तिचा खून करण्यात आला. दिशाने तिच्यावर झालेला अत्याचार सुशांत राजपूतला सांगितला होता. त्यानंतर सुशांत सिंह राजपूतलाही धमक्या दिल्या जात होत्या. त्यातच १३ जूनच्या रात्री सुशांत सिंह राजपूतचाही मृत्यू झाल्याचे सांगून दोन्ही घटनांचा संबंध जोडला गेला.

२०२१ मध्ये पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली असून यात कोणतीही संशयास्पद परिस्थिती दिसत नसल्याचे म्हटले होते. त्यामुळे डिसेंबर २०२३ साली महाराष्ट्र सरकारने तीन सदस्यांची एसआयटी स्थापन करून या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र एसआयटीचा अहवाल अद्याप राज्य सरकारला प्राप्त झालेला नाही.

मुंबई पोलिसांनी चौकशी केल्यानंतर म्हटले की, दिशा राहत असलेल्या इमारतीची सीसीटीव्ही तपासण्यात आले आहेत. यात कोणतीही वेगळी बाब नजरेस आलेली नाही. ज्यादिवशी मृत्यू झाला त्यावेळी दिशा केवळ एकदाच इमारतीबाहेर आलेली दिसत आहे. तेही तिचे पार्सल घेण्यासाठी ती खाली आली होती. तसेच ती गर्भवती असल्याचाही मुद्दा उत्तरीय तपासणीनंतर फेटाळून लावण्यात आला होता.

### आदित्य-रिया यांच्यात

होती. त्यावेळी दिशाच्या पार्टीत आदित्य ठाकरेही पोहोचले होते, असा आरोप करण्यात आला आहे. दिशाच्या मृत्यूनंतर आदित्य ठाकरेंकडून पोलिसांना अनेक फोन करण्यात आले. तसेच प्रत्यक्षदर्शींना धमकावण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.

### भोसले गँगवर...

याप्रकरणी अजिनाथची पत्नी चिब्बा (वय ३०) हिच्या फिर्यादीवरून अंभोरा ठाण्यात ९ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी यातील सहा आरोपींना अटकही केली. त्यानंतर अंभोरा पोलिसांनी या सर्व आरोपींच्या गुन्ह्यांची माहिती काढून मकोकाचा प्रस्ताव तयार केला.

### तुमच्यासारखे ५६ पायाला बांधून फिरते

आढळले नाही. न्यायलयात याचा फैसला होईल. पण सत्ताधाऱ्यांमध्ये सध्या मंत्रिपदावर असलेल्या एका नेत्यावर बलात्काराचा आरोप झाल्यानंतर भाजप आमदार चित्रा वाघ यांची लढाई कुठवर आली, पुढे त्या लढाईचे काय झाले? असे प्रश्न अनिल परब यांनी विचारले. दरम्यान, दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरील पुनर्विचार याचिकेचे पडसाद आज विधान परिषदेत उमटले, मात्र मनीषा कायंदे यांच्या जुन्या ट्विटवरून वाद संजय राठोड यांच्यावर पोहोचला. अनिल परब यांनी चित्रा वाघ यांना सरड्याप्रमाणे रंग बदलतात, अशी टीका केली. यावरून चित्रा वाघ आणि अनिल परब यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. चित्रा वाघ यावेळी चांगल्याच आक्रमक झाल्या होत्या.

### शेअर बाजारात तेजीचे वादळ

व्याजदरात कपात करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आज गुंतवणूकदारांचा उत्साह कायम राहिला. व्यवहाराच्या शेवटी, बीएसई सेन्सेक्स ८९९.०२ अंकांनी वाढून ७६,३४८.०६ वर बंद झाला, तर निफ्टी २८३.०५ अंकांच्या वाढीसह २३,१९०.६५ वर बंद झाला. सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल गुरुवारी ४०८.४८ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे, जे त्याच्या आधीच्या ट्रेडिंग दिवशी म्हणजे बुधवारी ४०५ लाख कोटी रुपये होते. अशा प्रकारे, सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप गुरुवारी सुमारे ३.४८ लाख कोटी रुपयांनी वाढले. किंवा दुसऱ्या शब्दांत, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ३.४८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

### खोक्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

माझा काहीही संबंध नाही. सुरेश भोसले ऊर्फ खोक्या हा आमदार धस यांच्या जवळचा मानला जातो. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील प्रसिद्ध आरटीआय कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सुरेश भोसले याचा एक व्हीडीओ एक्सवर पोस्ट केला होता. यामध्ये भोसले एका गाडीच्या डॅशबोर्डवर नोटांचे गठ्ठे ठेवत होता. सतीश भोसलेच्या अटकेवर सुरेश धस म्हणाले आहेत की, कायदा आपले काम करेल.

सुरेश धस यांचे पंकजांना प्रत्युत्तर- सतीश भोसले ऊर्फ खोक्यामुळे सुरेश धस वादात सापडले असताना पंकजा मुंडे यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. मात्र सुरेश धस यांनीही पंकजा मुंडे यांच्या वक्तव्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, मी भाजप उमेदवार म्हणून निवडणूक जिंकलो आहे, मी इतर कोणत्याही उमेदवारासाठी प्रचार केला नाही, तर पंकजा यांनी तिथे अपक्ष उमेदवारासाठी प्रचार केला. ती स्वत:ला पक्षाची राष्ट्रीय सचिव म्हणवते. मग ती बीडमध्ये फक्त एकच आमदार असल्याबद्दल का बोलते? पक्षविरोधी काम मी नाही तर पंकजा यांनी केले आहे. जर कारवाई करायचीच असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. आता पंकजा मुंडे खोक्याच्या मुद्यावर सुरेश धस यांना घेरतील का हे पाहणे बाकी आहे कारण खोक्याविरुद्ध हत्येचा प्रयत्न, अमली पदार्थ आणि वन्य प्राण्यांची शिकार असे एकूण ८ एफआयआर आहेत. सतीश भोसले भाजपच्या भटक्या आदिवासी शाखेचा 'भटके विमुक्त आघाडी'चा पदाधिकारी आहे.

### हमासशी संबंध असल्याने भारतीयाला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेत वास्तव्यास असलेला भारतीय विद्यार्थी बदर खान सुरी याला पॅलेस्टिनी दहशतवादी गट हमासशी संबंध असल्याच्या आरोपावरून ताब्यात घेण्यात आले आहे, असे वृत्त 'फॉक्स न्यूज'ने अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभाग (डीएचएस)च्या हवाल्याने दिले आहे.

बदर खान सुरी याने भारतातील एका विद्यापीठातून शांतता आणि संघर्ष या विषयात पीएचडी केली आहे. सध्या तो अमेरिकेतील जॉर्जटाऊन विद्यापीठात इराक आणि अफगाणिस्तानातील शांतता निर्माण या विषयावर संशोधन करत होता.

# फहीम खानसह ६ जणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** पोलिसांवर झालेली दगडफेक ग्लोरिफाय केली होती. त्यासोबत अल्लाहू अकबर, सर तनसे जुदा असे कॅप्शन टाकलेले आहेत. हे सर्व हिंसाचाराला बढावा देण्यासाठी अशा प्रकारच्या पोस्ट करण्यात आल्या. अशा लोकांवर देशद्रोहाचे कलम लावण्यात येईल. आतापर्यंत ६ आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केलेला आहे. त्यामध्ये फहीम खानचाही समावेश आहे.

देशद्रोहाचा गुन्ह्यात आणखी आरोपींचा समावेश होईल, असे लोहित मतानी यांनी सांगितले. नागपूर हिंसाचार प्रकरणात एनआयए तपास करणार की, नाही याबाबत केंद्र सरकार निर्णय घेईल. तर एटीएसचा निर्णय हा राज्य सरकार घेईल, असे सायबर पोलिसचे डीसीपी लोहित मतानी यांनी सांगितले. नागपूर हिंसाचारासाठी वादग्रस्त मजकुराचे अनेक फेसबुक पेज सापडले आहेत. त्यावर जिहादी आणि अतिरेकीसारखा मजकूर आहे.

यापुढे कोणतीही अनुचित घटना घडू नये, तेढ वाढू नये यासाठी सोशल मीडियावरील पोस्ट ब्लॉक करण्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारचे सोशल मीडियावरील १७ ते १९ तारखेपर्यंतचे सर्व पेजेस ब्लॉक करण्यासाठी आम्ही संबंधित एजन्सीला पाठवले आहेत. आतापर्यंत ५० टक्के पोस्ट ब्लॉक केलेल्या आहेत. इतर पोस्ट लवकर ब्लॉक होतील. हिंसाचार प्रकरणातील आरोपी फहीम खान हा सायबर गुन्ह्यातही आरोपी आहे, अशी माहितीही मतानी यांनी दिली आहे.

# शेतकऱ्यांच्या आंदोलनावर 'आप'चा बुलडोझर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शंभू :** वर्षभरापासून शंभू आणि खनौरी बॉर्डरवर तळ ठोकून असलेल्या शेतक-यांचे आंदोलन उधळून लावण्यात आले आहे. पंजाब पोलिसांनी रात्री अचानक कारवाई करत आंदोलन स्थळावर उभारण्यात आलेल्या तंबूसह इतर साहित्यावर बुलडोझर चालवला. तसेच जवळपास १३ महिन्यांनंतर शंभू बॉर्डर खुली करण्यात आली आहे.



दरम्यान, शेतकरी आंदोलनावर कारवाई करण्यामागे पंजाब सरकार आणि आम आदमी पक्षाने विचारपूर्वक आखलेली रणनीती असल्याचे बोलले जात आहे. तसेच या कारवाईमागची काही प्रमुख कारणंही समोर येत आहेत.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी मागच्या आठवड्यात पंजाबचा दौरा केला होता. त्यावेळी ते लुधियानामध्येही गेले होते. त्यावेळी शंभू आणि खनौरी बॉर्डरवर शेतक-यांचे आंदोलन सुरू राहिले तर आगामी पोटनिवडणुकीत आम आदमी पक्षाला मते मिळणार नाहीत, असे लुधियानामधील उद्योगपतींनी केजरीवाल यांना सांगितले होते.

शेतक-यांच्या आंदोलनामुळे व्यापा-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे उद्योगपतींनी यावेळी सांगितले. पंजाबच्या दोन्ही सीमांवर वर्षभरापासून शेतकरी आंदोलन करत असल्याने व्यापार आणि ट्रकची वाहतूक विस्कळीत होत असल्याची तक्रारही या व्यापा-यांनी केजरीवाल यांच्याकडे केली होती. अशा परिस्थितीत पंजाबमधील आम आदमी सरकारने विचारपूर्वक रणनीती आखून शेतकरी आंदोलकांवर कारवाई केली. दोन दिवसांपूर्वी दोन्ही सीमांवर आंदोलक शेतक-यांवर पाण्याचे फवारे मारण्यात आले होते.

# दिल्लीच्या धर्तीवर बिहार काबीज करणार?

**पाटणा :** भाजपने सलग तीन वेळा देशाची सत्ता काबीज केली, पण बिहारमध्ये त्यांना स्वबळावर सरकार बनवता आलेले नाही. जाती-धर्माच्या राजकारणाने वेढलेल्या बिहारमध्ये भाजपला सातत्याने नितीशकुमारांचा टेकू घ्यावा लागत आहे. पण, आता भाजपने राज्यात स्वबळावर सत्ता काबीज करण्याच्या दिशेने मार्गक्रमण केल्याचे पाहायला मिळत आहे.



सात महिन्यांनी होऊ घातलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आतापासूनच तयारीला लागला आहे. नितीश मंत्रिमंडळाच्या विस्तारातून भाजपने आधीच आपली पॉवर दाखवली आहे. आता भाजपने बिहारबाहेर राहणा-या बिहारी मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

बिहारच्या सत्तेने अनेकदा भाजपाला हुलकावणी दिली आहे. पण, आता बिहार काबीज करण्यासाठी भाजपने नव्या रणनीतीवर काम सुरू केले आहे. 'एक भारत श्रेष्ठ भारत, स्नेह मिलन' कार्यक्रमांतर्गत भाजपने देशभरात राहणा-या बिहारी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

दिल्ली निवडणुकीच्या 'चोखा-बाटी' मोहिमेपासून प्रेरणा घेत भाजप एनआरआय बिहारींचा पाठिंबा मिळवण्यासाठी विविध शहरांमध्ये सभा घेणार आहे. २२ मार्च रोजी बिहार दिनानिमित्त भाजप या योजनेचा शुभारंभ करणार आहे. २२ मार्च ते ३० मार्च या कालावधीत भाजप नेते देशातील विविध राज्यात राहणा-या बिहारमधील लोकांच्या बैठका घेणार आहेत.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत पूर्वांचली मतांचा विश्वास जिंकण्यासाठी भाजपने 'चोखा-बाटी' हा कार्यक्रम आयोजित केला होता. या निमित्ताने दिल्लीत राहणा-या बिहारच्या जनतेशी संवाद प्रस्थापित करण्यात भाजप नेत्यांना यश आले आणि आता त्याच धर्तीवर देशभरात राहणा-या बिहारी नागरिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. परदेशात राहणा-या बिहारमधील लोकांसोबत कार्यक्रम आयोजित करण्यासाठी देखील भाजप एक टीम तयार करणार आहे. प्रत्येक कार्यक्रमासाठी एक टीम असेल, जी प्रमुख शहरे आणि भागात संवाद स्थापित करण्याचा प्रयत्न करेल.

**जाहीर नोटीस**

खालील तपशिलात नमूद केलेले मुळ दस्तावेज हे श्री . लहू नारायण वायकर आणि इतर रा.पाटण, मळवली, पुणे - ४१०४०५ यांच्या मालकीचे गट ५९ मधील बिनशेती प्लॉट नं. ४ यांसी एकूण क्षेत्र ४६११.२ चौ. फुट ४२८.३९ चौ.मी पैकी दक्षिणेकडील प्लॉट चे क्षेत्र २१४.९५ चौ.मी हि मिळकत, या मिळकतीचे मुळ दस्तावेज मधील पान नं.४८ व ४९ यांचे ताब्यातून हरविले आहेत / गहाळ झालेले आहेत व अथक प्रयत्न करूनही सदर दस्तावेज हे मिळून आले नाहीत. तरी सदर दस्तावेज मधील पान नं. ४८ व ४९ हे कोणासही मिळाल्यास अथवा त्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या व्यक्तीस संपर्क करून सदर मूळ दस्तावेज वा माहिती द्यावी असे नम्र आवाहन असे.

**हरवलेल्या दस्तावेजांचा तपशील :-** ज्योती सुनिल कर्णिक स्वतः करिता प्रज्ञा राकेश राजे यांची माता व कुलमुखत्यार म्हणून आणि इतर यांनी श्री. पराग गंगाधर जोगळेकर आणि सौ. पल्लवी पराग जोगळेकर यांचे हक्कांत लिहून दिलेले दि. ११/०७/२०१४ रोजीचे मा. दुय्यम निबंधक मावळ यांचे कार्यालयामध्ये अनु. क्र. ४२५२/२०१४ अन्वये नोंदणीकृत झालेले मूळ दस्तावेज (साखळी दस्तावेज) या खरेदीखताचे पान नं.४८ व ४९.

**ॲड. अजित बापू खामकर**
**ऑफिस नं. ०३, तळमजला, लक्ष्मी नारायण कॉम्प्लेक्स,**
**चिंचवडगाव मेन बस स्टॉप जवळ, चिंचवड, पुणे- ०३३/ मो. नं. ८६६८४१६७५७**

# चीनला रोखण्यासाठी भारतच हवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत लवकरच जपान, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि फिलीपिन्सच्या 'स्कॉड' गटात सामील होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. फिलीपिन्स सशस्त्र दल प्रमुख जनरल रोमियो एस. ब्रोनर यांनी यासंबंधीचे संकेत दिले आहेत. 'दक्षिण चीन समुद्रात' चीनचे वर्चस्व रोखण्यासाठी पथकाचा विस्तार करण्याची योजना आहे. त्याअंतर्गत भारत आणि दक्षिण कोरियाला त्यात समाविष्ट करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

नवी दिल्लीत झालेल्या 'रायसीना संवाद'मध्ये फिलीपिन्सचे जनरल ब्रोनर बोलत होते. यावेळी, त्यांचे जपानी समकक्ष, भारतीय नौदलाचे प्रमुख, अमेरिकेच्या इंडो-पॅसिफिक कमांडचे कमांडर आणि ऑस्ट्रेलियाचे संयुक्त ऑपरेशन्स प्रमुख त्यांच्यासोबत व्यासपीठावर उपस्थित होते.

स्क्वॉड अजूनही एक अनौपचारिक गट आहे. मात्र, त्याचे सदस्य देश एका वर्षाहून अधिक काळ दक्षिण चीन समुद्रात संयुक्त सागरी उपक्रम राबवत आहेत. 'दक्षिण चीन समुद्रात' चीनच्या एकतर्फी दाव्यांना आव्हान देण्यासाठीच हा गट स्थापन करण्यात आला आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनचे वर्चस्व रोखण्यासाठी भारत आधीच एका विशेष गट 'क्वाड'चा भाग आहे. यामध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान त्यांच्यासोबत आहेत.



चीन संपूर्ण 'दक्षिण चीन समुद्रावर' आपला दावा करत आहे. त्यांनी या प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा निर्णयही नाकारला आहे. फिलीपिन्स, इंडोनेशिया, तैवान, मलेशिया, ब्रुनेई आणि व्हिएतनामच्या किनारपट्टी देखील चीनप्रमाणेच 'दक्षिण चीन समुद्राला' स्पर्श करतात, परंतु चीन या देशांच्या दाव्यांकडे आणि सार्वभौमत्वाकडे दुर्लक्ष करतो. 'दक्षिण चीन समुद्र' हा सर्वात महत्वाच्या सागरी व्यापार मार्गांपैकी एक आहे, जिथे दरवर्षी ३ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचा व्यापार होतो.

'दक्षिण चीन समुद्रात' चीनच्या वाढत्या लष्करी उपस्थितीच्या आव्हानांना फिलीपिन्स आणि जपान सतत तोंड देत आहेत. दक्षिण चीन समुद्रात असे अनेक प्रसंग आले आहेत जेव्हा चिनी जहाजे जपानी आणि फिलीपिन्सच्या जहाजांशी भिडली आहेत.

जनरल ब्रोनर म्हणाले, 'आपला भारताशी साम्य आढळते कारण आपला शत्रू एकच आहे. आणि चीन हा आपला समान शत्रू आहे हे सांगण्यास मला कोणतीही भीती वाटत नाही. म्हणून आपण सर्व बाबतीत एकमेकांना सहकार्य करणे महत्वाचे आहे. ते म्हणाले की, फिलीपिन्सची भारतीय लष्करी आणि संरक्षण उद्योगासोबत आधीच भागीदारी आहे. त्यांनी असेही सांगितले की जेव्हा ते भारताचे संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान यांना भेटतील तेव्हा ते भारताला 'पथकात' सामील होण्याचा प्रस्ताव देतील.

# भारतही आयात शुल्क लादणार?

## चीन, दक्षिण कोरिया आणि जपानला फटका बसण्याची शक्यता




### स्टीलचा पुरवठा करणे महाग होईल

● भारताने पोलाद आयातीवर शुल्क आकारल्याने विदेशी कंपन्यांना भारताला पोलाद पुरवठा करणे महाग होणार आहे. चीन दरवर्षी एक अब्ज टनांपेक्षा जास्त स्टीलचे उत्पादन करतो. चीनने आपली अर्थव्यवस्था चांगली नसतानाही पोलादाची निर्यात वाढवली. भारतासह जगभरातील स्टीलच्या किमतींवर परिणाम झाला आहे. चीनकडून स्वस्त पोलाद मिळाल्याने स्टीलच्या किमती घसरल्या आहेत. आता अमेरिका आणि इतर देशांनी शुल्क लादल्यामुळे चीन भारतातील स्टीलची निर्यात वाढवेल, अशी भीती होती, ती टाळण्यासाठी भारताने हे पाऊल उचलले आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चीनसह इतर देशांकडून स्वस्त दरात होणारी पोलाद आयात रोखण्यासाठी १२ टक्के सुरक्षा शुल्क (सेफगार्ड ड्युटी) लावले जाण्याची शक्यता आहे. पोलाद कंपन्यांच्या मागणीनुसार व्यापार उपाय महासंचालनालयाने (डीजीटीआर) हे शुल्क लावण्याचा निर्णय घेतला असून, वित्त मंत्रालयाची मंजुरी मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल. सध्या, २०० दिवसांसाठी तात्पुरते सुरक्षा शुल्क लागू केले जाईल, जे भविष्यात वाढविले जाऊ शकते. यामुळे चीन, दक्षिण कोरिया, जपान या देशांना फटका बसण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने सर्व स्टील आणि ॲल्युमिनियम आयातीवरील शुल्क २५ टक्क्यांपर्यंत वाढवले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून कॅनडा, युरोपियन युनियन आणि ब्रिटननेही आयात शुल्क लागू करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे भारतात स्वस्त दरात स्टीलचा पुरवठा होण्याची शक्यता बळावली होती. त्यादृष्टीने टाटा, जिंदाल स्टील, सेल आणि इतर स्टील कंपन्यांनी सरकारकडे सेफगार्ड ड्युटी लागू करण्याची मागणी केली होती. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि युरोपीय संघाने स्टील आणि ॲल्युमिनियमवर आयात शुल्क वाढवल्याने भारताचे नुकसान होणार असल्याचे कंपन्यांनी सांगितले. चीन आणि इतर काही देश त्यांचे स्थानिक उत्पादित स्टील स्वस्त दरात भारताला पुरवतील, ज्यामुळे देशांतर्गत उद्योगाला मदत होईल.

पोलाद कंपन्यांनी सरकारकडे २५ टक्के शुल्क लावण्याची मागणी केली असली तरी १२ टक्के शुल्क लावण्यामागे सरकारला त्याचा किती परिणाम होईल हे पाहायचे असल्याचे मानले जात आहे.

त्यानंतरही स्वस्त दरात स्टील आयात केल्यास भविष्यात सरकार त्यात वाढ करू शकते.



## योगी आदित्यनाथ गरजले

# परदेशी आक्रमकांचा गौरव करणे हा द्रोहच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देशभरात सुरु असणाऱ्या औरंगजेबाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर महत्वाचे विधान केले आहे. त्यांनी देशात सुरु असणाऱ्या वादावर बोलताना, नवीन भारत कोणत्याही परदेश आक्रमकांना स्वीकारणार नाही तसेच त्यांचा गौरव करणे म्हणजे देशद्रोहच असल्याचे म्हटले आहे.

योगी आदित्यनाथ हे बहराइचच्या तहसील मिहीपुरवा (मोतीपूर) च्या मुख्य इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित होते. या दरम्यान, त्यांनी आपल्या भाषणात त्यांनी विरोधकांना इशारा दिला आहे. आपल्या भाषणात सुरुवातीला बहराइचची ओळख महाराजा सुहेलदेव यांच्या शौर्याशी जोडली. सय्यद सालार मसूद गाझी यांचे नाव न घेता योगी आदित्यनाथ म्हणाले की, महाराजा सुहेलदेव यांनी बहराइचमध्ये परदेशी आक्रमकांचा पराभव केला होता. बहराइच हे नाव बालारक ऋषींच्या नावावरून ठेवण्यात आले.

महाराजा सुहेलदेव आणि ऋषी बालारक हे बहराइचची ओळख असल्याचे सांगताना मुख्यमंत्री योगी म्हणाले की, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी रात्रभर राहावे लागेल. जग भारताच्या सनातन संस्कृतीचे कौतुक करत आहे. तेच करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कोणत्याही आक्रमकांचा गौरव करू नये. नवीन भारत आक्रमकांना स्वीकारणार नाही. आक्रमकाचे गौरव करणे म्हणजे देशद्रोह आहे.

संभलनंतर बहराइचमध्ये सय्यद सालार मसूद गाझी यांच्याबाबत गोंधळ वाढला आहे. खरं तर, १०३४ मध्ये, महाराजा सुहेलदेव यांनी इतर २१ लहान राजांसह बहराइच जिल्हा मुख्यालयाजवळ वाहणाऱ्या चित्तौरा तलावाच्या काठावर सालार मसूद गाझीशी युद्ध केले आणि युद्धात त्याचा पराभव केला आणि त्याला ठार मारले. त्यांचे पार्थिव बहराइचमध्येच दफन करण्यात आले, जिथे वार्षिक मेळा भरतो.

तज्ज्ञांच्या मते, सय्यद सालार मसूद गाझी यांचा जन्म १०१४ मध्ये अजमेर येथे झाला. तो परदेशी आक्रमक महमूद गझनवीचा पुतण्या असण्यासोबतच त्याचा सेनापती देखील होता. तलवारीच्या धाकाने विस्तारवादी विचारसरणी असलेले सालार मसूद गाझी १०३०-३१ च्या सुमारास अवधच्या भागात सतरीख (बाराबंकी) मार्गे बहराइच, श्रावस्ती येथे पोहोचला होता.

# २२ नक्षल्यांचा खात्मा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्तीसगड :** छत्तीसगडच्या विजापूर पोलिसांना आज मोठं यश मिळालं आहे. विजापूर-दंतेवाडा सीमेवरील जंगलात झालेल्या चकमकीत अठरा माओवादी ठार झाले आहेत. खुद्द विजापूर पोलिसांनीच याबाबत माहिती दिली आहे. आज सकाळी सात वाजल्यापासून पोलिसांचे संयुक्त पथक नक्षलवाद्यांविरोधात रवाना झाले होते.

हे पथक गंगालूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत माओवादविरोधी मोहिमेवर होते आणि आतापर्यंत १८ नक्षलवादी ठार झाले आहेत. याशिवाय कांकेर जिल्ह्यातही ४ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

विजापूर-दंतेवाडा सीमा भागाबरोबरच कांकेरमध्येही नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. या कारवाईत एकूण २२ नक्षलवादी ठार झाले असून त्यात विजापूर-दंतेवाडा सीमेवरील जंगल क्षेत्रात झालेल्या चकमकीत १८ आणि कांकेर जिल्ह्यात झालेल्या चकमकीत ४ नक्षलवाद्यांचा समावेश आहे. ही चकमक अजूनही सुरू असून आतापर्यंत चार मृतदेह आणि एक स्वयंचलित रायफल जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक इंदिरा कल्याण अलेसेला यांनी दिली. कांकेर-नारायणपूर सीमा भागात नक्षलवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांचे संयुक्त पथक शोधमोहिमेसाठी पाठविण्यात आले होते. अजूनही शोधमोहीम सुरू असून सायंकाळपर्यंत अधिक माहिती दिली जाईल, असे एसपींनी सांगितले.



**रफाह** इस्रायलने शस्त्रबंदीचे उल्लंघन करत, पुन्हा एकदा गाझा पट्टीवर जोरदार हल्ले सुरू केले आहेत. यात शेकडो पॅलेस्टिनी ठार झाले असून, इस्रायलच्या घरे सोडण्याच्या आदेशानंतर, तेथील पॅलेस्टिनी पुन्हा एकदा विस्थापित झाले आहेत.

# भारतीय लष्कराला मिळणार स्वदेशी तोफा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कर लवकरच स्वदेशी तोफांनी सुसज्ज होणार आहे. देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरतेला चालना देण्यासाठी सरकारने ७ हजार कोटी रुपयांच्या कराराला मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीने (सीसीएस) स्थानिक पातळीवर तयार केलेल्या ३०७ बंदुका तसेच टोइंग वाहनांच्या ७,००० कोटी रुपयांच्या करारावर शिक्कामोर्तब केले आहे.

अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, एटीएजीएस (ॲडव्हान्स्ड टोड आर्टिलरी गन सिस्टीम) करारामध्ये ३२७ टोइंग ट्रकचाही समावेश आहे, ज्यामुळे मार्चअखेरपर्यंत करारावर स्वाक्षरी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. १५५ मिमी/५३ कॅलिबरच्या या तोफेची रेंज सुमारे ४८ किमी आहे. नव्या तोफांच्या खरेदीमुळे भारतातील आधुनिकीकरणाला चालना मिळेल आणि भारतीय लष्कराची तयारीही वाढेल. लष्कराने २०१७ पासून अशा १०० तोफांचा समावेश केला असून, त्यातील अनेक तोफा लडाख सेक्टरमध्ये तैनात करण्यात आल्या आहेत. मुळात वाळवंटी भागासाठी या तोफा खरेदी केल्या होत्या. डीआरडीओने २०१३ मध्ये एटीएजीएस प्रकल्प सुरू केला होता, ज्याचा उद्देश लष्कराच्या जुन्या तोफांच्या जागी आधुनिक १५५ मिमी तोफा प्रणाली आणणे हा होता. डीआरडीओने भारत फोर्ज आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स लिमिटेड या दोन खासगी कंपन्यांशी तोफा तयार करण्यासाठी करार केला आहे. हा आदेश दोन्ही कंपन्यांमध्ये विभागला जाणार आहे. एटीएजीएस निविदेसाठी कमी बोली लावणारी भारत फोर्ज कंपनी ६० टक्के तोफांची निर्मिती आणि पुरवठा करणार आहे. उर्वरित ४० टक्के तोफांची निर्मिती टीएएसएल करणार आहे.

### संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरतेला चालना देणे

● यापूर्वी १ फेब्रुवारी रोजी भारताने केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण बजेटसाठी ६.८१ लाख कोटी रुपयांची तरतूद केली होती. यामध्ये लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी १.८ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. लष्कराच्या खरेदी यादीत सध्या लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स, युद्धनौका, पाणबुड्या, रणगाडे, तोफखाना, ड्रोन, रॉकेट आणि क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. एका अहवालानुसार २०१५-१९ ते २०२०-२४ या कालावधीत भारताच्या शस्त्रास्त्र आयातीत ९.३ टक्क्यांनी घट झाली आहे.

## शेतकऱ्यांच्या विरोधात शेतकरी विरोधी एकत्र



**नवी दिल्ली :** शंभू आणि खनौरी आंदोलनस्थळांवरून शेतकऱ्यांना बेदखल केल्याप्रकरणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भाजप आणि 'आप'वर हल्ला चढवला आहे. भाजप आणि 'आप' हे दोन्ही पक्ष सत्तेच्या अहंकाराच्या नशेत असून शेतकऱ्यांविरोधातील कारवायांसाठी ते दोषी आहेत, असा आरोप खर्गे यांनी केला. देशातील अन्नदात्यांविरोधात आता दोन शेतकरीविरोधी पक्ष एकत्र आल्याचे दिसून येत आहे. आधी पंजाब सरकारने शेतकऱ्यांना चर्चेसाठी बोलावले आणि नंतर त्यांना आंदोलनस्थळावरून बळजबरीने हटवले, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

## दिल्लीत अकबर रोडच्या फलकाची विटंबना




**नवी दिल्ली :** काश्मिरी गेट आयएसबीटी येथील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याची तोडफोड केल्याच्या निषेधार्थ लुटियन्स दिल्लीतील अकबर रोडवरील फलकाची गुरुवारी अज्ञात व्यक्तींनी विटंबना केली. नवी दिल्ली नगरपरिषदेच्या (एनडीएमसी) अखत्यारित येणाऱ्या या फलकाची पालिका प्रशासनाने तातडीने साफसफाई केली. एनडीएमसीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, या प्रकरणाच्या चौकशीनंतर एफआयआर दाखल केला जाईल. पोलिसांनी तपास सुरू केला असून संबंधितांची ओळख पटविण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजचा आढावा घेतला जात आहे. या संदर्भात चौकशीसाठी तातडीने पथके रवाना करण्यात आली असून, आम्ही या भागावर बारकाईने लक्ष ठेवून आहोत, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

## जातीय तेढ प्रकरणी एकाला अटक



**श्रीनगर :** सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी श्रीनगरमध्ये एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण करण्याच्या प्रयत्नांची श्रीनगर पोलिसांनी दखल घेतली आहे. एका व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे, तर इतरांची ओळख पटविण्यात आली आहे, असे श्रीनगर पोलिसांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. कायद्याच्या कठोरतेला सामोरे जावे लागू नये म्हणून प्रत्येकाने जातीय मजकूर पोस्ट करणे टाळावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## आसाममध्ये नववीचा इंग्रजीचा पेपर लीक



**बारपेटा (आसाम) :** आसाममधील बारपेटा जिल्ह्यात गुरुवारी होणारी इयत्ता नववीची इंग्रजीची वार्षिक परीक्षा प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर लीक झाल्याने रद्द करण्यात आली आहे. बारपेटाचे शाळा निरीक्षक रतुलकुमार दास यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा प्रमुखांना आदेश जारी करून परीक्षा रद्द झाल्याची माहिती दिली. परीक्षेची नवी तारीख नंतर जाहीर केली जाईल.

## मणिपूरमध्ये तीन दहशतवाद्यांना अटक



**इंफाळ :** मणिपूरमध्ये सुरक्षा दलांनी गेल्या २४ तासांत विविध प्रतिबंधित संघटनांशी संबंधित तीन दहशतवाद्यांना अटक केली असून त्यापैकी दोघांकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. सुरक्षा रक्षकांनी बुधवारी तेंगनौपाल जिल्ह्यात प्रेपाक (पीआरओ) सदस्य लैशराम टोम्बा सिंग (२७) आणि कांगलेई यावोल कन्ना लुप चा कॅडर युमनाम रोशन मेइतेई (३३) यांना अटक केली. त्यांच्याकडून लाईट मशीन गन (एलएमजी), तीन मॅगझिन, एके-५६ रायफल, दोन मॅगझिन आणि इतर दारुगोळा जप्त करण्यात आला आहे.

# अवैध माती वाहतूक करणारे वाहन पसार

## महसूल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत



**खेड** दरकवाडी येथे वाडा रस्त्यावर लाल माती टाकून पळून गेलेल्या हायवा ट्रकवर खेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**खेड :** लाल रंगाच्या मातीने भरलेला हायवा ट्रक पकडला खरा पण महसुल अधिकाऱ्यांच्या समोरच भर रस्त्यावर ही माती खाली करून चालकाने दांडा मारला.. आणि अधिकारी पाहतच राहिले. कारण या वाहनाला नंबर प्लेट नव्हती. चालकाचे नाव विचारले तर त्याने फक्त पांडा काळे एवढेच सांगितले. त्यामुळे अधिकाऱ्यांना पोलिसांत तक्रार देण्यापलीकडे काही करता आले नसल्याचा प्रकार सोमवारी घडला. मात्र, या प्रकाराने खेड तालुक्यात राजरोस सुरू असलेल्या अवैध धंद्याचे बिंग फुटले असल्याचे मानले जात आहे.

याबाबतची हकीकत अशी की, शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तहसील कार्यालयात आयोजित करण्यात येणारा लोकशाही दिन तालुक्याच्या विविध भागातील गावात घेण्यात येणार आहे. खेड महसुल विभागाच्या वतीने प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा लोकशाही दिन वाडा येथे आयोजित करण्यात आला होता.

येथे जाण्यासाठी प्रांताधिकारी दौंडे व इतर अधिकारी रवाना होत असताना चासकमान धरणाच्या परिसरात असलेल्या दरकवाडी हद्दीत वाडा रस्त्याच्या कडेला पंक्चर झालेल्या स्थितीतील एक हायवा उभा केला होता. अधिकाऱ्यांनी वाहनांचा ताफा थांबवला. वाहनात जवळपास ९ ब्रास लाल रंगाची माती भरलेली होती. वेताळे सजाच्या मंडळ अधिकारी शीतल शेवाळे यांनी वाहनाबाबत चौकशी केली. उत्खननाबाबत माहिती घेतली, त्यावेळी येथे उपस्थित असलेल्या चालक पांडा काळे या व्यक्तीने उडवाउडवीची उत्तरे दिली.

अधिकारी चौकशीत व्यस्त असताना पंक्चर काढून झाल्याबरोबर भर रस्त्यावर माती खाली करून चालक हायवा घेऊन राजगुरुनगरच्या बाजूने वेगात निघुन गेला, असे शीतल शेवाळे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, सरकारी कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहनाचा आणि पांडा काळे या व्यक्तीचा शोध खेड पोलिस घेत आहेत.

### अवैध उत्खननाच्या घटना

● खेडच्या पश्चिम भागात माती आणि मुरुमाचे अवैध उत्खनन होत असल्याचे या घटनेने समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात अधिक माहिती घेतली असता, अनेक गावात असे अवैध उत्खनन सुरू असल्याचे सांगण्यात आले. रात्रीच्या अंधारात वाहनांचे नंबर प्लेट काढून वाहतूक सुरू असते. नंबर प्लेट नाही अशी वाहने रात्री वेगात चालवली जात असताना, अनेक अपघात देखील झाले आहेत. असे उत्खनन करताना अल्प दरात शेतातील माती, मुरूम काढण्याचे काम करण्यात येत आहे. असे करताना शेत जमीन मालकाला अल्प मोबदला देऊन ही माती वीटभट्टी चालकाना भरमसाठ किमतीला विक्री केली जाते. शिवाय ठरल्यानुसार उत्खनन न करता दादागिरी करून भरमसाठ माती, मुरूम वाहुन नेला जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत. काँग्रेसचे तालुका अध्यक्ष तथा भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस यांनी याबाबत नुकताच आवाज उठवला होता.

# राजगुरूनगर शहरातील अवैध धंदे बंद करा

## पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांचे आदेश

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**खेड :** राजगुरूनगर शहर व परिसरातील अवैध जुगार, मटका, कॅफे, लॉज, क्लब हे काळे धंदे तात्काळ बंद करण्याचे आदेश खेड पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना व पोलिसांना दिले असल्याची माहिती पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी शनिवारी खेड पोलीस ठाण्याच्या कार्यालयीन कामकाजाची तपासणी केली. यावेळी त्यांनी तालुक्यातील पोलीस पाटील, पत्रकार, विविध सामाजिक संस्थांचे पदाधीकारी, महिला दक्षता कमिटीच्या महिलांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

देशमुख म्हणाले की, खेड तालुक्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा आम्ही नेहमी घेतो, आजही घेतला आहे. आवश्यक त्या सूचना, आदेश पोलिसांना दिले आहेत. त्यानंतर पोलीस पाटील यांच्याशी चर्चा करताना ते म्हणाले की, पोलीस पाटील हा पोलीस आणि नागरिक यांच्यातील दुवा आहे. पोलीस यंत्रणा पोलीस पाटलावर अवलंबून आहे. पोलीस पाटलांनी आपल्या कार्यक्षेत्रात जागरूक राहून काम करावे.

पोलीस पाटील यांनी गाव पातळीवर ज्या गोष्टी होतात त्या लाजेखातर, इज्जत- इभ्रत जपण्याच्या चुकीच्या पद्धतीने गावपातळीवर राहतात. हे होत असले तरी पोलीस पाटलांनी त्याला दुजोरा देता काम नये, त्याबाबत पोलीस पाटलांनी तत्परतेने पोलिसांकडे माहिती दिली पाहिजे.

देशमुख म्हणाले, जिल्ह्यातील खेड पोलीस ठाणे महत्वाचे पोलीस केंद्र आहे. या कार्यक्षेत्रात एमआयडीसी, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ), आहे. त्यात कायदा सुव्यवस्था राखणे पोलिसांचे काम आहे. एमआयडीसी, विशेष आर्थिक क्षेत्र यामध्ये पोलिसांना काही सेवा सुविधा लागतील त्या देण्याचा आमचा प्रयत्न आहे.


पोलीस ठाणे तपासणी सह एमआयडीसी, एसईझेड यांच्यातील उद्योजकांच्या बैठकांचे नियोजन केले आहे. इंडस्ट्रीज मधील गुंडगिरी, धमक्या, वर्चस्व, खंडणी यावर पोलिसांचे बारकाईने आहे. त्यांच्यावर आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज केली आहे.

काही गावात, शहरात टोळ्या चालवल्या जातात. त्यात कायद्यातील पळवाट शोधुन अल्पवयीन मुलांचा वापर करून घेतला जात आहे. त्यांच्याकडून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून घेतले जात आहेत.

या गुन्ह्यातील १६ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या गुन्हेगाराला जास्तीची शिक्षा कशी होईल याकडे पोलिसांचे लक्ष आहे. तडीपारी पासून मोका पर्यंत कारवाई करण्यासाठी विशेष अधिकारी नेमले आहेत. राजगुरूनगर सह तालुक्यात अवैध लॉज, कॅफे, जुगार, मटका आणि गुंडगिरीचे बंद करण्यासाठी पोलिसांना आदेश दिले आहेत. त्याचा अहवाल आठ दिवसात संबंधीत पोलीस स्टेशनचे अधिकारी देतील. यावर तात्काळ कारवाई सुरु केली जाणार आहे. पुढच्या महिन्यात व्हॉटसअप नंबर रिलीज करणार आहोत. त्यावर सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी मागवून तात्काळ कारवाई केली जाणार आहे.

# पर्वतमाला अंतर्गत आठ ठिकाणी रोपवे

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**खेड :** केंद्र शासनाच्या पर्वतमाला योजनेंतर्गत राज्यातील गडकिल्ल्यांचा व पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येणार असून, पुणे जिल्ह्यातील खंडोबा निमगाव, सिंहगड, जेजुरी, राजगड, शिवनेरी, लेण्याद्री, दा-या घाट, भिमाशंकर या आठ ठिकाणी रोप वे सुविधा करण्यात येणार आहे. राज्य शासनाने नुकतीच या प्रकल्पांना मान्यता दिली असून, या संदर्भात सविस्तर अध्यादेश काढला आहे.

पुणे जिल्ह्याला त्यातही जुन्नर, खेड आणि आंबेगाव तालुक्याला सह्याद्रीच्या पर्वत रांगामुळे समृध्द पर्यटनाचा मोठा वारसा लाभला आहे. परंतु बहुतेक पर्यटन स्थळे मुलभूत पायाभूत सोयी-सुविधांच्या अभावामुळे दुर्लक्षित राहिली आहेत. परंतु आता केंद्र शासनाच्या पर्वतमाला योजनेंतर्गत या पर्यटन स्थळांचा विकास होणार आहे. यासाठी राज्य सरकारने देखील पुढाकार घेतला आहे.

### या पर्यटन स्थळांवरील रोप वे मान्यता

● पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील तीन आणि खेड तालुक्यातील दोन व अन्य तीन अशा एकूण ८ पर्यटन स्थळांवर रोप वे सुविधा करण्यात येणार आहे. यात खंडोबा निमगाव- खेड , सिंहगड - पुणे, जेजुरी- पुरंदर, राजगड- वेल्हा , शिवनेरी- जुन्नर, लेण्याद्री- जुन्नर, दा-या घाट- जुन्नर, भिमाशंकरला- खेड समावेश आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना त्वरित वाळू पुरवावी

## पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांची प्रांताधिकाऱ्यांकडे मागणी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**अवसरी :** आंबेगाव तालुक्यात घोड नदीवर वाळूच्या साठे मुबलक प्रमाणात शिल्लक आहेत, आंबेगाव तालुक्यातील अनेक घरकुले मंजूर आहेत. मात्र, वाळूअभावी घरकुलांची कामे ठप्प झाली आहेत. महसूल प्रशासनाने या घरकुल लाभार्थ्यांना वाळू पुरवावी, अशी मागणी पारगावचे माजी आदर्श उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी केली आहे.

राज्य सरकारने घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू देण्याची घोषणा केली आहे. आंबेगाव तालुक्यातील अनेक घरकुले, घरकुलांची बांधकामे वाळू अभावी ठप्प झाली आहेत. त्यामुळे अशा लाभार्थ्यांना त्वरित पाच ब्रास वाळू पुरवावी, अशी मागणी आंबेगाव जुन्नरचे प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी केली आहे.

शासनाने घोषित केल्याप्रमाणे घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत करण्यात येणार आहे. घोड नदीवर मोठ्या प्रमाणात वाळूचे साठे शिल्लक आहेत. हे साठे खराब होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांना ही वाळू पुरवावी, अशी आग्रही मागणी ढोबळे यांनी केली आहे.

यावेळी माजी आदर्श उपसरपंच विठ्ठल ढोबळे, बजरंग देवडे, सुरज ढोबळे आदी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकाऱ्यांनी तहसीलदार संजय नागटिळक यांनी लाभार्थ्यांना वाळू पुरवावी अशा सूचना केल्याचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी सांगितले.



**मंचर** मंचर येथे प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांना पारगावचे माजी आदर्श उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी मागणीचे निवेदन दिले.

# बारामती बाजार समितीत तूर खरेदी केंद्राचा शुभारंभ




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये मुख्य आवारातील यांत्रिक चाळणी येथे शासना मार्फत नाफेड व जिल्हा मार्केटींग फेडरेशन यांचे वतीने हमीभाव तूर खरेदी केंद्राचा शुभारंभ सभापती विश्वास आटोळे यांचे हस्ते करण्यात आला.

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या पीएसएस योजने अंतर्गत दि. २४/०१/२०२५ पासुन जिल्हा मार्केटींग फेडरेशन, पुणे यांनी कळविले नुसार हमीभावाने शेतक-यांची तूर खरेदी करणे करिता ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरू करणेत आली आहे.

ज्या शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी केली, अशा शेतक-यांनी तूर आणुन खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे सभापती विश्वास आटोळे यांनी केले आहे.

तूर खरेदी पूर्ण जिल्ह्यात फक्त बारामती येथे सुरु झाले असून संपूर्ण पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान उपसभापती खलाटे रामचंद्र यांनी केले. केंद्र शासनाने ठरवुन दिलेल्या रू. ७,५५०/- या हमीदरा नुसार तूर खरेदी करणेत येणार आहे. शुभारंभाचे पहिल्या दिवशी इनामगाव (ता. शिरूर जि. पुणे ) येथील शेतकरी दिलीपराव मोकाशी, संग्राम मोकाशी, गोपाळराव मोकाशी,अमरसिंह मोकाशी, सुरेखा मोकाशी या शेतक-यांची ४० क्विंटल तूर खरेदी करणेत आली. नोंदणी सुरू झाल्यापासुन आत्तापर्यन्त ४५ शेतक-यांनी नाव नोंदणी केली आहे.

शासनाच्या निकषाप्रमाणे जमिनीचा ७/१२ उतारा व त्यावर तूरीची नोंद असलेला सन २०२४-२५ पिकपेरा, आठ-अ, आधारकार्ड आणि आयएफएससी कोडसह बँकेचे पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर इत्यादी संपुर्ण कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतक-यांची तूर खरेदी करणेत येणार असल्याने मुदतीत शेतक-यांनी नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या शेतक-यांना खरेदी वेळी एसएसएम द्वारे कळविणेत येईल, त्याच तारखेला तूर आणावयाची आहे. खरेदी केंद्रावर तूर आणताना शासनाचे निकषा प्रमाणे एफ.ए.क्यु. दर्जाची, स्वच्छ व वाळवुन आणावी. तूरीची तपासणी करून स्वच्छ व वाळलेली तूर खरेदी करणेत येईल अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.

### ऑनलाईन नोंदणी आवश्यक

● **ज्या तूर उत्पादक शेतक-यांना नाव नोंदणी करावयाची आहे त्यांनी २२ मार्च २०२५ पर्यन्त बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघ, तिन हत्ती चौक बारामती येथे ऑनलाईन नाव नोंदणी करावयाची आहे असे आवाहन निरा कॅनॉल संघाचे चेअरमन सतीशराव काकडे यांनी केले आहे. यावेळी निरा संघाचे अधिकारी सुरेश काकडे, अमोल कदम, प्रशांत मदने तसेच बाजार समितीचे सुर्यकांत मोरे उपस्थित होते.**

# पाईट येथे मोफत किसान कार्ड नोंदणी अभियान



**खेड :** पाईट आणि परिसरातील गावातील शेतकऱ्यांसाठी बॉश इंडिया फाउंडेशन, दरेकर सोशल फाउंडेशन, मंडल अधिकारी पाईट व ग्रामपंचायत पाईट यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी बांधवांसाठी नुकतेच मोफत किसान कार्ड नोंदणी (अँग्रीस्टॅक) अभियान ग्रामपंचायत कार्यालय पाईट या ठिकाणी घेण्यात आले. यामध्ये पाईट, रौंधळवाडी,आहिरे, तोरणे, परळे, हेद्रुज, बच्चेवाडी, अनावळे, पाळू, कासारी, सुपे, आडगाव, धामणे, कुरकुंडी, आसखेड, तोरणे बुद्रुक, टेकवडी, वाघू. या गावातील ७०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला व ५०० पेक्षा जास्त लोकांनी प्रत्यक्ष लाभ घेतला. सदर कॅम्प पूर्णतः मोफत असल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. किसान कार्डची नोंदणी केल्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे तसेच शेतकऱ्यांची डिजिटल ओळख निर्माण होणार आहे. त्यामुळे भविष्यात कोणत्याही शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाहीत. सदर कॅम्पचे आयोजन बॉश इंडिया फाउंडेशनचे सीएसआरचे प्रतिनिधी रोहित बलुरे, राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष जयसिंग दरेकर, पाईट मंडल अधिकारी मनिषा सुतार , ग्रामविकास अधिकारी अनिल फुलपगार यांनी केले. यावेळी तिरुपती गवळी पतसंस्थेचे अध्यक्ष हिरामण रौंधळ, माजी चेअरमन पंडित रौंधळ, माजी उपसरपंच गुलाब खेंगले, युवक संघटक युवराज बंदावने, चेअरमन विजय करंडे, माजी सरपंच मंगल भांगे,कारभारी बबन खेंगले, कृषी सहाय्यक अमृता गेंगजे, ग्राममहसूल अधिकारी माणिक क्षीसागर, निलेश मांजरे, बाळासाहेब पापळ, संचालक नंदूशेठ डांगले आदी उपस्थित होते.

# ग्राहकांचे हक्क व सायबर फसवणूकप्रश्नी मार्गदर्शन



**बारामती :** जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने 'अखिल भारतीय ग्राहक पंचायत' बारामती तालुक्याच्या वतीने बुधवारी विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्याल बारामती येथे आयोजित कार्यक्रमात ग्राहक संरक्षण परिषद सदस्य अँड तुषार झेंडे पाटील यांनी मार्गदर्शन केले. ग्राहकांचे हक्क, अधिकार न्यायालयात व सायबर फसवणूक व कोणत्या प्रकारे काळजी घेतली पाहिजे व बीएसआय केयर, जाग्रुती अँप यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. सदर कार्यक्रमास विद्या प्रतिष्ठान इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस बी. लांडे, तालुका पुरवठा अधिकारी श्रीमती तितिक्षा बारापत्रे, अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुका अध्यक्ष संजीव बोराटे ,संघटक सतीश खंडाळे, महिला अध्यक्षा मंजुश्री तावरे, सचिव महेश पवार, सहसचिव युवराज इंदलकर, नानासाहेब तावरे, बाबासाहेब शिंदे, चेतन मोहिते, धनंजय तावरे, नागेश देशमाने, तसेच ग्राहक सरंक्षण परिषदेचे सदस्य दिलावर तांबोळी, प्रमोद जाधवसह विद्या प्रतिष्ठान इंजिनिअरिंग कॉलेजचे डॉ. पी. आर. चित्रगार, डॉ. हाफिज शेख, शशांक बिरादार, पी. एम. पाटील, संतोष करे, के. एम. जाधव, आर. एच. अंबोले यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीरज सातपुते, ईशान शेवते यांनी केले, तर पाहुण्यांचे स्वागत व सत्कार समारंभ डॉ. पी. आर. चित्रगार, डॉ. हाफिज शेख आणि शशांक बिरादार यांनी केले. आभार संजीव बोराटे यांनी मानले.

# खैरेवाडीच्या उपसरपंचपदी निखील गोडसे बिनविरोध



**शिक्रापूर :** खैरेवाडी, ता. शिरुर ग्रामपंचायतचे उपसरपंच यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत निखील गोडसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. खैरेवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच श्रीकांत तळोले यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी नुकतीच सरपंच सिमा खैरे यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला जाधव यांच्या नियंत्रणाखाली उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच सीमा खैरे, मावळते उपसरपंच श्रीकांत तळोले, ग्रामपंचायत सदस्य स्वाती पवार, सुलभा देशमुख, निखील गोडसे, प्रवीण खैरे हे उपस्थित होते, दरम्यान उपसरपंच पदासाठी निखील गोडसे यांनी अर्ज दाखल केला तर विहित वेळेत अन्य कोणाचाही अर्ज न आल्याने निखील गोडसे यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविकास अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला जाधव यांनी जाहीर केले. निवडीनंतर नवनिर्वाचित उपसरपंच निखील गोडगे यांच्या ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला, याप्रसंगी माजी सरपंच रामदास मांदळे, माजी फक्कड खैरे, माजी उपसरपंच नंदकिशोर गोडसे, पोलीस पाटील मंगेश चव्हाण, नवनाथ खैरे, मुरलीधर मांदळे, माधव मांदळे, संजीवन मांदळे यांसह आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## बाल विकास मंदिर शाळेत पर्यावरणपूरक रंगपंचमी



**सासवड :** विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक रंगपंचमी खेळावी यासाठी मएसो बाल विकास मंदिर शाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक रंग तयार करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले होते. यासाठी इयत्ता ३ री चे वर्गशिक्षक नरेंद्र महाजन, अश्विनी कदम, राणी गिरमे यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांकडून विविध फळे, फुले, पालेभाज्या यापासून नैसर्गिक रंग तयार करून घेतले. यात विद्यार्थ्यांनी बीट, झेंडूची फुले, जास्वंदीची फुले, गोकर्णाची फुले, पालक वाळवून रंग तयार करण्यासाठी उपयोग केला. हेच नैसर्गिक रंग वापरून विद्यार्थ्यांनी आपल्या सवंगड्यांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली. वर्षभर राबविल्या जाणाऱ्या 'पर्यावरणपूरक जीवनशैली' या विषयांतर्गत वर्षभर विविध समारंभाच्या वेळी पर्यावरणाचा मानवी जीवनासाठी कसा उपयोग होतो याविषयी मार्गदर्शन केले जाते. या उपक्रमाचे शाला समिती अध्यक्ष ॲड सागर नेवसे, महामात्र सुधीर भोसले, क्रीडावर्धीनी समन्वयक डॉ. निर्भय पिंपळे, मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांनी कौतुक केले.

## खरेदी विक्री संघाची सोमवारी निवडणूक

**शिरूर :** शिरूर तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवडणूक सोमवारी (दि. २४) नवनिर्वाचित व्यवस्थापन समितीच्या प्रथम सभेत होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अरुण साकोरे यांनी दिली. यावेळी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक आरडी संकपाळ उपस्थित राहणार आहेत. नुकतीच खरेदी विक्री संघाची पंचवार्षिक निवडणूक ९ मार्च रोजी झाली असून या निवडणुकीत १७ संचालकांची निवड झाली आहे. खरेदी विक्री संघाच्या सभापती व उपसभापती पदाचे निवडणुकीसाठी सहाय्यक निबंध अरुण साकोरे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सभापती व उपसभापती पदाची निवडणूक होणार आहे. सोमवारी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत खरेदी विक्री संघाच्या कार्यालया येथे ही निवड होणार आहे. त्याच दिवशी मतदान घेऊन, मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे सभेचे अध्यक्ष तथा निवडणूक अधिकारी अरुण साकोरे यांनी सांगितले.

## चैत्रीउत्सवाची निवडणूक बिनविरोध



**सासवड :** येथील चैत्री उत्सव समितीची आज रंगपंचमीच्या दिवशी काळभैरवनाथ मंदिरात ग्रामस्थ आजी माजी पदाधिकारी ट्रस्टी उपस्थित होते. येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ महाराज यांच्या यात्रा व विविध प्रकारच्या कार्यक्रम वर्षभर चालत असतात. या यात्रेचे नियोजन व व्यवस्थापन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह सचिव, ट्रस्टी व पदाधिकारी पहात असतात. दर वर्षी ही निवडणूक बिनविरोध करण्यात येते. हीच परंपरा पुढे चालवत येथील श्री काळभैरवनाथ महाराज यांच्या मंदिरात बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष वैभव जगताप, दिपक जगताप, उत्तम जगताप, विलास जगताप, अजय जगताप, सुधाकर गिरमे, राजाभाऊ जगताप, गावचे पाटील संग्राम जगताप, अण्णा भोंगळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. येथील चैत्री उत्सवाच्या दिवशी या नवनिर्वाचितांना विषेश महत्त्व असते. यात ग्रामदैवतांची पूजा केली जाते. दोन्ही पदाधिकारी ट्रस्टी यावेळी उपस्थित असतात. ही निवडणूक एक वर्षासाठी असते, अशी माहिती वैभव जगताप यांनी दिली.

## वृक्ष संजिवनी परिवाराची अनोखी रंगपंचमी



**इंदापूर :** वृक्षाचे संवर्धन होऊन वनसृष्टी हिरवीगार व फुलांनी रंगबेरंगी होऊन पर्यावरणाचे रक्षण व्हावे, निसर्गाचे रक्षण व्हावे या भावनेने वृक्ष संजिवनी परिवाराने नगर परिषदेच्या सहकार्याने जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तळावरील ५०० झाडांना पाणी देऊन अनोख्या पद्धतीने रंगपंचमी साजरी केली गेली. वृक्ष संजिवनी परिवाराच्या सायरा भाभी आत्तार, रश्मीताई निलाखे, चंद्रकांत देवकर, अशोक अनपट, हमीदभाई आत्तार, कृष्णा ताटे, प्रशांत गिड्डे, मेजर बाजीराव शिंदे, सुधाकर बोराटे, रविंद्र परबत, देवराव मते आदी उपस्थित होते.

## जेजुरी नगर परिषदेची मोहीम



जेजुरी | जेजुरी नगर परिषदेच्या वतीने मालमत्ताकर वसुलीसाठी घरासमोर वाद्ये वाजवली जात आहेत. थकबाकी वसुलीसाठी मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

## वाजंत्री वाजवून मालमत्ता कराची वसुली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीतील नगरपरिषदेच्या वतीने मालमत्ता कर तसेच थकबाकी वसूल करण्यासाठी विविध फंडा वापरला जात असून थकबाकी दारांच्या घरासमोर वाद्ये वाजवून जनजागृती व कराची वसुली करण्यात येत आहे.

मालमत्ता कर व थकबाकी वसूल करण्यासाठी पालिकेचे सर्व आधिकारी कर्मचारी गेली १५ दिवस शहरात फिरत आहेत. स्पीकरवर मालमत्ता कर भरण्यासाठी आवाहन केले जात आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी नळ कनेक्शन तोडणे, मिळकतीची जप्ती करणे, वर्तमानपत्रे तसेच शहरात फ्लेक्स लावून त्यात थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करणे, घरासमोर वाद्ये वाजविणे अशा उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

पालिकेने जुनी जेजुरी परिसरात १४ थकबाकीदारांचे नळ कनेक्शन तोडले आहे. आतापर्यंत ४० टक्के कर वसूल झाला असून, मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी केले आहे.

# अबब... एक कोटीची फसवणूक

## बंटी बबलीसह एका युवकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर शहरातील महिलांसोबत झालेल्या ओळखीतून एका महिलेसह दोन इसमांनी महिला व तिच्या काही मैत्रिणींना लहान कंपनी प्लांटमध्ये भागीदारी देण्याचे आमिष दाखवत तब्बल एक कोटी चार लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली असल्याने, शिरुर पोलीस स्टेशन येथे सुनीता राहुल भांगे व राहुल नवनाथ भांगे या बंटी बबली सह ऋषी नवनाथ भांगे या युवकावर फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरुर शहरातील विठ्ठलनगर येथील सविता मेसे या महिलेची सुनिता भांगे या महिलेशी ओळख झाल्यानंतर ऑक्टोबर २०२२ मध्ये सुनिता यांच्यासह तिचे पती राहुल भांगे व दीर ऋषी भांगे हे सविता मेसे हिला भेटून वाटाणा सोलणे तसेच पनीर बनवण्याचा प्लांट सुरु करायचा असून, तुम्ही पैसे गुंतवा तुम्हाला फायदा होईल, असे सांगून चर्चा केली. त्यानंतर सविता मेसे यांच्यासह त्यांच्या मैत्रिणी संध्या औटी व सिमा ओव्हळ यांना भेटले.

त्यांच्याशी चर्चा करुन आम्ही वाटाणा सोलणे तसेच पनीर बनवण्याचा प्लांट सुरु करणार असून, त्यामध्ये तुम्ही पैसे गुंतवा, आम्ही तुम्हाला त्यामध्ये भागीदारी येऊन येणाऱ्या नफ्यातून काही नफा देऊ असे म्हणून तिघांनी सविता मेसे, संध्या औटी व सिमा ओव्हळ यांच्या कडून वेळोवेळी तब्बल १ कोटी ४ लाख ६६ हजार ६०० रुपये घेतले, त्यांनतर वारंवार फक्त चर्चा करुन लवकरच कंपनी सुरु होईल असे सांगितले. सुनिता भांगे, राहुल भांगे व ऋषी भांगे हे सविता मेसे व त्यांच्या मैत्रीणींशी बोलत होते. मात्र, भागीदारी देण्याबाबत चर्चा टाळू लागले. त्यानंतर वेळोवेळी चर्चा व विचारणा करुनही भांगे यांच्याकडून प्रतिसाद येत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे सविता मेसे यांच्या लक्षात आले.

याबाबत सविता अशोक मेसे (४०, रा. विठ्ठलनगर, शिरुर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सुनीता राहुल भांगे, राहुल नवनाथ भांगे, ऋषी नवनाथ भांगे (रा. केसनंद रोड, वाघोली ता. हवेली) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



# बारामती पोलिसांचा थेट मुळावरच घाव

## दुकानदारांकडून १६, वाहन चालकांकडून ११ सायलेन्सर जप्त

**बारामती :** बारामती वाहतूक पोलिसांनी आता फटाका बुलेटवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. असे असतानाच आता वाहतूक शाखेने फटाका सायलेंसर विक्री करणाऱ्या दुकानांवरच कारवाई करत तब्बल १६ फटाका सायलेंसर ताब्यात घेत थेट मुळावरच घाव घातला आहे. त्यामुळे सायलेंसर विक्री करणाऱ्या दुकान चालकांनी मोठा धसका घेतला आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी गेली अनेक महिन्यांपासून वाहतूक नियमांची अंमलबजावणी करताना अनेक कारवाया करत लाखो रुपयांचा दंड वसुल केला आहे. बारामती वाहतूक पोलिसांनी महिनाभरापासून मोठ्या आवाजाच्या सायलेंसरवर कारवाईचा धडाका लावला आहे. मागील काही दिवसांपूर्वीही पोलीस निरीक्षक यादव यांच्या मार्गदर्शना खाली १२ बुलेटच्या फटाका सायलेंसरवर कारवाई करण्यात आली होती. मात्र तरीही काही विक्रेत्यांनी मोठ्या आवाजाच्या सायलेंसरची विक्री सुरूच ठेवली होती. काही दुकानांमधून बुलेट चालक हे फटाका सायलेंसर बसवून घेतात अशी माहिती पोलीस निरीक्षक यादव यांना मिळाली होती. याअनुषंगाने पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह बारामती शहरातील मोठ्या आवाजाचे सायलेन्सर विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये तपासणी केली. या तपासणीत तब्बल १६ सायलेंसर जप्त करण्यात आले.त्यामध्ये बाइकर्स स्पेअर पार्ट ऑटोमोबाईल्स, महालक्ष्मी ऑटोमोबाईल्स, महावीर ऑटोमोबाईल्स या तीन दुकानांमध्ये मोठ्या आवाजाचे सायलेन्सर मिळून आले. बुलेट फटाका सायलेंसरवर कारवाईची मोहीम सुरू केल्यापासून आजतागायत ऐकून ५१ सायलेंसर जप्त करण्यात आले आहेत.

कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, वाहतूक पोलीस जवान सुभाष काळे, प्रदीप काळे, अजिंक्य कदम, प्रज्योत चव्हाण, सीमा घुले, स्वाती काजळे, रेशमा काळे, रूपाली जमदाडे, माया निगडे, सीमा साबळे आदींनी केली आहे.

### एकाच दिवसात ११ मोठ्या सायलेंसरवर कारवाई

- फटाका सायलेंसरवर कारवाई करण्याची मोहीम सुरु असताना दि. १८ रोजी एका दिवसात कसबा, भिगवण चौक, नेवसे रोड, इंदापूर चौक परिसरात ११ बुलेट चालकांकडून मोठ्या आवाजाचे सायलेंसर जप्त करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे बुलेट गाड्या वापरणाऱ्या चालकांना आता सायलेंट सायलेंसर वापरावे लागणार आहेत.



## रत्नागिरी हापूस भिगवणमध्ये दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर कोकणातील जगप्रसिद्ध रत्नागिरी व देवगड हापूस आंबा अखेर भिगवणमध्ये दाखल झाला आहे. हापुस आंब्याच्या १० पेट्या भिगवण येथे दाखल झाल्या आहेत. आंबा पेटी पूजनाचा कार्यक्रम ज्योती समूहाचे चंद्रशेखर पवार व दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास झोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच पार पडला.

ग्रामीण भागामध्ये सर्वात प्रथम भिगवण येथील हापुस आंबा व्यवसायिक संतोष सोनवणे यांच्या आंबा स्टॉलवर हापुस आंबा दाखल झालेला आहे. गतवर्षीच्या तुलनेत नोव्हेंबरपर्यंत पडत असलेल्या पावसामुळे जमिनीमध्ये ओलावा राहिला याचाच परिणाम पालवी उशिरा फुटली व मोहर प्रक्रिया एक महिना उशिरानंतर सुरू झाली. त्यामुळे साहजिकच हापूस आंब्याचा हंगाम हा गतवर्षीपेक्षा एक महिना लांबल्याने खवय्यांचा मोठ्या प्रमाणात हिरमोड झाल्याचे मागील काही दिवसांमध्ये पहावयास मिळत होते. रत्नागिरी (गणपतीपुळे) येथील आंबा बागायतदार विद्याधर पुसाळकर यांनी नैसर्गिक आपत्तीला तोंड देत ऑर्गानिक पद्धतीने दर्जेदार हापुस आंबा भिगवण व पंचक्रोशीतील हापूस प्रेमींसाठी उपलब्ध करून दिला आहे. तसेच यंदाच्या वर्षी हापूस आंब्याचा हंगाम हा फक्त दोन महिन्याचा असणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हापूस आंब्याला दरही चांगल्या प्रमाणात राहणार असल्याचे सांगण्यात आले.

ज्योती हॉटेल येथे पहिल्या पेटीचे पुजन उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पहिली हापूस आंब्याची पेटी चंद्रशेखर पवार यांनी १३ हजार रुपयांना खरेदी केली, दुसरी पेटी दत्तकला शिक्षण संस्थेचे रामदास झोळ यांनी, तिसरी पेटी तिसरी पेटी विजयसिंह तर चौथी पेटी सुरेश पिसाळ यांनी घेतली.

यावेळी चंद्रशेखर पवार, रामदास झोळ, बापूराव थोरात,अशोकराव शिंदे, भरत मल्लाव, तुषार शिरसागर, आकाश पवार, संपतराव बंडगर, सचिन बोगावत, संदीप वाकसे, दादासाहेब थोरात, नितीन चितळकर, केशव भापकर, शरद चितारे, योगेश चव्हाण, प्रवीण वाघ, रियाज शेख, जावेद शेख, सतीश वायसे, अल्ताफ शेख, विजय सिंग, उमेश थोपटे, सागर जगदाळे, सागर घरत, निलेश मोरे, चैतन्य बंडगर, ओम बंडगर, अक्षय एकाड,सागर सोनवणे, रोहन देशमुख, शंकर जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर प्रशांत चवरे यांनी केले.

## लाच घेताना रंगेहाथ पकडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामतीतील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाला फाईलवर सहीसाठी पावणे दोन लाखांची मागणी करणाऱ्या बारामती नगर परिषदेच्या नगररचना अधिकाऱ्याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी सायंकाळी एका जिममध्ये एक लाख रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले. विकास ढेकळे असे या नगररचना अधिकाऱ्याचे नाव आहे. विकास ढेकळे याच्यावर बुधवारी रात्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# खडकवाडी येथे बिबट्याचा वावर, वनविभागाने लावला पिंजरा!!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील सर्वार्थाने प्रगतशील गाव म्हणून ओळख असणाऱ्या खडकवाडी परिसरात बिबट्याचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याने खडकवाडी येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरात अनेक वेळा नागरिकांना बिबट्या दिसल्याचे स्थानिकांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वी आठ वाजता भैरवनाथ मंदिराजवळ रामदास गोविंद सुक्रे हे मोटरसायकल वरून मंदिराजवळून घरी जात असताना बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. यात सुक्रे जखमी झाले. नेमके याच वेळेस धामणी वन परिमंडळ अधिकारी सोनल भालेराव या खडकवाडी परिसरात गस्तीवर होत्या. खडकवाडी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष एकनाथ सुक्रे यांनी त्यांना संपर्क केला, त्वरित त्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांच्याच गाडीने सुक्रे यांना मंचर येथील आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.

गेल्या एका महिन्यात भैरवनाथ मंदिर, स्मशानभूमी या परीसरात बिबट्याचे बहुतांशी नागरिकांना दर्शन झाले आहे. बिबट्या संदर्भात माजी सरपंच अनिल डोके यांनी वनविभागाशी तातडीने संपर्क केला व या परिसरात पिंजरा बसवण्याची मागणी केली. वन विभागाने त्याची दखल घेत वडाजी बुवा मंदिर, स्मशानभूमी आणि खुडवस्ती असे तीन पिंजरे लावले आहेत. यावेळी वनरक्षक योगेश निघोट वनसेवक दिलीप वाघ, निवृत्ती सुक्रे, सुनील सुक्रे उपस्थित होते. माजी सरपंच अनिल डोके, तंटामुक्ती अध्यक्ष एकनाथ सुक्रे व ग्रामस्थांनी वनविभागाचे आभार मानले. या संदर्भात वन परिमंडळ अधिकारी सोनल भालेराव म्हणाल्या की, धामणी खिंड, खडकवाडी व इतर ठिकाणी बिबट्या दिसल्याचे नागरिकांनी सांगितले. ग्रामस्थांनी शेती, शिवारामध्ये कामाला जाताना एकटे जाऊ नये तसेच दुचाकीवर सायंकाळी सहानंतर प्रवास करताना शक्यतो एकट्याने प्रवास करू नये, कोणालातरी सोबत बरोबर ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.



## स्वच्छतेचे महत्त्व पटवण्यासाठी...

चर्चेतल्या गोष्टी

मित्रांनो, जवळपास महिनाभरापासून तुम्ही २०२५ च्या महाकुंभाच्या बातम्या ऐकत असाल. हा खरोखर एक ऐतिहासिक सोहळा होता जो आपल्याबरोबरच जगाने अनुभवला. पण याच दरम्यान एक मोठी मोहीम नोंदवली गेल्याचे तुम्हाला माहिती आहे का? होय, ही बाब नदी स्वच्छतेशी संबंधित आहे. यंदा इथे प्रचंड संख्येने भाविक आले आणि पवित्र संगमावर स्नान करुन पुण्यसंचय केला. पण त्यामुळे नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर घातक घटक मिसळले. प्रचंड कचराही झाला. तेव्हा तो स्वच्छ करण्यासाठी इथे रोज मोठ्या संख्येने लोक एकत्र काम करत होते. महाकुंभात गंगा स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला. त्याचा उद्देश सकारात्मक संदेश देणे हादेखील होता.

महाकुंभ २०२५ मध्ये ही विशेष स्वच्छता मोहीम राबवली गेली. यामध्ये लोकांनी मोठ्या संख्येने एकत्रितपणे राम घाट, भारद्वाज घाट आणि गंगेश्वर घाट येथे गंगा स्वच्छता केली. त्यांनी गंगेचे पाणी स्वच्छ करण्यासाठी काही उपाय केले. त्यामुळे भाविकांना स्नानासाठी स्वच्छ पाणी आणि नेटका परिसर मिळू शकला. स्वाभाविकच या स्वच्छता माहिमेमुळे महाकुंभाच्या आयोजनात एक नवीन अध्याय जोडला गेला.

मुलांनो, दर १२ वर्षांनी महाकुंभाचे आयोजन केले जाते आणि लाखो भाविक महास्नानासाठी येतात. या काळात गंगेच्या काठावर मोठ्या संख्येने लोक जमत असल्यामुळे स्वच्छता राखणे महत्त्वाचे असते. म्हणूनच या मोहिमेद्वारे स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत लोकांमध्ये जागरूकता देखील पसरवली गेली. या महाकुंभात सुरक्षा, स्वच्छता आणि सुविधांसाठी व्यापक व्यवस्था केली गेली.



## लवकरच येणार हायपरलूप ट्रेन

नवीन काही

मित्रांनो, दळवळणयंत्रणा सक्षम हवी असे आपण शिकलो आहोत. याच आधारे अनेक देशांनी मोठी प्रगती करत झेप घेतली असल्याचे वास्तवही तुम्ही शिकत असाल. आता आपला देशही त्यात मागे राहणार नाही. कारण लवकरच भारतातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत एक मोठी क्रांती होणार आहे. देशातील पहिले हायपरलूप चाचणी ट्रॅकवर पूर्णपणे तयार असून त्याचा व्हिडिओ रेल्वे मंत्रालयाने प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे भारताने हाय-स्पीड वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, असे आपण म्हणू शकतो. हा ट्रॅक ४२२ मीटर लांब आहे आणि आयआयटी मद्रासने त्याची रचना केली आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय रेल्वेने आयआयटी मद्रासला आर्थिक मदत केली आहे.


मित्रांनो, हायपरलूप हे एक प्रगत तंत्रज्ञान असून त्यामध्ये ट्रेन एका विशेष ट्यूबमध्ये सर्वाधिक वेगाने चालवली जाते. या तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकांना खूप जलद आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव घेता येतो. त्यामुळेच चाचणी यशस्वी झाली तर हे तंत्रज्ञान भारतातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदलू शकते, यात शंका नाही.

हायपरलूप गाड्या ताशी १,१०० किलोमीटर वेगाने धावतात. बुलेट ट्रेनच्या टॉप स्पीडबद्दल बोलायचे झाले तर, तिचा वेग ४५० किलोमीटर इतका आहे. त्यामुळेच हायपरलूपद्वारे दिल्लीतील प्रवासी फक्त ३० मिनिटांमध्ये जयपूरला प्रवास करू शकेल. आहे की नाही मजा... लवकरच या हायपरलूप ट्रॅकवर ट्रायल रन सुरू होईल. चाचणी यशस्वी झाल्यानंतर भारतात या प्रगत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करता येईल. देशात हायपरलूप ट्रेन सुरू झाली तर येणाऱ्या काळात रेल्वे आणि रस्ते प्रवासाची रचनाच बदलेल. तेव्हा हायपरलूप तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या निवडक देशांच्या गटात भारत आता सामील झाला आहे, असे आपण म्हणू शकतो.

## सुट्टीची पूर्वतयारी

भन्नाट

छोट्या दोस्तांनो, सध्या परीक्षांचा माहोल आहे. एप्रिलच्या मध्यापर्यंत तुम्ही सगळेजण बिझी आहात. अभ्यासात तुम्ही गुंतलेले असाल हे तर खरं! पण परीक्षा संपली की तुम्ही मोकळे होणार आहात. मग धम्माल करायला सुरूवात होईल. तुमच्यापैकी अनेकांनी भटकंतीचा प्लॅनही केला असेल. मस्तपैकी फिरायला जाणार असाल. पण उन्हाळ्यात कुठे बाहेर जायचं असं म्हणून तुमच्यापैकी काहीजण घरीच धमाल करणार असतील. दोस्तांनो, सुट्टीसाठी काही उद्योग हवेतच. तुम्ही घरच्या घरी काही तरी करण्याचे पर्याय धुंडाळत असाल. अशा वेळी बबल पेंटिंग करून तुम्ही छान टाईमपास करू शकता.



**साहित्य :** कागद मावेल एवढा ट्रे किंवा बाऊल, रंग, साबण, स्ट्रॉ आणि कागद

**कृती :** एका ट्रेमध्ये रंग घाला. यातच लिक्विड सोप घाला. यात आता तुम्हाला पाणी घालायचं आहे. साबणाच्या पाण्यात फुगे तयार होतात. असे फुगे तयार होईपर्यंत पाणी घालावं लागेल. स्ट्रॉचा वापर करून तुम्ही फुगे तयार करू शकता. आता यावर अलगद कागद ठेवा. कागद पाण्यात भिजणार नाही याची काळजी घ्या. कागदावर फुग्याची नक्षी उमटायला हवी. अशाच प्रकारे नक्षीकाम करत राहा. वेगवेगळ्या प्रकारचे रंग यात मिसळता येतील. हे पेंटिंग करताना तुम्हाला खूपच धम्माल येईल. मित्रमंडळींना जमवूनही ही धमाल करता येईल. पण यासाठी थोडी वाट बघा. सुट्टी पडू द्या. मग बिनधास्त धमाल करा.


## अस्वलांच्या विश्वात

प्राणी जगत

छोट्या दोस्तांनो,अस्वलांच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत बरं का. अंटार्क्टीका खंडावर आढळणारं पोलर बिअर किंवा ध्रुवीय अस्वल पांढरंशुभ्र असतं तर इतर अस्वलं काळीसावळी असतात. असंच एक अस्वल चीनमध्ये आढळतं. हे अस्वल काळं असलं तरी त्याच्या पोटावर सोनेरी रंगाचे चट्टे किंवा केस असतात. त्यामुळे त्याला सन बिअर असं म्हटलं जातं. लांब आणि वेडीवाकडी वळणारी जीभ हे या अस्वलाचं वैशिष्ट्य. त्यामुळे जमिनीवरचे किडे ते अगदी सहज टिपू शकतं. त्याची जीभ जवळपास १० इंच लांब असते. त्याच्या छातीच्या आणि पोटाच्या भागावर असलेले सोनेरी रंगाचे चट्टे उगवत्या सूर्यासारखे दिसतात. गंमत म्हणजे सन बिअर ही जगातली अस्वलांची सर्वात लहान प्रजाती आहे. या प्रजातीचे नर पाच फूट वाढतात. त्यांचं वजन १५० पाउंडांपर्यंत असतं. अमेरिकन अस्वलाच्या तुलनेत या अस्वलाचा आकार अर्ध्यापेक्षाही कमी असतो. दक्षिणपूर्ण आशियातल्या घनदाट जंगलांमध्ये ही अस्वलं राहतात. ही अस्वलं झाडावर सहज चढू शकतात. ती झाडाच्या ढोलीत राहतात आणि फांद्या तसच पानांपासून झाडावरच पलंगही तयार करतात. ही अस्वलं झाडांवर अगदी मस्तपैकी पहुडलेली असतात. छोटे किडे, पानं, पाली आणि बोरं हे त्यांचं प्रमुख अन्न आहे. पण मध त्यांना खूप आवडतो. आपल्या बळकट पंजांच्या मदतीनं ते मधमाश्यांच्या पोळ्यांमधला मध काढून घेतात. या कामी त्यांना मधमाशांचा अडथळा जाणवत नाही. प्राणीसंग्रहालयात ही अस्वलं २५ वर्षांपर्यंत जगतात.



ठिपके जुळवा



## हॉटेलमध्ये राज्यांचे संमेलन

वाचा तर खरं.

दोस्तांनो, भारतात नाविन्यपूर्ण हॉटेल्सची कमतरता नाही. बनारसमध्ये असंच एक हॉटेल आहे. 'ऑन गँजेस' असं या हॉटेलचं नाव. गंगेच्या किनाऱ्यावर असलेल्या या हॉटेलमधल्या प्रत्येक खोलीत भारतातल्या एका राज्याची झलक पहायला मिळते. विशेष म्हणजे या हॉटेलच्या खोल्यांनाही राज्यांची नावं देण्यात आली आहेत. राजवाड्यासारख्या दिसणाऱ्या या अनोख्या हॉटेलबद्दल जाणून घेऊ या...

✲ बिहार नावाच्या खोलीत मधुबनी कलात्मकता दिसून येते. खोलीतले सोफे आणि खुर्च्या पलंगाप्रमाणे आहेत. प्रकाशासाठी रॉकेलचे दिवे आहेत. खोलीतल्या मोठ्या कपाटावर बिहारची संस्कृती दाखवण्यात आली आहे. या खोलीत राहण्यासाठी दिवसाचे आठ हजार रूपये मोजावे लागतील.



✲ बंगालच्या खोलीत बंगालमधली प्रसिद्ध काष्ठ कला आपल्याला पहायला मिळते. नक्षीकाम केलेले दिवे या खोलीची शान अनेकपटींनी वाढवतात. हे हॉटेल म्हणजे एक राजवाडा होता. १९३२ मध्ये बिहारच्या राजासाठी हा राजवाडा बनवण्यात आला होता.

✲ मध्य प्रदेशच्या खोलीत सांची येथील वैशिष्ट्ये आढळतात. इथलं फर्निचरही त्याच पद्धतीनं बनवण्यात आलंय. पडदे, चादर आणि अभ्र्यांवर मध्य प्रदेशमधील हस्तकला आढळते.

✲ तामिळनाडू नावाच्या खोलीतल्या टाईल्सवर दाक्षिणात्य कलेची छाप आहे. 'नीडू' हा कलेचा प्रकार आपल्याला इथे पहायला मिळतो.

✲ ओरिसा राज्याच्या खोलीत खजुराहोच्या लाकडापासून बनवलेलं फर्निचर आहे. ओरिसाची कलाही इथे पहायला मिळते.

✲ पंजाबच्या खोलीत पंजाबी संस्कृतीच्या खुणा आढळतात. ही खोली अत्यंत आकर्षक पद्धतीने सजवण्यात आली आहे.

✲ महाराष्ट्राच्या खोलीत गणपती बाप्पाचा फोटो आहे. या खोलीत मराठाकालीन संस्कृती पहायला मिळते. खोलीत राहण्यासाठी प्रती दिन आठ हजार रूपये द्यावे लागतील.

✲ कर्नाटकच्या खोलीत या राज्यातली खास चित्र लावण्यात आली आहेत.

✲ गोव्याच्या खोलीत गोवन पद्धतीचं फर्निचर पहायला मिळतं. या खोलीचा दरवाजा काचेचा असून इथे गोव्याचा फिल घेता येतो.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) छत्तीसगडचा प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?

२) उरूग्वेचं चलन कोणतं?

३) मंगोलियाची राजधानी कोणती?

४) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या देशात होणार आहे?

५) हल्दिया बंदर कोणत्या राज्यात आहे?

६) पुलित्झर पारितोषिक कोणत्या देशातर्फे दिलं जातं?

७) ईझार चषक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?

८) रणजी करंडक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?

९) भारतातली पहिली महिला बँक कोणती?

१०) सार्वजनिक ठिकाणी वायफाय सुविधा उपलब्ध करून देणारं भारतातलं पहिलं शहर कोणतं?

उत्तरं : १) राउत नाचा २) पेसो ३) उल्लानबाटर ४) कतार ५) पश्चिम बंगाल ६) अमेरिका ७) पोलो ८)क्रिकेट ९) भारतीय महिला बँक १०) मुंबई

## दररोज सायकल चालवा

फीट रहा

तुमच्यापैकी अनेकजण सायकलवर शाळेत जात असतील. पण तुम्ही ते करत नसाल तर घराच्या जवळपासची कामे करण्यासाठी वा अगदी व्यायामासाठी सायकलचा वापर अवश्य करा. कारण सायकलिंगचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. दररोज सकाळी सायकलिंग केल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि शरीराला ऊर्जा मिळते. वेगाने सायकल चालवल्याने जास्त कॅलरीज जळतात आणि वजनवाढीची भीती रहात नाही. सायकलिंगमुळे चयापचय क्रिया सुधारते. याशिवाय पाय, खांदे आणि हात यांचे स्नायूदेखील मजबूत होतात.

मुलांनो, व्यक्ती किती वेळ सायकल चालवू शकते हे त्याच्या वा तिच्या शारीरिक क्षमतेवर अवलंबून असते. तथापि, तुम्ही नवशिके असाल तर १५-२० मिनिटे सायकलिंग पुरेसे आहे. निरोगी व्यक्तीने दररोज किमान ३०-४० मिनिटे सायकल चालवावी, असे तज्ज्ञ सांगतात. तेव्हा व्यायामासाठी सायकलिंग हा एक उत्तम पर्याय असू शकतो. पण तुमची शारीरिक स्थिती काय आहे ते बघा. सायकल चालवताना काही त्रास होत असेल तर लगेच मोठ्या माणसांना सांगा.

मुलांनो, सायकलिंग केवळ शारीरिक आरोग्यासाठीच फायदेशीर नाही तर ते तुम्हाला मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि आनंदी ठेवते. सायकलिंगमुळे शरीरात एंडोर्फिन हार्मोनची पातळी वाढत असल्यामुळे ताण कमी होतो आणि तुम्हाला उत्साही वाटते. सायकलिंगमुळे ताण, नैराश्य आणि चिंता यासारखे मानसिक आरोग्याचे धोकेही टाळता येतात. सायकलिंगमुळे मेंदूमध्ये रक्ताभिसरण वाढ असल्यामुळे त्याला अधिक ऑक्सिजन आणि पोषक तत्वे मिळतात आणि मेंदू जलद काम करतो. तेव्हा हे सगळे लाभ मिळवण्यासाठी कंटाळा न करता आणि सुरक्षेची पूर्ण काळजी घेऊन सायकल चालवा.



महत्वपूर्ण...

### हसत हसत शिका



मुलांनो, तुम्ही तंत्रज्ञान वापरण्याचे महत्त्व जाणता. त्याचा शक्य आणि योग्य तेवढा वापरही करता. पण हे करत असताना त्याच्या वापराचे प्रमाण आणि वेळ निश्चित करा. कारण या वयात अधिक वेळ स्क्रीनवर घालवण्याऐवजी तुम्ही बाहेर खेळणे, शारीरिक क्रिया आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अन्य उपक्रमांमध्ये भाग घेणे गरजेचे आहे. तेव्हा तंत्रज्ञान शिकण्याबरोबरच या गोष्टींचाही विचार करा. शिकणे म्हणजे फक्त पुस्तकांचे वाचन नसते हेदेखील तुम्ही समजून घ्या. पुस्तके वाचून अभ्यास करण्याचा कंटाळा येत असेल तर तंत्रज्ञानाची मदत आहेच, पण त्याशिवाय देखील शिकण्यास मजा येईल असे अन्य उपक्रम शोधा आणि अनुभव घेत हसत हसत शिकत राहा.

ऋतू बदल...

### वाढत्या उन्हापासून जपा



मित्रांनो, आता उन्हाळा सुरु झाला आहे. तेव्हा उन्हात फिरताना काही पथ्ये अवश्य पाळा. उन्हात फिरताना शरीरात पाणी कमी होऊ शकते. त्यामुळे वेळोवेळी पाणी पिण्याची सवय लावून घ्या. यामुळे शरीर डिहायड्रेट होण्यापासून वाचू शकाल. उन्हात खूप वेळ राहिल्यामुळे थकवा येतो. म्हणूनच थोडा विराम घेणे गरजेचे असते. तुम्हीही या दिवसांमध्ये खूप धावपळ किंवा भर उन्हातले खेळ टाळा. उन्हामुळे येणारा थकवा आणि ओटीपोटाची समस्या टाळण्यासाठी खाण्या-पिण्याच्या वेळा पाळा.

नवे जग...

### कृत्रीम बुद्धिमत्ता वापरताना...



मित्रांनो, सध्याचा जमाना ए.आय. चा आहे. तुम्ही ए.आय. चा उपयोग शैक्षणिक साधनांमध्ये करू शकता. विविध ॲप्स, व्हिडिओ आणि गेम्सद्वारे नवीन ज्ञान मिळवता येते. ए.आय. च्या सहाय्याने तुम्ही गणित, विज्ञान, भाषा यासारख्या विषयांचा अभ्यासही करू शकता. अर्थात ए.आय. वापरताना ऑनलाइन सुरक्षिततेची शिस्त पाळा. कोणतीही गोपनीय माहिती, पासवर्ड किंवा व्यक्तिगत तपशील इतरांकडे जाणार नाही, याची काळजी घ्या. ए.आय. चा वापर करताना त्याकडे एक खेळ किंवा अभ्यासाची साधन म्हणूनच पाहा. यावर अधिक वेळ घालवणे तुमच्यातील सर्जनशीलता कमी करू शकते.

महत्त्वाचं काही

### अश्व संचलनासन

छोट्यांनो, अश्व संचलनासन नावाचं एक आसन आहे. यात खाली वाकून डावा पाय शक्य तितका मागे ताणायचा असतो. दोन्ही हातांचे पंजे पुढे टेकवून उजवा पाय दोन पंजांमध्ये ठेवावा लागतो. या आसनामुळे पाठीचा कणा बळकट होतो. स्नायूंनाही बळकटी मिळते. त्यामुळे हे आसन नियमित करायला हवं.





## मुंबईकरांचा हार्दिकला मिळणार पाठिंबा

गतवर्षी रोहित शर्माला वगळून हार्दिक पंड्याची अचानक कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर हार्दिकला प्रामुख्याने वानखेडे स्टेडियमवर मुंबईकर प्रेक्षकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. त्याचवेळी मुंबईचा राजा रोहित शर्मा...असे नारे दिले जात होते, पण हार्दिकने आपले मन जराही विचलित होऊ दिले नव्हते. टी-२० विश्वकरंडक जिंकून आल्यानंतर वानखेडेवर झालेल्या गौरव सोहळ्यात खच्चून भरलेल्या प्रेक्षकांसमोर रोहितने हार्दिकची पाठराखण केली आणि त्याचाही उदोउदो करा, असे प्रेक्षकांना सांगितले होते. त्यानंतर सर्व वातावरण बदलले होते. त्यामुळे यंदा मुंबईकर प्रेक्षक हार्दिकला समर्थन देत राहतील.

# श्रावी, सृष्टी, मायरा यांची आगेकूच

## १४ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १४ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या गटात श्रावी देवरे, सृष्टी सूर्यवंशी, मायरा शेख यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.





श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल टेनिस कोर्ट, महाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे सुरु असलेल्या मुख्य ड्रॉच्या एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत मुलींच्या गटात अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या श्रावी देवरे हिने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत तेलंगणाच्या धृती गुंडूचा ६-०, ६-३ असा तर, सहाव्या मानांकित मायरा शेखने दुसऱ्या मानांकित कीर्तीयानी घाटकरचा टायब्रेकमध्ये ६-२, ७-६(४) असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. सान्वी राजूने अनिका नायरचे आव्हान ६-२, ६-१ असे संपुष्टात आणले. बिगर मानांकित सृष्टी सूर्यवंशीने चौथ्या मानांकित आयुश्री तरंगेचा ६-१, १-० असा पराभव केला.

मुलांच्या गटात अव्वल मानांकित स्मित उंद्रेने तामिळनाडूच्या मिथुन सेंदिलकुमारचा ६-२, २-६, ६-३ असा तीन सेटमध्ये पराभव केला. सातव्या मानांकित नमिश हुडने चौथ्या मानांकित वीर चतुरचा ६-४, ६-४ असा संघर्षपूर्ण पराभव केला. अधिराज दुधाणेने कियान पौआवर ६-२, ६-० असा सहज विजय मिळवला. काल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या अंशुल पुजारीने अर्चन पाठकचा ६-०, ६-१ असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली.

## शकिब हसनसाठी आनंदाची बातमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशचा अष्टपैलू शाकिब अल हसनसाठी मागील वर्ष अडचणींनी ग्रासलेले होते. बांगलादेशमध्ये निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या वातावरणादरम्यान एका हत्येचा आरोपाखाली शाकिबवर गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर शाकिब कुटुंबासह इंग्लंडमध्ये स्थायिक झाला अन् इंग्लंड क्रिकेट बोर्डाने त्याच्यावर अनधिकृत बॉलिंग ॲक्शनमुळे बंदी घातली होती. पण बांगलादेशच्या माजी कर्णधारासाठी आनंदाची बातमी आहे, त्याच्यावरील बंदी आता हटवण्यात आली आहे.

शाकिबवरील ही बंदी आता हटवण्यात आली आहे. बंदी लागू झाल्यापासून शाकिब गोलंदाजीच्या ॲक्शनची पुनर्मूल्यांकन चाचणी देत होता. सुरूवातीच्या दोन चाचण्यांमध्ये तो अपयशी ठरला. ज्यापैकी एक चाचणी इंग्लंडमध्ये व दुसरी चाचणी भारतात झाली. त्यानंतर त्याने पुन्हा इंग्लंडमध्ये पुनर्मूल्यांकन चाचणी दिली, ज्यामध्ये तो यशस्वी ठरला आहे. तो म्हणाला ही, "ही बातमी (गोलंदाजी पुनर्मूल्यांकन चाचणी यशस्वी पूर्ण) खरी असून, मला पुन्हा गोलंदाजी करण्याची परवानगी मिळाली आहे."

## स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लब संघाला विजेतेपद



**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी करंडक' १३ वर्षाखालील गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये स्वराज गंगाणे याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबने योगेश क्रिकेट ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले. सातारा रोडवरील टेंभेकर फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना योगेश क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १९.१ षटकात ९५ धावांवर संपुष्टात आला. सामन्यात अव्दिका जाधव (१८ धावा), श्रृतिका पाटील (१६ धावा) आणि अक्षया जाधव (१२ धावा) यांनी छोट्या खेळी करून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. स्वराज गंगाणे याने १६ धावांमध्ये ४ गडी बाद करून योगेश ॲकॅडमीच्या संघाच्या डावाला खिंडार पाडले. अर्णव धोंडे आणि स्टीफन शिरोडकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून दुसऱ्या बाजुने अचूक गोलंदाजी केली. हे लक्ष्य स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबने १६.५ षटकात व १ गडी गमावून सहज पूर्ण केले. शौर्य जाधव (नाबाद ५६ धावा) आणि अर्जुन थोरात (नाबाद २० धाव) या दोघांनी धावा करून संघाला सहज विजय मिळवून दिला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेचे संचालक सागर कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी आणि उपविजेत्या योगेश क्रिकेट ॲकॅडमी संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आले.

## पुण्यात गोल्फ स्पर्धा २१ मार्च रोजी रंगणार

**पुणे :** पुण्यातील पूना गोल्फ कोर्स येथे २१ मार्च २०२५ रोजी एका खास व प्रतिष्ठेच्या गोल्फ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १९०९ पासून घड्याळ उद्योगात अग्रेसर असलेल्या सीटी पुंडोल अँड सन्स यांनी विशेष करून आयोजित केलेल्या या स्पर्धेत १०० हून अधिक अव्वल गोल्फ पटू सहभागी होणार असून स्पर्धात्मकता, खिलाडूवृत्ती आणि एक सुरेख अनुभव अशा सर्वच दृष्टीने हि स्पर्धा संस्मरणीय ठरणार आहे. या स्पर्धेला दुपारी १२.३० प्रारंभ होणार असून पूना गोल्फ कोर्सच्या अत्यंत रेखीव व निसर्ग सुंदर अशा सर्व १८ होल साठी हे स्पर्धक आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. या स्पर्धेचा समारोप त्याच दिवशी सायंकाळी होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभाने होणार असून या प्रसंगी ओमेगाचे वरिष्ठ अधिकारी व प्रतिनिधी पार्थप्रतिम मुखर्जी, रामकृष्ण अय्यर व शिवम साहू यांच्यासह सीटी पुंडोल अँड सन्सचे कावस पुंडोल, होर्मुझ पुंडोल आणि अविवा पुंडोल हे संचालक उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी स्पर्धेची अधिक माहिती देताना कावस पुंडोल म्हणाले की, या अत्यंत प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी ओमेगा वॉचेस याच्यासारखे जागतिक किर्तीचे भागीदार मिळाल्यामुळे आम्हाला अतिशय आनंद झाला असून ओमेगा घड्याळांची आधुनिकता व वैशिष्ट्ये यांच्याशी गोल्फ या खेळाची प्रतिष्ठा व शान हे अतिशय मिळेतजुळते आहेत, असे आम्हाला वाटते. त्यामुळेच ही स्पर्धा म्हणजे खेळातील कौशल्याबरोबरच प्रतिष्ठा आणि शानदार जीवन शैली यांचा एक अनोखा संगमच ठरणार आहे. ते पुढे म्हणाले की, घड्याळाच्या प्रत्येक उत्पादनाबरोबरच प्रत्येक उपक्रम आणि स्पर्धा यांचा एक आगळा वेगळा अनुभव ग्राहकांना मिळावा यासाठी सीटी पुंडोल अँड सन्स हे कायमच प्रयत्नशील असतात, हे या स्पर्धेच्या निमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध होणार आहे. सीटी पुंडोल अँड सन्स हे नेहेमीच पारंपरिकता आणि आधुनिकता यांचा संगम साधत असतात.

## वन-डेमध्ये शालेय विद्यार्थ्याने चोपल्या ४०० धावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कौशल्य आणि शक्तीचे आश्चर्यकारक प्रदर्शन करताना, मुस्तकीम हावलदारने वन-डे क्रिकेटमध्ये १७० चेंडूत ४०४* धावा कुटल्या आणि बांगलादेशच्या शालेय क्रिकेटमध्ये एक नवा विक्रम प्रस्थापित केला. या डावात मुस्तकीमने एकूण ५० चौकार आणि २२ षटकार ठोकले. बांगलादेशच्या मान्यताप्राप्त क्रिकेटमधील ही सर्वात मोठी खेळीआहे. राष्ट्रीय शालेय क्रिकेट स्पर्धेच्या ढाका विभागात गट टप्प्यातील एका सामन्यादरम्यान हा अविश्वसनीय पराक्रम साध्य झाला आणि त्यामुळे देशाला एक नवा उदोयन्मुख खेळाडू मिळाला.



कॅम्ब्रियन स्कूलकडून खेळताना सेंट ग्रेगोरी स्कूल विरुद्धच्या सामन्यात मुस्तकीमने ही कामगिरी केली. कॅम्ब्रियन स्कूल अँड कॉलेजने प्रथम फलंदाजी केली आणि ५० षटकांत तब्बल ७७० धावा केल्या. मुस्ताकीमच्या उल्लेखनीय ४०४* धावांव्यतिरिक्त, त्याचा सहकारी सद परवेझनेही द्विशतकासह महत्त्वपूर्ण योगदान दिले. परवेझने १२४ चेंडूत २५६ धावा केल्या, ज्यामध्ये ३२ चौकार आणि १३ षटकारांचा समावेश होता. मुस्ताकीम आणि परवेझ यांनी मिळून ६९९ धावांची भागीदारी केली आणि त्यांच्या संघाला असाधारण धावसंख्या गाठून दिली. विषेश म्हणजे ७७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, ग्रेगोरी हायस्कूल संघ अवघ्या ३२ धावांवर बाद झाला. कॅम्ब्रियन स्कूलने हा सामना ७३८ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला.

## चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या भारतीय संघासाठी बीसीसीआयकडून ५८ कोटींचे बक्षीस जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारतीय संघाने घवघवीत यश संपादन केले. स्पर्धेमधील एकही सामना न गमावत भारताने विजेतेपद पटकावले. ३ चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतेपद पटकावणारा भारतीय संघ पहिला संघ बनला आहे. भारतीय संघाच्या या विक्रमी कामगिरीनंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळकडून टीम इंडियासाठी ८ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. ही आर्थिक मान्यता खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी आणि पुरुष निवड समितीच्या सदस्य या सर्वांच्या सन्मानार्थ देण्यात येत आहे.



टीम इंडियाने मागील ३ आयसीसी स्पर्धांमध्ये अवघा एक सामना गमावला आहे. त्याचबरोबर रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने सलग दुसऱ्या आयसीसी ट्रॉफीवर नाव कोरले. त्यामुळे मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये भारतीय संघ सध्या जगात सर्वोत्तम संघ बनला आहे.

हायब्रीड मॉडेलनुसार भारतीय संघाचे सर्व सामने दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावर खेळवण्यात आले. स्पर्धेत पहिल्या सामन्यापासून भारतीय संघ मजबूत स्थितीत होता. बांगलादेशला पराभूत करून भारताने स्पर्धेची विजयी सुरूवात केली. त्यानंतर पाकिस्तानलाही टीम इंडियाने सहज लोळवले. अंतिम साखळी सामन्यात न्यूझीलंडला पराभूत करून सेमीफायनलमध्ये अपराजित राहून प्रवेश केला अन् उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला पराभवाची धूळ चारली. स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडविरूद्ध लढत दिली आणि ४ विकेट्सने विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफी आपल्या नावे केली. भारतीय संघाला पारितोषिक जाहीर करताना बीसीसीआय अध्यक्ष रॉजर बिनी यांनी भारतीय संघाचे कौतुक केले.

अध्यक्ष म्हणाले "आयसीसीचे सलग दोन विजेतेपद जिंकणे हे विशेष आहे आणि हे बक्षीस जागतिक स्तरावर टीम इंडियाच्या समर्पणाची आणि उत्कृष्टतेची ओळख पटवते. रोख पारितोषिक म्हणजे पडद्यामागे प्रत्येकाने केलेल्या कठोर परिश्रमाची पावती आहे. आयसीसी १९ वर्षांखालील महिला वर्ल्ड कप विजयानंतर २०२५ मध्ये ही आमची आयसीसी ट्रॉफी होती आणि ही आपल्या देशातील मजबूत क्रिकेट परिसंस्थेला अधोरेखित करते."

बीसीसीआयचे नवनियुक्त सचिव देवजीत सैकिया यांनीदेखील यावेळी भारतीय क्रिकेटच्या भविष्यावर भाष्य केले. "खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ यांना या सन्मानाने सन्मानित करताना बीसीसीआयला अभिमान वाटत आहे. जागतिक क्रिकेटमधील त्यांचे वर्चस्व हे वर्षानुवर्षे केलेल्या कठोर परिश्रम आणि धोरणात्मक अंमलबजावणीचे परिणाम आहे. या विजयामुळे भारताचे व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये अव्वल स्थान निश्चित झाले असून आम्हाला खात्री आहे.

## क्रिडा प्रबोधिनी ॲकॅडमी, डेक्कन इलेव्हन संघांची विजयी सलामी



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटना आणि उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड एफसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए महिला लीग २०२४-२५' फुटबॉल स्पर्धेत युनायटेड पुना स्पोटर्स अकादमी, क्रिडा प्रबोधिनी ॲकॅडमी आणि डेक्कन इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रिडानगरी मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत अस्मिता लांडगे हिने केलेल्या गोलाच्या जोरावर युनायटेड पुना स्पोटर्स अकादमीने सिटी गर्ल्स गो स्पोटर्स संघाचा १-० असा पराभव करून विजयी सलामी दिली. क्रिडा प्रबोधिनी ॲकॅडमीने पुणे सॉकर क्लबचा १६-० असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये सौम्या शेख हिने सर्वाधिक ५ गोल केले. साक्षी हिवळे आणि इशिता घोशाल यांनी प्रत्येकी ३ गोल तर, नैना तक्षक हिने २ गोल केले. तनिशा शिरसुळ, साक्षी इंगळे आणि पुर्वा गायकवाड यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. डेक्कन इलेव्हन संघाने पुना स्पोटर्स अकादमीचा ११-० असा धुव्वा उडविला. मैत्रयी बिराजदार हिने ५ गोल तर, सानिका देशपांडे हिने २ गोल नोंदविले. इशानी कुलकर्णी, गझल देशमाने, मुद्रा बापट आणि संपदा वेलंका यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेविका श्रीमती पुष्पा कनोजिया, माजी हॉकी खेळाडू श्रीमती किरण चौधरी, पीडीएफएचे उपाध्यक्ष प्यारेलाल चौधरी आणि सचिन प्रदीप परदेशी आणि युकेएम कोथरूड एफसीचे अध्यक्ष वसंत कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फुटसाल इंडियाच्या खेळाडू वैष्णवी बराटे, पुजा गुप्ता, आर्या मोरे आणि रितिका सिंग आदि मान्यवर उपस्थित होते.

## सुनील छेत्रीच्या पुनरागमनात भारताचा दणदणीत विजय; मालदीवला ३-० हरवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा महान फुटबॉलपटू सुनील छेत्री याच्या आंतरराष्ट्रीय पुनरागमनात भारताने मैत्रीपूर्ण फुटबॉल लढतीत मालदीवला ३-० फरकाने सहज पराभूत केले. स्पॅनिश प्रशिक्षक मानोलो मार्केझ यांच्या मार्गदर्शनाखालीही राष्ट्रीय संघाचा पहिलाच विजय ठरला. छेत्रीने कारकार्दीतील ९५वा गोलही नोंदविला. भारताच्या विजयात राहुल भेके याने ३४व्या मिनिटास, तर लिस्टन कुलासो याने ६६व्या मिनिटास प्रत्येकी एक गोल केला. छेत्रीने ७६व्या मिनिटास भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारा गोल नोंदविला.



गेल्या वर्षी जूनमध्ये ४० वर्षीय छेत्रीने निवृत्ती पत्करल्यानंतर भारतीय फुटबॉल संघ पाच लढती, तर मार्केझ यांच्या मार्गदर्शनाखाली चार सामने विजयाविना होता. अखेर बुधवारी संघाने आंतरराष्ट्रीय विजयाची चव चाखली. मेघालयाच्या राजधानीत भारतीय राष्ट्रीय फुटबॉल संघ प्रथमच आंतरराष्ट्रीय सामना खेळला. यजमान संघाने गोलशून्य बरोबरीची कोंडी अर्ध्या तासाच्या खेळानंतर फोडली. ब्रँडन फर्नांडिसच्या शानदार कॉर्नर फटक्यावर राहुल भेके याने उंच उडी घेत अचूक हेडिंग साधले.

मध्यफळीत लक्षवेधक ठरलेल्या ब्रँडन याला ४१व्या मिनिटास दुखापतीमुळे मैदान सोडावे लागले. त्याची जागा फारुख चौधरीने घेतली. कर्णधार सुनील छेत्री व लिस्टन कुलासो यांनी वारंवार आक्रमणे रचत मालदीवच्या बचावफळीला दबावाखाली ठेवले. तासाभराच्या खेळानंतर लिस्टन कुलासोचा शानदार प्रयत्न मालदीवच्या गोलरक्षकाने पायाच्या साह्याने ऐनवेळी उधळून लावला, मात्र लगेच नाओरेम महेश सिंग याच्या अप्रतिम कॉर्नर फटक्यावर लिस्टनचे हेडिंग भेदक ठरले.

## पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाचा दुसरा विजय





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने दुसरा विजय मिळवला.

धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अबीर जोगळेकर ३-२४) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने एके स्पोर्टस क्लब संघाचा १४ धावांनी पराभव केला.

## बीबीएसएम क्रिकेट स्पर्धेला उद्यापासून प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाबूराव चांदेरे यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या आणि शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष समीर चांदेरे यांच्या सहकार्याने चौथ्या बीबीएसएम (बाणेर, बालेवाडी, सूस, महाळुंगे) क्रिकेट लीग स्पर्धेला शुक्रवार (दि. २१) पासून प्रारंभ होत आहे. या स्पर्धेचे यंदा चौथे वर्ष असून, यंदा पुरुष व महिला मिळून साडेतीन हजार खेळाडू सहभागी होत आहेत. तसेच एकूण १५ दिवस आणि सकाळ व सायंकाळच्या सत्रात सामने खेळविण्यात येणार असल्याची माहिती समीर चांदेरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल भोरे व पूजा चांदेरे उपस्थित होते. समीर चांदेरे म्हणाले, यंदाची बीबीएसएम क्रिकेट लीग २१ मार्चपासून सुरू होत आहे. बाणेर, बालेवाडी, सूस आणि महाळुंगे या परिसरातील सोसायट्यांमध्ये राहणारे नागरिक या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होतात. मागील तीन वर्ष स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. यंदा तब्बल १२८ पुरुषांचे संघ व ५८ महिलांचे संघ सहभागी झाले आहेत. सूस येथील मैदानावर स्पर्धा होत असून, प्रत्येकी सहा षटकांचे सामने होणार आहेत. पहिल्या सत्रात सकाळी ७ ते ९ तर सायंकाळी ४ वाजेनंतर सामने होतील. दररोज पुरुषांचे ११ सामने तर महिलांचे ३ सामने खेळविण्यात येणार असल्याचे चांदेरे यांनी सांगितले. विजेत्या महिला व पुरुष संघांना प्रत्येकी दीड लाख रुपयांचे पारितोषिक बाबूराव चांदेरे सोशल फाउंडेशनच्या वतीने देण्यात येतात. तसेच अनुक्रमे स्पर्धेतील उपविजेता ते स्पर्धेतील दहाव्या क्रमांकावर राहणारा संघाला अनुक्रमे १ लाख २५ हजार पासून ते दहाव्या संघाला १० हजार रुपये अशी साधारणपणे २० लाख रुपयांची पारितोषिके दिली जाणार आहेत.

## रियान पराग राजस्थानचा पहिल्या ३ सामन्यात कर्णधार

# संजु सॅमसन खेळणार की नाही?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ हंगामाला सुरूवात होण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असताना राजस्थान रॉयल्सने नव्या कर्णधाराची घोषणा केली आहे. आयपीएल २०२५ मधील पहिल्या तीन सामन्यात रियान पराग राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करणार आहे. राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसन बोटाच्या दुखापतीमुळे इंग्लंडविरूद्धच्या ट्वेंटी-२० मालिकेनंतर मैदानाबाहेर होता. संजू आयपीएल खेळणार की नाही असा प्रश्न उपस्थित झाला होता, पण राजस्थानने आता संजू आयपीएल खेळणार की नाही याबाबत देखील आपला निर्णय कळवला आहे.



आयपीएलच्या १८ व्या हंगामाला सुरूवात होण्यापूर्वी रियान परागने आपली झलक दाखवून दिली. राजस्थान रॉयल्सचा स्फोटक फलंदाज रियान परागने काल सराव सामन्यात शानदार शतक झळकावले. त्याने ६४ चेंडूत १४४ धावांची नाबाद खेळी केली. विशेष म्हणजे रियान परागने त्याच्या शतकी खेळीत १६ चौकार आणि १० षटकार मारले. म्हणजे, त्याने फक्त षटकार आणि चौकारांच्या जोरावर १०४ धावा केल्या.

इंग्लंडविरूद्धच्या ट्वेंटी-२० मालिकेदरम्यान त्याच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये उपचार घेत आहे. संजू पूर्णत: दुखापतीतून सावरला असून त्याच्या फलंदाजीच्या क्षमतेवर फिझीओ खूश आहेत. पण त्याला विकेटकिपींग व फिल्डींगसाठी अजून परवानगी मिळालेली नाही.

परागकडे कर्णधारपद सोपवल्यानंतर राजस्थान रॉयल्सने संजू सॅमसन आयपीएल २०२५ खेळणार असल्याचे सांगितले आहे. पण तो फक्त सामन्यांत फलंदाजी करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. " राजस्थान रॉयल्स संघाचा अविभाज्य भाग असलेला संजू सॅमसन, जोपर्यंत त्याला यष्टीरक्षण आणि क्षेत्ररक्षण करण्याची परवानगी मिळत नाही, तोपर्यंत तो फलंदाजीत महत्त्वाचा वाटा उचलेल.

#रा